
• पुणे, बुधवार, ३१ जुलै २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 233 • वर्ष ३ रे, अंक २३३ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com
BEYOND THE NEWS



## झोपेत असतानाच काळाचा घाला

- मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती
- दरडीखाली अडकलेल्या लोकांचा एकूण आकडा सांगता येणं कठीण
- दुर्घटनाग्रस्त भागातील एका चहाच्या मळ्यात सुमारे १५० कुटुंबे राहत असल्याचा अंदाज
- पूल कोसळल्यानं आणि मुसळधार पावसामुळे बचावकार्यात अडथळे
- जवळपास २५० लोकांना वाचवण्यात यश



# वायनाड

## केरळमध्ये दरड कोसळून १२३ ठार

» सविस्तर वृत्त ११ वर

### पंतप्रधान मोदींशी भेटीनंतर चर्चा!

# फडणवीस दिल्लीत?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भाजपची धुरा सोपवण्याचा निर्णय झाला आहे का, अशी चर्चा राजधानी दिल्लीत रंगली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या झालेल्या भेटीने चर्चांना उधाण आले आहे. पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा यांचा कार्यकाल संपला असून, त्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. पुढील अध्यक्ष म्हणून राज्यातील विनोद तावडे आणि देवेंद्र फडणवीस यांचेच नाव स्पर्धेत असले, तरीही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने फडणवीस यांच्या नावाला पसंती दिली असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाध्यक्ष पदासाठी पक्ष काही नावांवर विचार करत असून, त्यापैकी दोन नेते महाराष्ट्रातील असू शकतात. फडणवीस यांच्याशिवाय पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे यांच्या नावाचाही समावेश होऊ शकतो. याबाबत भाजपकडून कोणतीही



अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. फडणवीस यांनी त्यांच्या पत्नी आणि मुलीसह पंतप्रधान मोदींच्या घेतलेल्या भेटीमुळे फडणवीस यांनी या पदावर राहावे, अशी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाची इच्छा असल्याचे मानले जाते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपमध्ये पुढील अध्यक्ष कोण असावा, यात नावांवरून मतभेद होते, त्यामुळे या पदावर नियुक्ती होऊ शकली नाही. मात्र, फडणवीस यांचे नाव आता मान्य होताना दिसत आहे. म्हणूनच ही भेट महत्त्वाची ठरली आहे.

फडणवीस यांच्याबाबत पक्षात दोन प्रकारचे मतप्रवाह आहेत. त्यांना पक्षाध्यक्ष करावे की मंत्रिमंडळात मंत्री करावे, असा प्रश्नही आहे. फडणवीस यांना केंद्रीय राजकारणात मोठी भूमिका बजावता यावी आणि त्यासाठी ते तयार व्हावेत, यासाठी संघ फडणवीस यांना राष्ट्रीय अध्यक्ष बनविण्याच्या बाजूने आहे, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

### मराठा फॅक्टर

● महाराष्ट्रात गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी मिळून महाविकास आघाडी सरकार स्थापन केले होते. यानंतर शिवसेनेत फूट पडली आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत मोठ्या संख्येने आमदार आले. शिंदे मुख्यमंत्री असताना राज्यात भाजप आणि शिंदे गटाने सत्ता स्थापन केली. त्यानंतर फडणवीस यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले. आता राज्यात मराठा आरक्षणावरून फडणवीस यांना लक्ष्य केले जात असतानाच, ऑगस्ट महिन्यात त्यांची पक्षाध्यक्षपदी वर्णी लागू शकते, अशी शक्यता निर्माण झाली आहे. फडणवीस अध्यक्ष झाले, तर तावडे यांना राज्यात पाचारण केले जाऊ शकते. मराठा आरक्षणात तावडे निर्णायक भूमिका बजावू शकतात, असे बोलले जाते.



### मनुचा डबल धमाका

**पुणे : मनुने जिंकलं दुसरं ब्राँझ! १२४ वर्षांपूर्वीच्या विक्रमाशी केली बरोबरी; सरबजोत सिंहसह ऐतिहासिक कामगिरी**

» सविस्तर वृत्त १२ वर

### हॉकीमध्ये भारताचा आयर्लंडवर २-० ने विजय



» सविस्तर वृत्त १२ वर

### बॅडमिंटनमध्ये चिराग-सात्विक ऑन 'टॉप'




» सविस्तर वृत्त १२ वर

### धक्कादायक!

# लोकसभेचे मतदान आणि मतमोजणीत तफावत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत तब्बल ५३८ जागांवर झालेल्या मतदानाची संख्या आणि मतमोजणीच्या संख्येत तफावत आढळून आली आहे. भारतीय राजकारण आणि निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवणाऱ्या असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) या संस्थेने याबाबतचा सविस्तर अहवाल प्रसिद्ध केला आहे.

#### » ५३८ जागांवर घडला प्रकार

या दाव्यानुसार, लोकसभेच्या ३६२ जागांसाठी झालेल्या एकूण मतांपेक्षा ५ लाख ५४ हजार ५९८ मतांची मोजणी कमी झाली, तर १७६ जागांवर झालेल्या एकूण मतांपेक्षा एकूण ३५ हजार ९३ मतांची मोजणी अधिक झाली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत एकूण मतदान आणि मतमोजणीच्या संख्येत अधिक तफावत दिसली आहे. २०१९ मध्ये केवळ ३४७ जागांवर विसंगती आढळून आली होती, तर २०२४ च्या निवडणुकीत हा आकडा ५३८ जागांवर पोहोचला.

मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर करण्यास होणारा उशीर, मतदारसंघ आणि मतदान केंद्रांची स्वतंत्र आकडेवारी नसणे आणि अंतिम संकलित आकडेवारीच्या आधारे निवडणूक निकाल » पान ७ वर

## नदीकाठ सुधार योजना म्हणजे मेकअप - आदित्य ठाकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नदीकाठ सुधार योजना म्हणजे केवळ मेकअप असून, यात मुळा - मुठा नदीचे सिमेंटचे बकेट तयार केले जात आहे, अशी टिका शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली आहे. हा प्रकल्प रद्द करणे गरजेचे असून, सर्वच पक्षांनी संवेदनशीलपणा दाखवत एकत्रितपणे या प्रकल्पावर विचार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

गेल्या आठवड्यात आलेल्या पुराच्या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी सिंहगड रस्ता भागातील पूरबाधित भागाला भेट देऊन नागरिकांशी चर्चा केली. यानंतर पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ठाकरे यांनी नदीकाठ सुधार योजनांतील त्रुटी व त्याचे परिणाम या विषयावर भाष्य केले. यावेळी पर्यावरणप्रेमी सारंग यादवाडकर यांनी सादरीकरण करून नदीकाठ सुधार प्रकल्प व मेट्रो प्रकल्प, अतिक्रमणे यामुळे मुठा नदीची वहन क्षमता कमी झाल्याचा दावा केला. ठाकरे यांनी या सादरीकरणाचा उल्लेख करीत, नदीकाठ सुधार प्रकल्पाविषयी भूमिका स्पष्ट केली. » पान ७ वर

## पुण्यात कौशल्याधारित प्रमाणपत्र अभ्यास केंद्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. पुणे येथे कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य शासन आणि एनएसडीसी इंटरनॅशनल लिमिटेड यांच्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य कराराचा लाभ राज्यातील युवकांना देशात व परदेशात रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी होणार आहे. एनएसडीसी इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीला प्रशिक्षण केंद्रासाठी पुण्यातील शासकीय दूरशिक्षण तंत्र निकेतन संस्थेची जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीत ८१ हजार कोटींच्या प्रकल्पांनाही मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात सुमारे २० हजार जणांना प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. कोकणसह मराठवाडा, विदर्भ या भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे. राज्यातील विविध जलविद्युत प्रकल्पांच्या नूतनीकरण व आधुनिकीकरणाचे शासन धोरण ठरवण्यात आले आहे.

## मराठवाड्यात २० टक्केच पाणीसाठा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील अकरा मोठ्या सिंचन प्रकल्पांमध्ये जुलैअखेर केवळ २०.१४ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे, असे मंगळवारी जारी करण्यात आलेल्या एका अधिकृत अहवालात म्हटले आहे.

धाराशिवमधील सीना, कोळेगाव जलाशय आणि बीड जिल्ह्यातील माजलगाव जलाशयातील जलसाठा शून्यावर आहे. या भागात आतापर्यंत जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीच्या ५९.६ टक्के पाऊस झाला आहे; परंतु गोदावरी खोऱ्यातील मुख्य पाणलोट क्षेत्रात पाऊस खूपच कमी झाला आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

### मुठा नदी निळ्या पूररेषेत राजाराम पूल ते शिवणेपर्यंत रॅकेट

# पूररेषेत राडारोडा; पाच एकर जागेत 'कमाई'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कर्वे रस्त्याच्या बाजूला राजाराम पूल ते शिवणेपर्यंत मुठा नदीच्या निळ्या पूररेषेत शेकडो टन राडारोडा टाकून जवळपास पाच एकर जागा तयार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या भूखंडाची किंमत काही कोटींमध्ये असून लगतचे जागामालक बांधकाम व्यावसायिकांना राडारोडा टाकण्यास परवानगी देऊन पैसे घेतात. याच जागा सपाट करून त्याचा व्यावसायिक वापर करतात आणि लाखो रुपये भाडे वसूल करतात. मात्र, महापालिका व जलसंपदा विभागात त्याची कल्पना कशी नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> "नदीपात्रात भराव टाकून भूखंड निर्माण केल्याचे समोर आले आहे. हा राडारोडा काढण्याचे काम सुरू आहे. मात्र, ही जबाबदारी जलंसपदा विभागाची आहे. त्यामुळे त्यांनाही सूचना केल्या आहेत. ज्यांनी राडारोडा टाकला, त्यांना नोटीस दिल्या आहेत."
> — **डॉ. राजेंद्र भोसले** आयुक्त, पुणे महापालिका

> "जुन्या इमारती पाडल्यानंतर राडारोडा नदी पात्रात टाकला जात आहे, त्यावर महापालिकेचे नियंत्रण नाही. एनडी स्क्वाडच बंद करून टाकल्याने कारवाई होत नाही, हा अतिशय ढिसाळ कारभार आहे. यावर कारवाई होणे गरजेचे आहे."
> — **ॲड. वंदना चव्हाण,** पुणे बचाव मोहीम

यामागे मोठे आर्थिक रॅकेट असल्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. मुठा नदीपात्रात सनसिटी रस्त्याच्या बाजूला ग्रीन बेल्टमध्ये, तसेच निळ्या पूररेषेत अनधिकृत बांधकामे अथवा राडारोडा टाकल्यास तत्काळ कारवाई केली जाते. मात्र, कर्वे रस्त्याच्या बाजूला दुर्लक्ष का केले. असा प्रश्न आहे. हे प्रकार सर्रास होत असताना महापालिका त्याकडे लक्ष देत नसल्याचे वास्तव आहे. यातील बहुतांश जागा जलसंपदा विभागाची आहे. नदीत भराव टाकून जागा तयार करणाऱ्यांनी याच परिसरात आपल्या जागा रस्त्यासाठी देण्यास नकार दिल्याचेही » पान ७ वर

## पुणे शहर कार्बन न्युट्रल करण्याच्या दृष्टीने शहराचा

# क्लायमेट अ‍ॅक्शन प्लॅन तयार होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** शहराची वाटचाल कार्बन न्यूट्रॅलिटीच्या दिशेने व्हावी यासाठी कार्बन उत्सर्जन, ग्रीन हाउस गॅस व वातावरण बदल या विषयावर काम करण्यासाठी व पुणे शहर कार्बन न्युट्रल करण्याच्या दृष्टीने शहराचा क्लायमेट अँक्शन प्लॅन तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेने प्रकाशित केलेल्या पर्यावरण अहवालात नमूद केली गेली आहे.

दरवर्षीप्रमाणे महापालिकेने शहराचा पर्यावरण विषयक अहवाल प्रकाशित करून त्यास मुख्यसभेने मंजुरी दिली आहे. शहरात जुलै २०२४ पर्यंत एकूण ३८,६३,८४९ नोंदणीकृत वाहने झाली आहेत. सन २०२३ मध्ये २,९३,४७१ नवीन वाहनांची भर पडली आहे. सन २०२२ मध्ये नवीन २,५४,९०७ वाहनांची भर पडली होती. यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांची संख्या १८०७३ आहे. पीएमपीएमएलच्या ताफ्यात एकूण १८८७ बसेस असून त्यापैकी ११८७ सी. एन. जी. व ४७३ इलेक्ट्रिक बस आहेत. पर्यावरणपुरक इंधनावर चालणाऱ्या बसेसचे प्रमाण ८८ टक्के असून, यामुळे शहरातील वायू प्रदूषणाबरोबरच ध्वनी प्रदूषणाची पातळी देखील कमी होत आहे, असा दावा प्रशासनाकडून या अहवालात केला आहे. इलेक्ट्रीक बसच्या वापरामुळे अंदाजे ७ हजार टन कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत झाली आहे.

### इतर महत्वाचे मुद्दे

- उरुळी फुरसुंगी कचरा डेपो येथे बफर झोन अमृत वन अंतर्गत ३०,००० वृक्षांची लागवड केली आहे.
- विविध स्मशानभुमीत अंत्यसंस्कारासाठी ४४ टक्के लाकडाचा वापर तर ५६ टक्के नागरिकांची विद्युत व गॅस दाहिनी वापरण्याकडे कल.
- शहराची उर्जेची मागणी मागील ५ वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढली असून, ती साधारण २८ टक्के आहे.
- मागील पाच वर्षांत सौर ऊर्जेच्य वापरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून सौरऊर्जेचा सॅक्शन लोड
- ७९,६९८ किलो व्हॅट इतका झाला आहे.

शहर व परिसरात विविध पक्षी आढळून येत आहेत. शहराच्या पूर्व भागातील कवडीपाठ या ठिकाणी सर्वाधिक २६३ प्रजाती, तर एआरएआय टेकडीवर २५३, पाषाण तलाव परिसरात २३६ प्रजातींचे पक्षी आढळून आले आहेत. शहरात प्रतिदिन तयार होणारा घनकचरा २१०० ते २२०० मे.टन इतका असून, ओला कचरा ९५० मे. टन कचऱ्यावर यावर कंपोस्टिंग, बायोगॅस, बल्क वेस्ट जनरेटर, होम कम्पोस्टिंग, शेतकऱ्यामार्फत जिरवला जाणारा कचरा. ओल्या कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅसमधून (सीबीजी) वापर वाहनांसाठी इंधन स्वरुपात वापरण्यास सुरुवात केली आहे. बाराशे टन सुका कचऱ्यावर रीफ्युस डीराईव्हड फ्युएल, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (एमआरएफ), कचरा वेचकांमार्फत रिसायकल, सिमेंट कंपनीस थेट वापरण्यावर भर दिला जात आहे.

## आ. शिरोळे यांच्याकडून दिलगिरी व्यक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला राज्यातील महिला वर्गाकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असून १ कोटींहून अधिक महिलांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले आहेत. दुसऱ्या बाजूला विरोधकांनी या योजनेवरुन टीका करण्यास सुरुवात केली. तर ही योजना राज्यातील प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचली पाहिजे. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या आमदारांकडून मोठ्या प्रमाणावर बॅनरबाजी करण्यात येत आहे.

शहरातील शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील भाजपचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्याकडून लावण्यात आलेल्या बॅनरमुळे नव्या वादाला सुरुवात झाली. परंतु, सोशल मीडियावर जो फोटो व्हायरल होत आहे. तो २०१६ या वर्षातील आहे. आम्ही तो फोटो एका एजन्सीच्या माध्यमातून विकत घेऊन सर्व प्रक्रिया पूर्ण करूनच वापरला आहे, असे स्पष्टीकरण आ. शिरोळे यांनी दिले आहे.

## Selected

## सेवाधाम वृध्दाश्रमाला जीवनावश्यक वस्तूंची भेट



**पुणे :** कै.किरण रवींद्र म्हैसुरकर यांच्या स्मरणार्थ नुकत्याच स्थापन झालेल्या किरण सोशल फाउंडेशनतर्फे सेवाधाम वृध्दाश्रमाला धान्य,तेल,तूप,ड्राय फ्रूटस,आंघोळीसाठी लागणाऱ्या बादल्या असे जीवनावश्यक साहित्य भेट देण्यात आले. ज्येष्ठ स्वयंसेवक दीपक(काका) देशपांडे व ज्योती देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. अन्वेशा देशपांडे यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्यातर्फे संस्थेतील सर्वांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.फाउंडेशनचे सभासद अभिषेक बंजारे यांच्यातर्फे साखर,तेल, संतोष ठाकूर यांच्यातर्फे साफसफाईचे व इतर साहित्य, भूपेंद्र धायगुडे यांच्यातर्फे खाद्यतेल भेट देण्यात आले.यावेळेस संस्थेचे रवींद्र सरवदे,नीलेश कुलकर्णी,अतुल धुमाळ,चेतन पानसरे,अजिंक्य देशपांडे,सुशांत बरकडे,अमोल पाटील,रेणुका सरवदे,ऋचा देशपांडे,सुचित्रा कुलकर्णी,स्वप्ना म्हैसुरकर,भूपेंद्र धायगुडे, संतोष ठाकूर, अभिषेक बंजारे सर्व सभासद उपस्थित होते. 'किरण सोशल फाऊंडेशन' या सामाजिक संस्थेची ही सुरवात असून याद्वारे समाजातील गरजू घटकांना,आपण काही तरी समाजाचे देणे लागतो, या हेतूने मदत करण्याचा प्रयत्न आहे.

## राष्ट्रसंचार विशेष रा

## पावसाने बंद पाडल्या चुली

### जीवनसंघर्ष

**पुणे :** मागील ५ ते ६ दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे वारजे मजूर अड्ड्यावर कमालीची गर्दी वाढली आहे. 'हाताला काम मिळावे' यासाठी हे मजूर येत आहेत. मात्र, संततधार सुरू असलेल्या पावसामुळे काम मिळत नसल्याचे वास्तव आहे. त्यामुळे जगावे तरी कसे, असा सवाल हे मजूर उपस्थित करीत आहे. पुणे शहर, पिंपरी - चिंचवड, भोसरी मिळेल त्या ठिकाणी हे मजूर कामाला जातात. त्यांना ४०० ते ५०० रुपये रोज दिला जातो. त्यामध्ये ठेकेदार आणखी पैसे कमावून मजुरांना थोडेच पैसे देत असल्याची माहिती मजुरांनी दिली. सध्या बांधकाम व्यवसाय बंद अवस्थेत आहे. त्यामुळे मजुरांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. रोज सकाळीच मजूर अड्ड्यावर कामासाठी कामगार गर्दी करतात. वारजे (रामनगर) भागातील हे मजूर झोपडपट्टीत राहतात. त्या ठिकाणी दाटीवाटीने वास्तव्य करतात. लेकराचे शिक्षण, आरोग्य, रोजचा लागणारा भाजीपाला यासाठी पैसे तर मोजवेच लागत असल्याचे राजीव साबळे यांनी सांगितले. सध्या महागाईच्या काळात काम करणे आवश्यक आहे. या मजूर अड्ड्यावर महिलांचीही तोबा गर्दी असते. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून या महिला काम करतात. मोठ्या प्रमाणात मजूर उपलब्ध होत असल्याने तुटपुंज्या पैशातच कामाला जावे लागते. आज काम मिळाले की उद्या काम मिळणारच याची काहीही शाश्वती नाही.

> मी बीड जिल्ह्यातील असून आमच्या भागात काम नाही. त्यामुळे आम्ही पुणे गाठले. मात्र, या वारजे मजूर अड्ड्याखाली मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. ठेकेदार पैसे कमी देतात. त्यामुळे शासनाने आमच्यासाठी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घ्यावा.
> — भाग्यश्री तायडे



### सिंहगड सिबार इन्स्टिट्युटमध्ये आयोजन

## ग्रंथालय कार्यशाळेला चांगला प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** 'डिजिटल युगात शैक्षणिक ग्रंथालयामधील आवाहने आणि संधी' या विषयावर सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ बिसनेस अडमिनिस्ट्रेशन अँड रिसर्च कोंढवा येथे ग्रंथपाल आणि ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा पार पडली.

तीन सत्रामध्ये आयोजित कार्यशाळेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील जयकर ग्रंथालय विभागाचे माजी प्राध्यापक डॉ. राजेंद्र कुंभार, प्रोग्रेसिव्ह एजुकेशन सोसायटी, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट सायन्स कॉमर्स शिवाजीनगरच्या ग्रंथपाल डॉ. शांताश्री सेनगुप्ता, महाराष्ट्र एजुकेशन सोसायटी, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड कॅरियर कोर्सेच्या ग्रंथपाल प्रा. डॉ. मीनल ओक यांचा समावेश होता. या कार्यक्रमाला सिंहगड अकॅडमि ऑफ इंजिनीरिंगचे प्राचार्य डॉ. किशोर पाटील उपस्थित होते. प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार यांच्या हस्ते कार्यशाळेचे उदघाटन झाले. वडगाव - आंबेगाव शाखेच्या ग्रंथालयाच्या प्रमुख शोभा शेट्टी यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली.

संचालक प्रा. डॉ. धनंजय मंडलिक यांनी कार्यशाळेचा हेतू सांगितला. प्रा. डॉ. धनंजय मंडलिक आणि सिबार एमसीए महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. नेत्रा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल जयश्री शेंडकर यांनी आयोजन केले होते. संस्थापक अध्यक्ष प्रा. मारुती नवले, संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले, उपाध्यक्ष डॉ. रोहित नवले उपाध्यक्ष (एचआर) डॉ. रचना नवले-अष्टेकर उपाध्यक्ष (ॲडमिन) यांचे कार्यशाळेला सहकार्य होते.

### मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन

- ग्रंथपालांनी ग्रंथ देवघेव सोबत वाचन सल्लागार होणे ही काळाची गरज आहे. तसेच डिजिटल युगात कोणकोणती आवाहने व संधी आहेत त्याबद्दल डॉ. राजेंद्र कुंभार यांनी सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर डिजिटल युगात नवीन संगणकीय साधनांचा वापर करून ग्रंथालये वाचकांना कश्या प्रकारे ऑनलाइन सेवा देण्याचे कार्य करतील याबद्दल मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट सायन्स कॉमर्स, शिवाजीनगरच्या ग्रंथपाल डॉ. शांताश्री सेनगुप्ता यांनी दुसऱ्या सत्रात मार्गदर्शन केले कार्यशाळेच्या तिसर्या सत्रात वाचकांना डिजिटल साक्षर करण्यावर भर देऊन ग्रंथालयातील उपलब्ध डाटाबेसचा वापर चांगल्या प्रकारे कसा करावा याबद्दल आईएमसीसीच्या ग्रंथपाल प्रा. (डॉ.) मीनल ओक यांनी मार्गदर्शन केले.

## पूरग्रस्तांना ५ हजाराची मदत नको, भरीव रक्कम द्या



**पुणे :** मुठा नदीकाठच्या पूरग्रस्तांना राज्य सरकारने ५ हजाराची अपुरी मदत न देता नुकसानीच्या प्रमाणात भरीव मदत द्यावी, आणि मदतीचे वाटप त्वरीत व्हावे, अशी मागणी माजी आमदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केली आहे. गेल्या आठवड्यात संततधार पावसामुळे नदीला पूर आला. पुराचे पाणी नदीकाठच्या वसाहती, वस्त्या, सोसायट्या आदी भागांमध्ये शिरले. त्यामुळे छोटे दुकानदार आणि रहिवासी यांचे अतोनात नुकसान झाले आहे. काहींचे संसार वाहून गेले. दुचाकी, चारचाकी वाहनांचे नुकसान झाले. काही सोसायट्यांमध्ये रखवालदारांची घरे पाण्यात बुडाल्याने त्यांची अवस्था आजही बिकट आहे. या नुकसानीचे पंचनामे झाले आहेत. नुकसान झालेल्यांना नियमानुसार पाच हजार रुपये रकमेची मदत दिली जाते. पण, त्या ऐवजी नुकसानीच्या प्रमाणात मदत देण्यात यावी, अशी मागणी मोहन जोशी यांनी जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांना प्रत्यक्ष भेटून केली. याखेरीज नदीच्या पूररेषेबाबतही त्यांनी चर्चा केली. पूररेषा लवकरात लवकर निश्चित केली जावी आणि त्याकरिता प्रशासकीय प्रक्रिया चालू करावी, असेही माजी आमदार मोहन जोशी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. यावेळी काँग्रेस पक्षाचे चेतन अगरवाल, सुरेश कांबळे आणि राजेंद्र परदेशी उपस्थित होते.

## कात्रजमध्ये २१ लाखांचे मेफेड्रोन जप्त, राजस्थानमधील दोघे अटकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कात्रज :** परिसरात मेफेड्रोन (एमडी) विक्री करण्यासाठी आलेल्या राजस्थानमधील दोन तरुणांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्यांच्या ताब्यातून २१ लाख ३८ हजार रुपयांचे १०६ ग्रॅम मेफेड्रोनसह दुचाकी असा २२ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. श्रवणसिंग बलवंतसिंग राजपूत (वय २२, मूळ रा. नयानगर, जि. बाडमेर, राजस्थान) आणि महेश पुनाराम बिश्नोई (वय २०, मूळ रा. कुशलावा, जि. जोधपूर, राजस्थान) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. हे दोघे सध्या खराडी परिसरातील तुळजाभवानीनगरमध्ये राहतात.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजपूत आणि बिश्नोई मेफेड्रोन विक्रीसाठी कात्रज परिसरात दुचाकीवर येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून दोघांना पकडले. त्यांची झडती घेतली असता २१ लाख रुपये किमतीचे १०६ ग्रॅम मेफेड्रोन आढळून आले. या दोघा आरोपींविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज ठाकरेंच्या निशाण्यावर पवार काका-पुतणे

**पुणे :** पुण्यात मुसळधार झालेल्या पावसामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याची पाहणी करण्यासाठी आलेल्या राज ठाकरे यांनी पवार - काका पुतणे यांना लक्ष्य केले. धरणातून एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी सोडताना नागरिकांना त्याची कल्पना का दिली नाही? असा सवाल उपस्थित केला. उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुण्याचे आहेत. त्यांनी याकडे लक्ष का दिले नाही, असा सवाल उपस्थित केला. तर, महाराष्ट्राचा मणिपूर व्हायला शरद पवार यांनी हातभार लावू नये, असे बजावले. राज्यात मराठा - ओबीसी असा वाद निर्माण झाला आहे. त्यावरही राज यांनी नाराजी व्यक्त केली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज यांचा दोन दिवसीय पुणे दौरा चांगलाच गाजला. त्यांनी पूरग्रस्तांशी संवाद साधला. यावेळी मनसे शहराध्यक्ष साईनाथ बाबर, माजी नगरसेवक ॲड. किशोर शिंदे, बाबू वागस्कर उपस्थित होते. पुणे जिल्ह्यात २१ मतदारसंघ आहेत. त्यावर राज यांनी आढावा घेतला आहे. पुण्यात मनसेची मोठी ताकद आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीला राज ठाकरे चांगली टक्कर देऊ शकतात. २०१७ मध्ये मनसेचे तब्बल २९ नगरसेवक निवडून आले होते. यापूर्वी खडकवासला मतदारसंघात रमेश वांजळे आणि जुन्नर मतदारसंघात शरद सोनवणे निवडून आले होते. सध्या राज यांनी पुण्यात लक्ष घातले आहे. त्यासाठी पवार काका - पुतणे यांच्यावर टीका सुरू केली आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राज यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा दिला. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत मनसे महायुतीत सहभागी होणार असल्याची चर्चा होती. मात्र, राज यांनी मनसे २२५ ते २५० जागा लढणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता मनसेची तयारी ही 'ऐकला चलोरे'ची असल्याचे दिसून येते.

### चालकांचे आंदोलन

## आंदोलनामुळे प्रवाशांचे हाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारी पहाटेपासून काम बंद आंदोलन सुरू केले. आधीच पावसामुळे शहरात पाणी साचल्याने गंभीर परिस्थिती त्यात सकाळी तीन तास १४८ बस मार्गांवर धावल्याच नाही त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले. प्रलंबित मागण्या संचालक मंडळासमोर ठेवण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर कृती समितीने संप मागे घेतला आणि सेवा सुरळीत सुरू झाली.

सर्व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम विनाविलंब देण्यात यावी. सहा वर्षांपासून सेवेत असणाऱ्या बदली रोजंदारी सेवकांना सेवेत कायम करण्यात यावे. तसेच कर्मचाऱ्यांना वेळोवेळी पदोन्नती देणे अशा तीन मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

बससेवा बंद झाल्यास प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे शिवसेनेच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे पोलीस आयुक्तालय, स्वारगेट पोलीस स्टेशन, ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय आणि पीएमपी प्राशसनाला मागण्यांसह आंदोलनाबाबतचे पत्र दिले होते.

दरम्यान, रोजंदारी सेवकांना कायम करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, सहव्यवस्थापकीय संचालक नितिन नार्वेकर यांना आहेत. यावर्षी फेब्रुवारीमध्ये पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी बदली कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे उत्तर लेखी स्वरूपात दिले होते.

> प्रलंबित मागण्यांसाठी पीएमपीच्या बसचालकांनी बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले होते. परंतु, या कृती समितीबरोबर बोलणे झाले आहे. पीएमपीच्या व्यवस्थापकीय संचलाक मंडळासमोर सर्व मागण्या ठेवणार असल्याचे आश्वासन दिले. त्यामुळे कृती समितीने बेमुदत काम बंद आंदोलन मागे घेतले आहे. तसेच हडपसर डेपोसह सर्वच डेपोतील गाड्या नियमितपणे सुरु असून प्रवाशांना कोणताही त्रास नाही. — नितीन नार्वेकर,
> – सह व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल

## विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनेही कसली कंबर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसनेही कंबर कसली आहे. इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले आहे.

महाविकास आघाडीच्या जागावाटपात काँग्रेसने कसबा पेठ, पुणे कॅन्टोन्मेंट, पर्वती, शिवाजीनगर मतदारसंघावर दावा केला आहे. कसबा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांचा विजय झाला. त्यामुळे काँग्रेसचा कमालीचा आत्मविश्वास वाढला आहे. भाजपचा बालेकिल्ला असलेल्या कसबा मतदारसंघात भाजपचा पराभव करता येऊ शकतो, हा संदेश गेला आहे. दिवंगत खा. गिरीश बापट यांनी मोहन जोशी यांचा सव्वातीन लाख मतांनी पराभव केला होता. तर, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत रवींद्र धंगेकर यांचा भाजपचे मुरलीधर मोहोळ यांनी दीड लाख मतांनी पराभव केला. काँग्रेसच्या मतात वाढ झाली आहे. अनेक कार्यकर्त्यांना आता आमदारकीची स्वप्ने पडू लागली आहे. पर्वती विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे नेते आबा बागुल यांनी अनेक वर्षांपासून तयारी सुरू केली आहे. त्यामुळे काँग्रेस यावेळी तरी त्यांना संधी देणार का, याकडे लक्ष लागले आहे. कॅन्टॉन्मेंट मतदारसंघात माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे यांचा केवळ ५ हजार मातांनी भाजपचे आ. सुनील कांबळे यांनी पराभव केला होता. तर, शिवाजीनगर मतदारसंघात भाजपचे आ. सिद्धार्थ शिरोळे यांच्या समोर काँग्रेसचे दत्ता बहिरट यांनी तगडे आव्हान उभे केले आहे.

### गावांचा वाढता ताण बघता

# हडपसर - हवेली स्वतंत्र महापालिकेची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेवरील गावांचा वाढत ताण बघता हडपसर - हवेली स्वतंत्र महापालिकेची गरज निर्माण झाली आहे.

३४ गावांच्या समावेशामुळे पुणे महापालिकेवर प्रचंड ताण आला आहे. समाविष्ट गावातील प्राथमिक सोयीसुविधाही पुरविण्यात अडचणी येत आहेत. पुण्याचा वाढता विस्तार, नवीन महापालिकेची तातडीने गरज असल्याचे शरद पवार यांची स्पष्ट केले आहे. पुण्याचा वाढता विस्तार आणि नवीन गावांच्या समावेशामुळे शहरात स्वतंत्र महापालिकेची तातडीने गरज असताना ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शहरातील दुसऱ्या पालिकेची भूमिका पहिल्यांदाच जाहीरपणे मांडली. 'लोकसंख्येचा वाढता ताण ही पुण्यावरील भविष्यातील मोठी समस्या होऊ शकते. येत्या काळात हडपसर-हवेली ही स्वतंत्र महापालिका करण्याची गरज आहे,' असे शरद पवार यांनी सांगितले. गावांचा समावेश होऊन स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात पुणे महापालिकेला अपयश आले आहे.



रस्ते, कचरा, उद्याने, क्रीडांगण याची वानवा आहे. अशाही परिस्थितीत गावांमध्ये भरमसाठ टॅक्स आकारला जात आहे. टॅक्स देऊनही विकास होत नसल्याबद्दल गावकरी नाराजी व्यक्त करीत आहेत. महापालिकेत जाण्यापेक्षा आपला गाव बरा होता, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहे. ३४ गावांच्या प्रवेशामुळे पुणे शहर हे मुंबईपेक्षा मोठे झाले आहेत. प्रशासन मात्र तेच आहेत. त्यामध्ये कोणतीही वाढ झाली नाही.

> **गावांनाही २४ तास स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा**
> पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये २४ तास स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा. चांगले रस्ते तयार करण्यात यावे. वेळोवेळी कचरा उचलण्यात यावा. गावांच्या विकासासाठी आम्ही पाठपुरावा करीत असून विकासासाठी निधी प्राप्त झाल्याचेही ढोरे यांनी सांगितले.
> — गणेश ढोरे, माजी नगरसेवक

#रा

## नाट्यसंस्कार आयोजित नाट्यछटा स्पर्धेचे पारितोषिक वितरण



**पुणे :** नाट्यक्षेत्रात येणाऱ्या मुलांनी शरीरयष्टी सुदृढ ठेवावी, ओंकारसाधना करण्याबरोबरच बहुश्रुतता अंगी बाळगावी, असा सल्ला ज्येष्ठ एकपात्री कलाकार प्रभाकर निलेगावकर यांनी दिला. नाट्यछटा हे एकपात्रीचेच मूळ रूप आहे, असेही ते म्हणाले. नाट्यसंस्कार कला अकादमीतर्फे घेण्यात आलेल्या ३३ व्या दिवाकर स्मृती नाट्यछटा स्पर्धेची अंतिम फेरी व बक्षीस वितरण समारंभ निवारा सभागृहात आयोजित करण्यात आला होता. पारितोषिक वितरण निलेगावकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. नाट्य क्षेत्रात मुलांकडून काम करून घेताना पालकांचा पाठींबा मिळणे आवश्यक आहे. नाट्यछटा हे कमी वेळात उत्कृष्ट सादरीकण करण्याचे एक माध्यम असल्याचे निलेगावकर म्हणाले. नाट्यसंस्कार कला अकादमीचे प्रमुख विश्वस्त प्रकाश पारखी, विश्वस्त संध्या कुलकर्णी, अभिनेता नचिकेत देशपांडे मंचावर होते. निवारा सभागृह येथे कार्यक्रम झाला.प्रास्ताविका प्रकाश पारखी यांनी संस्थेच्या वाटचालीची तसेच संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी नाट्यसंस्कारतर्फे घेण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली. ५१ स्पर्धक अंतिम फेरीसाठी निवडण्यात आले. अंतिम फेरीचे परीक्षण पुष्कर देशपांडे, नचिकेत पूर्णपात्रे, अमोल जाधव, पद्मजा माने-मोरे, अश्विनी आरे यांनी केले.

# शहरातील मुख्य रस्त्यांची चाळण

**हडपसर, मुंढवा, हांडेवाडी, मंहमदवाडी परिसरातील रस्ता कमी खड्डे जास्त**


**पुणे :** हडपसर-सासवड रस्त्यावर भेकराईनगर येथील ओढ्याचे कठडे तुटले आहेत, रस्त्याची अक्षरशः चाळण झाल्याने साक्षात यमदुतच दिसत असल्याची तक्रार वाहनचालकांनी केली आहे. खरंच रस्ता आहे का खड्डे आहेत, पालखी मार्ग म्हणवले जात असले तरी अद्याप या रस्त्याच्या कामाला मुहूर्त मिळत नाही. पालखी मार्गासाठी टेंडर काढले काम लवकरच सुरू केले जाईल, असे वारंवार राज्यकर्ते आणि प्रशासनाकडून सांगितले जात आहे. मात्र, अद्याप या रस्त्याच्या कामाला मुहूर्त मिळत नसल्याची तक्रार वाहनचालकांसह स्थानिक नागरिकांनी केली आहे.

तुकाईदर्शन चौक ते दिवेघाट दरम्यानचा रस्त्यात खड्डे, साईडपट्ट्या खचल्या आहेत, खड्डा चुकविताना पाठीमागिल वाहने धडकततात, त्यामुळे वाहनचालकांमध्ये तूतू मैमैचे प्रकार होत आहे. नोकरदार, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी घरी येईपर्यंत जीव टांगणीला लागत आहे. वाहनांच्या गर्दीबरोबर सासवड रस्त्यावर खड्ड्यांची गर्दी वाढली असल्याने दोघांशी सामना करताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे, तर पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तरीसुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागाला घाम का फुटत नाही, अशी विचारणा राजाभाऊ होले, ॲड. अमोल हरपळे यांनी केली.

उपनगरातील रस्त्याची पावसामुळे दाणादाण उडाली आहे. महंमदवाडीतील विठ्ठल मंदिर चौकातील खड्डा वाहनचालकांसह पादचाऱ्यांना अपघाताचे निमंत्रणच देत आहे. कात्रज बाह्यवळ मार्ग आणि हडपसर रस्त्यावरील मंतरवाडी चौकातील रस्ता चोरीला गेल्याची तक्रार वाहनचालकांनी केली आहे. या चौकातील खड्डे बुजविण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून पुढाकार घेतला जातो. मात्र, रस्ते विभागाकडून याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात आहे. मागिल तीन-चार दिवसांपासून संततधार पावसामुळे खड्डे पावसाच्या पाण्याने भरले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीचालक कोलमडून पडत आहेत, पादचारी अडखळून पडत आहेत, डोकी फटत आहेत, पाय मोडत आहेत, अशी अवस्था सासवड रस्त्यावर झाली असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले.







"महापालिकेने गाजावाजा करीत गावे समाविष्ट करून घेतली. भरमसाठ कर आकारला मात्र सुविधा कधी देणार आहे. रस्त्यातील खड्डे पावसाच्या पाण्याने भरल्याने वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे मुंढवा परिसरातील रस्त्यावर अपघाताची मालिका सुरू आहे. पालिका प्रशासनाने रस्ता नाही, तर किमान खड्डे तरी बुजवावेत." **— खंडेराव जगताप,** हांडेवाडी

"हडपसर माळवाडी येथील अमानोरा मॉलपाठीमागील रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहेत. पावसाच्या पाण्यात डांबरी रस्ता वाहून गेला आहे. खडी रस्त्यावर आल्यामुळे दुचाकी घसरून अपघात होत आहेत. पालिका प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी."**— सुधीर बांदल,** हडपसर

"मागिल तीन-चार दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्याची दैना झाली आहे. पावसाने उघडीप देताच खड्डे बुजविण्याचे काम युद्धपातळीवर केले जाईल. पुनावाला आदर्श फाउंडेशन आणि पुणे महापालिकेच्या माध्यमातून खड्डे बहुजविले जातील." **— बाळासाहेब ढवळे-पाटील,** सहायक आयुक्त, हडपसर क्षेत्रीय कार्यालय

## अवतीभवती
CITY UPDATE

### परिस्थिती निर्माण झाली याला जबाबदार कोण? : डॉ. गोऱ्हे



**पुणे :** पूर बाधितांशी संवादन पाणी सोडण्याचा निर्णय स्थानिक विभागातून झाला. मात्र, यामुळे शिवणे, सिंहगड परिसरासह इतरत्र पूर परिस्थिती निर्माण झाली. याला जबाबदार कोण? धरणातून पाणी सोडताना मार्गदर्शक सूचनांचे पालन केले नसेल, तर जलसंपदा अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल, असे स्पष्टोक्ती विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली. डॉ. गोऱ्हे यांनी पाटील इस्टेट येथील पूर बाधितांशी संवाद साधला. त्यानंतर महापालिकेत आयुक्तांसह बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. प्रशासनाने पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे लवकर करून त्यांना तत्काळ नुकसान भरपाई द्यावी, अशा सूचना देत डॉ. गोऱ्हे यांनी मदतकार्याचाही आढावा घेतला. पीएमपआरडीए अधिकाऱ्यांना लवळे येथील घटनेबाबत विचारणा केली असता, "आम्ही बांधकाम विभागाचे आहोत, आम्हाला काही माहित नाही' असे उत्तर आले. किती नुकसान झाले, आपत्ती व्यवस्थापन विभाग आहे का याची माहिती विचारली असता, संबंधित अधिकाऱ्यांकडे माहितीच नव्हती.यावेळी अग्निशमन दल सोडता कोणाला माहिती देता आली नाही. त्यामुळे पीएमआरडीएकडे आपती व्यवस्थापन यंत्रणाच नसल्याचे दिसून आले. त्यामुळे येत्या २४ तासात घटनेचा अहवाल देण्याच्या सूचना पीएमआरडीएला दिले. तसेच पीएमआरडीएच्या कारभारावर गोऱ्हे यांनी नाराजी व्यक्त करुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले.

### लावणीचा लोकनाट्याच्या चळवळीत मोठा वाटा : बावनकुळे



**पुणे :** गीत, नृत्य, अभिनय या तिन्हींचा उत्तम संगम म्हणजे लावणी. गेल्या काही वर्षांपासून लावणीला जागतिक स्तरावर ओळख, मान -सन्मान मिळत आहे. महाराष्ट्राची ही लोककला एका वेगळ्या उंचीवर पोहोचलेली आहे. लावणीला लोककलेच्या क्षेत्रात मानाचे स्थान आहे. तसेच लावणीचा लोकनाट्याच्या चळवळीत मोठा वाटा आहे, असे मत भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक प्रकोष्ठ, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने सांस्कृतिक कला व लावणी महोत्सवाचे आज आयोजन करण्यात आले होते. यावेळी बावनकुळे बोलत होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह,सातारा रोड, पद्मावती, येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला महामंत्री विक्रांत पाटील, आमदार सदाभाऊ खोत, आमदार अमित गोरखे, आमदार भीमराव तापकीर, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपकभाऊ मानकर,माजी आमदार जगदीश मुळीक, माजी नगरसेवक राजेंद्र शिळीमकर, श्रीनाथ भीमाले, वर्षा तापकीर ,अमृता मारणे, अ. भा. मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अभिनेत्री सुरेखा कुडची आदी उपस्थित होते.

‘नाफा’तर्फे अमेरिकेत प्रदान

## दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव



**पुणे :** सध्या मराठी चित्रसृष्टीत चर्चा सुरू आहे, ती म्हणजे ‘नाफा’च्या चित्रपट महोत्सवाची...अर्थात ‘नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशन’ आयोजित फिल्म फेस्टिव्हलची! चित्रपट निर्माते अभिजीत घोलप यांनी अमेरिकेच्या भूमीत मराठी चित्रपट रूजवण्याचे स्वप्न बघितले आणि ते सत्यात उतरवूनही दाखवले. अमेरिकेत सातासमुद्रापार मराठी चित्रपटांना एक अनोखं स्थान देत घोलप यांनी मराठी चित्रपटसृष्टीची पताका रोवाली. दिमाखात सुरू असलेल्या या चित्रपट महोत्सवात ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. महोत्सवाच्या निमित्ताने दिग्गज कलाकारांची मांदियाळीच अमेरिकेत अवतरली.

या ‘नाफा’च्या चित्रपट महोत्सवला दिग्गजांनी हजेरी लावली. तसेच सुप्रिया व सचिन पिळगांवकर यांनी सिनेरसिकांशी संवाद साधला. तर दिलीप प्रभावळकर, डॉ. सलील कुलकर्णी, दिग्दर्शक उमेश कुलकर्णी यांनी मास्टरक्लास घेतले.

## पुणेकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** मागील ५ ते ६ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे धरण क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू आहे. सध्या पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या चारही धरणांत तब्बल २५ टीएमसी म्हणजेच 86 टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे पुणेकरांच्या वर्षभराची पिण्याच्या पाण्याची काळजी मिटली आहे. पुण्याला दर महिन्याला दीड टीएमसी पाणी लागते.

खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रात दुपारी ३ वाजता २ हजार १४० क्यूसेक विसर्ग सुरू करण्यात येत आहे. पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानूसार विसर्ग कमी/जास्त करण्याची शक्यता आहे, असे उपविभागीय अभियंता, मुठा कालवा पाटबंधारे उपविभाग पुणे यांनी सांगितले. या चारही धरणांची एकूण क्षमता 29.15 टीएमसी आहे. धरण क्षेत्रात सध्या दमदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे पाणीसाठा झपाट्याने वाढत आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करणारी पानशेत, वरसगाव, टेमघर आणि वरसगाव धरणे भरण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे शेतीच्या पाण्याचा प्रश्न मिटण्याची चिन्हे आहेत.

**» गुड न्यूज**

जुलै महिन्याच्या शेवटीच ही धरणे भरणार असल्याने पुढे ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात आणखी दमदार पाऊस होणार आहे. त्यामुळे या धरणांतून मोठ्या प्रमाणात मुठा नदीत पाणी सोडण्यात येणार आहे. यापूर्वी 40 हजार क्यूसेक्स पाणी सोडले तर सिंहगड, विठ्ठलवाडी, एकता नगर, पुलाची वाडी परिसरात पाणी घुसले. त्यामुळे नागरिकांचे अतोनात नुकसान झाले. पाणीसाठा दुप्पट सोडला तर पुण्याचा विचारच न केलेला बरा. नैसर्गिक ओढे, नाले, नदीपात्रा लागत मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकण्यात आला आहे. सिंहगड रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत. त्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही.

भूजल संवर्धन आणि मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाबाबत

## खा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याकडून राज्यसभेत प्रश्न उपस्थित



**पुणे :** पुण्यासह संपूर्ण देशभरात अनेक मोठ्या शहरांमध्ये पाण्याचे गंभीर संकट गडद होऊ लागले आहे. भूजल पातळी घसरल्याने अनेक शहरांमध्ये बोअरवेलही कोरड्या पडू लागल्या आहेत. अनेक मोठ्या शहरांमधील लोक त्यांच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी संघर्ष करत आहेत. पावसाच्या पाण्याच्या साठवणीचा अभाव आणि वाढती लोकसंख्या यामुळे शहरांमध्ये पाणीटंचाई वाढली आहे.

दैनंदिन पाण्याची गरज भागवण्यासाठी लोकांची अडचण होत आहे. या समस्येवर उपाय व्हावा यासाठी खा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी राजयसभेत प्रश्न मांडला. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना २०१५-१६ या योजनेद्वारे शेतात पाण्याची उपलब्धता वाढवणे आणि जलस्रोत वाढवणे या उद्देशाने सुरू करण्यात आली.

**रेन वॉटर हार्वेस्टिंग पॉलिसी हवी**

● रेन वॉटर हार्वेस्टिंग संदर्भात एखादी पॉलिसी असावी, अशी मागणी केली. तसेच मुळा मुठा रेस्टॉरेशनसाठी यंदाच्या अंदाजपत्रकात ६९० कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर आधीच्या ९९० कोटींच्या निधीच्या माध्यमातून अनेक कामे करणे अपेक्षित होते या संदर्भातील माहिती केंद्र शासनाकडे मागितली आहे.

"पाणी हा राज्याचा विषय असल्याने जलस्रोतांच्या संवर्धन, संवर्धन आणि कार्यक्षम व्यवस्थापनासाठी संबंधित राज्य सरकारे पावले उचलतात. राज्य सरकारांच्या प्रयत्नांना मदत करण्यासाठी केंद्र सरकार विविध योजना आणि कार्यक्रमांद्वारे त्यांना तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य पुरवते." **— सी. आर. पाटिल,** जलमंत्री

शिवसेना महिला आघाडीकडून पालिकेला निवेदन

## मनपा शौचालयात महिलांची आर्थिक पिळवणूक



**पुणे :** मनपाच्या स्वछता गृहांमध्ये महिलांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबविण्या संदर्भात शिवसेना महिला आघाडीच्या वतीने महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी यांना निवेदन देण्यात आले.

पालिकेने शहरामध्ये अनेक निःशुल्क स्वछतागृह (शौचालये) उभारली असून त्याच्या वापरासंदर्भात महिला आणि पुरुष यांमध्ये भेदभाव केला जात आहे. पुरुषांना मोफत आणि महिलांकडून ५ ₹ ची मागणी केली जाते. पैसे नसल्यास अडवणूक केली जाते हा भेदभाव कश्यासाठी? या विषयी महापालिकेचा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने उपशहर संघटिका ज्योती चांदेरे यांनी निषेध केला.

## धक्कादायक ! पुण्यातील २१ वाहनांवर १०० पेक्षा जास्तवेळा कारवाई ?

**पुणे :** पुणे तिथे काय ऊणे ही म्हण आपण कायमच एकतो. अशात पुण्यात एक धक्कादायक बाब समोर आली आहे. पुण्यातील वाहन चालकांनी मोठ्या प्रमाणावर नियम तोडल्याची माहिती समोर आली आहे. तर दोन वाहन चालकांनी कारवाईने विक्रम मोडली आहे. दोन दुचाकी वाहनांवर त्यांच्या दुचाकीच्या किमतीपेक्षही जास्त वाहतूक दंड झाला आहे. तर एका वाहनावर १५४ वेळा वाहतूक नियम मोडल्याचा तर दुसऱ्या एका वाहनावर १३० वेळा वाहतूक नियम मोडल्याने वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. पुणे पोलिसांनी सर्वाधिक दंड झालेल्या काही वाहनांची माहिती घेतली असता त्यात २१ वाहनांवर १०० पेक्षा जास्त तर तब्बल ९८८ वाहनांवर ५० पेक्षा जास्त वेळा वाहतूक नियम मोडल्याबाबत कारवाई केली आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पोलिसांनी विविध पातळीवर काम करण्यास सुरुवात केली आहेत. शहर पोलिसांनी नियम मोडणाऱ्या गाड्या जप्त करण्याची कारवाई सुरू केली आहे. त्यानुसार आतापर्यंत ४४ गाड्या जप्त केल्या आहेत. प्रत्येक वाहतूक पोलीस विभागाला संबधित गाड्यावर कारवाई करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

**चालकांचे परमीट रद्द होणार**

● त्याचबरोबर वाहतूक नियमनाचे १०० व ५० पेक्षा जास्त वेळा नियम मोडणाऱ्या गाड्यामध्ये खासगी वाहतूक करणारे आणि दंड न भरणाऱ्या वाहन चालकांचे परमीट रद्द केले जाणार आहे. याचबरोबर वैयक्तीक मालक असणारे वाहन चालकांनी दंड न भरल्यास त्यांचा वाहन परवाना रद्द केला जाणार आहे. शहरात परिसरात ट्रिपल सीट जाणारे, फोनवर बोलत वाहने चालवणारे व विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनावर यापुढेही काळात कारवाई मोठी केली जाणार आहे. अश्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याने ही कारवाई वाढवली जाणार आहे.

वारजे जुना जकात नाका येथे वाहनचालकांचे घसरून अपघात

## तातडीने खोदकाम बुजवून रस्ता पूर्ववत करा



**कर्वेनगर :** वारजे जुना जकाता नाका येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सुरू असलेल्या एलएनटीच्या कामामुळे वाहनचालकांचे घसरून अपघात होत आहेत. त्यामुळे हा चौक अंत्यत रहदारीचा असून या ठिकाणी मोठी दुर्घटना घडू नये यासाठी पालिका प्रशासनाने तातडीने येथील रस्त्यावर खोदकाम व्यवस्थित बुजवून रस्ता पूर्ववत करावा अशी मागणी प्रमोद शिंदे यांनी केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाजवळ एलएनटी कंपनीकडून जलवाहिनी टाकण्यासाठी खोदकाम करण्यात आलेले आहे. परंतु लेन्स कार्ट समोर काम होऊनही गेले काही दिवस होऊन गेले तरी खोदलेला खड्डा व्यवस्थित बुजवण्यात आलेला नाही. मूळ रस्ता केलेले काम यात वरखाली अंतर राहिले असल्याने दुचाकी वाहने घसरून अपघात घडत असले तरी पालिका प्रशासन मात्र याकडे दर्लक्ष करत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रमोद शिंदे यांनी केला आहे.

**महापालिकेच्या ऑनलाईन तक्रार निवारण यंत्रणेचा नागरिकांनाच मनस्ताप**

नागरिकांकडून ऑनलाईन तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र तक्रार निवारण होण्याआधीच महापालिकेच्या संकेतस्थळावर तक्रार क्लोज करण्यात आली. महापालिकेतून फीडबॅकसाठी जेव्हा संबधित तक्रारदाराला संपर्क साधण्यात आला त्यावेळी काम झाले नसल्याचे तक्रारदाराने सांगितले. त्यावर महापालिकेकडून एका अधिकाऱ्याचा नंबर देऊन त्यांना संपर्क साधा असे सांगण्यात आले. या अधिकाऱ्याला संपर्क साधल्यानंतर त्यांनी हा विषय पाणी पुरवठ्याचा असे सांगून कॉल कट केला व पाणी पुरवठ्याचा नंबर पाठवला. म्हणजे महापालिकेची ऑनलाईन तक्रार यंत्रणा केवळ नावाला असून या तक्रार देणाऱ्या नागरिकांनाच मनस्ताप दिला जात असल्याचे दिसत आहे.

# स्वागतार्ह प्रस्ताव

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश न्या. डी. वाय. चंद्रचूड यांनी अलीकडेच एका महत्त्वाच्या मुद्दयाकडे देशाचे लक्ष वेधले आहे. प्रभावी न्यायव्यवस्थेसाठी स्थानिक भाषांचा अवलंब केला पाहिजे असे वक्तव्य यांनी केले आहे. एका चर्चासत्रादरम्यान बोलातना न्या. चंद्रचूड यांनी सांगितले की, अलाहाबाद उच्च न्यायालयात न्यायाधीश असताना त्यांना हे जाणवले होते की वकील त्यांच्या मातृभाषेत अधिक चांगल्या प्रकारे युक्तिवाद करू शकतात. वास्तविक पाहता, आपल्या देशात व्यावसायिक शिक्षणासाठी प्रवेश परीक्षेत आणि शिक्षणाचे माध्यम म्हणून भारतीय भाषांचाही समावेश करावा, अशी मागणी अनेक दशकांपासून होत आहे. मात्र वर्षानुवर्षे शिक्षणावर इंग्रजीचेच वर्चस्व राहिले आहे. गेल्या वर्षीही सरन्यायाधीशांनी याबाबत बोलताना असे म्हटले होते की, विधी विद्यापीठांमध्ये केवळ इंग्रजीमध्ये प्रवेश घेण्यासाठी कॉमन लॉ ॲडमिशन टेस्ट आयोजित करणे हा ग्रामीण भागातील उमेदवारांविरुद्ध आणि समाजातील वंचितांविरुद्धचा तो कायदेशीर व्यवसायाचा पक्षपातीपणा आहे. सरन्यायाधिशांची ही विधाने कायदेशीर व्यवसायातील सर्वसमावेशकतेच्या समस्येकडे निर्देश करतात. कायद्याच्या अभ्यासात इंग्रजीचे प्राबल्य आहे, बहुतांश कागदपत्रेही इंग्रजीत आहेत आणि सुनावणीतही इंग्रजीचे प्रभुत्व आहे. निवाडे देखील सामान्यतः इंग्रजीमध्ये लिहिले जातात. कनिष्ठ न्यायालयांमध्ये स्थानिक भाषांना थोडा वाव आहे, परंतु सर्वोच्च आणि उच्च न्यायालये, विशेष न्यायालये आणि न्यायाधिकरणांमध्ये इंग्रजीचा वापर प्राधान्याने केला जातो.काही दिवसांपूर्वी सरन्यायाधिशांनी न्यायाधीशांना सोप्या भाषेत निकाल लिहिण्याचा सल्ला दिला होता. जेणेकरुन तो सर्वांना समजण्यास सोपा होईल. अनेक देशांमध्ये कायदेशीर शिक्षण आणि न्यायालयीन कामकाजात प्रादेशिक भाषा वापरल्या जातात. अशा प्रणालीमुळे नागरिकांना न्यायिक प्रक्रियेत सहभागी होणे सोपे होते. तसेच त्यांना या व्यवसायात प्रवेश करण्यास देखील प्रोत्साहन मिळते. सरन्यायाधीशांनी असेही म्हटले आहे की जर विद्यार्थ्यांनी त्यांच्या मूळ भाषेत आणि संदर्भात कायद्याच्या मूलभूत तत्त्वांचा अभ्यास केला तर ते सामाजिकदृष्ट्या अधिक जबाबदार वकील बनतील आणि त्यांच्या समुदायांशी मजबूत संबंध देखील निर्माण होतील. न्या. चंद्रचूड यांच्या प्रयत्नांमुळे सर्वोच्च न्यायालयात तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर देण्यात आला आहे. जानेवारी २०२३ पासून आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचे विविध भाषांमध्ये भाषांतर करण्याचा प्रकल्प सुरू आहे. या अंतर्गत हिंदी, गुजराती, उडिया आणि तामिळ भाषांमध्ये निर्णय उपलब्ध करून दिले जात आहेत. अलीकडच्या काळात वैद्यकीय, व्यवस्थापन इत्यादी काही व्यावसायिक अभ्यासक्रम प्रादेशिक भाषांमध्ये शिकविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, परंतु त्याच्या विस्ताराची गती खूपच मंद आहे. या महिन्याच्या सुरुवातीपासून लागू करण्यात आलेल्या तीन नवीन कायद्यांचे विविध भाषांमध्ये भाषांतरही झालेले नाही. सरन्यायाधिशांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेला आता धोरणात्मक स्वरुप देऊन शासनानेही याबाबत पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्यातून आपल्या न्यायव्यवस्थेचे खऱ्या अर्थाने लोकशाहीकरण होण्यास मदत मिळणार आहे. न्यायालयीन कामकाज स्थानिक भाषांमध्ये केल्यास सामान्य नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास वाढेल आणि त्यांचे तिच्याशी भावनिक नाते निर्माण होईल, असे नमूद करून न्यायालयीन कामकाजासाठी स्थानिक भाषांचा वापर करण्याचे आवाहन मध्यंतरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही केले होते. राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४८ (१) मध्ये सर्वोच्च तसेच उच्च न्यायालयांतील कामकाजाची भाषा ही इंग्रजीच असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तरीही घटनेच्या अनुच्छेद ३४८ (२) नुसार, उच्च न्यायालयातील कामकाजासाठी स्थानिक भाषेचा वापर करणे शक्य आहे. त्यासाठी राज्यपालांनी राष्ट्रपतींना पत्रव्यवहार करून संबंधित राज्याच्या उच्च न्यायालयांतील कामकाज स्थानिक भाषेत करण्याची शिफारस करणे अनिवार्य आहे. अशी शिफारस केल्यास संबंधित उच्च न्यायालयातील कामकाज स्थानिक भाषांत केले जाऊ शकते. आजघडीला गुजरात, केरळ, ओडिशा आणि मध्य प्रदेश उच्च न्यायालयातील कामकाज स्थानिक भाषांमध्ये होते. अन्य राज्यांमध्येही आता याच धर्तीवर प्रादेशिक- स्थानिक भाषांना प्राधान्य दिले जाणे गरजेचे आहे.

**काही दशकांपासूनच्या बदलत्या स्थितीत आयक्यूच हे एकमेव मानसिक क्षमता पडताळणीचे मापक राहिलेले नाही. कारण काळानुसार मानसिक क्षमतेची वेगवेगळ्या पातळीवर पडताळणी केली गेली. म्हणून त्यांना वेगवेगळ्या स्थितीत पडताळून पाहण्यासाठी विविध निकष वापरले जात आहेत. उदा. आयक्यूशिवाय ईक्यू म्हणजेच इमोशनल कोशंट. एसक्यू म्हणजे सोशल कोशंट आणि अलिकडेच चर्चेत आलेला नवीन निकष एक्यू म्हणजेच ॲडव्हर्सिटी कोशंट. ॲडव्हर्सिटी कोशंटचा मूळ अर्थ विपरित स्थितीत दाखविलेले बौद्धिक चातुर्य. म्हणजेच कठीण काळात आपण किती कौशल्याने योग्य निर्णय घेतो आणि एखादे काम तडीस कसे नेतो, याकडे पाहिले जाते. एसक्यूचा अर्थ अडचणीच्या काळात बुद्धीचा केलेला कौशल्याने केलेला वापर होय. एखादा वाईट प्रसंग आला असेल आणि त्यातून बाहेर पडणे शक्य नसेल तर अशावेळी बुद्धिच्या जोरावर तो कसा बाहेर पडतो, यास एक्यू म्हटले जाते.**

# आता चर्चा 'एक्यू'ची


काही काळापूर्वी मेंदूची तार्किक क्षमता मोजण्याचे एकक असणाऱ्या आयक्यू (इंटेलिजंट कोशंट) म्हणजे बुद्ध्यांकांची पातळी चांगली असेल तर त्यास बुद्धिमान व्यक्ती मानले जात असे. कालोघात यामध्ये ईक्यू आणि एसक्यू म्हणजेच इमोशनल कोशंट आणि सोशल इंटेलिजन्स कोशंट जोडले गेले. त्याही पुढे जात सध्या बुद्ध्यांकाचा नवा निकष म्हणून एक्यूची जगभरात चर्चा होत आहे. एक्यू म्हणजे काय? आणि त्याला एवढे महत्त्व का दिले जात आहे?याबाबतचे विवेचन मोठे उद्बोधक आहे.

प्रत्येकाची बौद्धिक पातळी वेगवेगळी असल्यामुळे बुद्धीचे आकलन करणारे एकक किंवा निकष असणे गरजेचे होते. १९१२ मध्ये प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ विलियम स्टर्न यांनी पहिल्यांदा बौद्धिक क्षमतेचे आकलन करणाऱ्या आयक्यू म्हणजेच इंटिलिजन्स कोशंटची संकल्पना जगाला दिली. यासाठी काही निकष ठरवण्यात आले. आयक्यूच्या या निकषांनुसार प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक क्षमतेचे गुण वेगवेगळे असतात. हीच गुणसंख्या एखादा व्यक्ती किती हुशार किंवा किती कमी हुशार हे सांगते. अर्थात बुद्धिचे आकलन करण्याचे निकष हे नेहमीच वादात राहिले. कारण जगद्विख्यात शास्त्रज्ञ आईनस्टाईन यांचा आयक्यू १६० आणि न्यूटनचा आयक्यू १९० होता, त्याचवेळी १८९८ मध्ये न्यूयॉर्कमध्ये जन्मलेल्या विलियम जेम्स यांचा आयक्यू २५० ते ३०० असल्याचे सांगितले गेले. वास्तविक एखाद्या व्यक्तीचा आयक्यू १४५ ते १६० या दरम्यान असेल तर त्याला बुद्धिमान मानले जाते. मात्र विलियम जेम्स यांचा आयक्यू तर २५० ते ३०० दरम्यान होता. मग त्यांना कोणत्या श्रेणीत ठेवायचे, असा प्रश्न निर्माण झाला. जेम्स यांच्यात निश्चितच अलौकिक गुण होते? केवळ दीड वर्षाचे असताना त्यांनी वर्तमानपत्र वाचण्यास सुरुवात केली. वयाच्या ९ व्या वर्षी त्यांनी हॉर्वर्ड विद्यापीठात प्रवेश घेतला हाता. त्यांनी ४० भाषांत पदव्युत्तर पदवी मिळवली. असे चमत्कारिक गुण असणाऱ्या जेम्स यांच्या नावावर असले तरी व्यक्तिगत गुणांशिवाय जगात क्रांती घडवून आणणारे एकही संशोधन त्यांच्या नावावर नाही. अशा वेळी आईनस्टाईन आणि न्यूटन हे संशोधनाच्या निकषावर अतिप्रभावी ठरले. यावर बरेच मंथन होत असले तरी बुद्धिमापन चाचणीचा अन्य कोणताही पर्याय अस्तित्वात नसल्याने या निकषानुसारच आजतरी त्याचे आकलन केले जाते.

दुसरीकडे, गेल्या काही दशकांपासूनच्या बदलत्या स्थितीत आयक्यूच हे एकमेव मानसिक क्षमता पडताळणीचे मापक राहिलेले नाही. कारण काळानुसार मानसिक क्षमतेचे वेगवेगळ्या पातळीवर पडताळणी केली गेली. म्हणून त्यांना वेगवेगळ्या स्थितीत पडताळून पाहण्यासाठी विविध निकष वापरले गेले. त्यातून आयक्यूशिवाय ईक्यू म्हणजेच इमोशनल कोशंट आणि एसक्यू म्हणजे सोशल कोशंटची संकल्पना पुढे आली. त्यावरही बरीच चर्चा झाली. विशेषतः पालकत्व, संगोपन आणि मुलांची जडणघडण यामध्ये ईक्यू आणि एसक्यू महत्त्वाचे मानले गेले.

आता यामध्ये आणखी एक पैलू जोडला गेला आहे. तो म्हणजे एक्यू म्हणजेच ॲडव्हर्सिटी कोशंट. काय आहे ही संकल्पना?ॲडव्हर्सिटी कोशंटचा मूळ अर्थ विपरित अथवा प्रतिकूल स्थितीत दाखविलेले बौद्धिक चातुर्य. म्हणजेच कठीण काळात आपण किती कौशल्याने योग्य निर्णय घेतो आणि एखादे काम तडीस कसे नेतो, याचे मूल्यमापन करणारे एकक. एसक्यूचा अर्थ अडचणीच्या काळात बुद्धीचा केलेला कौशल्याने केलेला वापर होय. एखादा वाईट प्रसंग आला असेल आणि त्यातून बाहेर पडणे शक्य नसेल तर अशावेळी बुद्धिच्या जोरावर त्यातून सुयोग्य मार्ग काढत कशा प्रकारे उत्तर शोधले जाते, याला एक्यू म्हटले जाते.

या ॲडव्हर्सिटी कोशंटची सध्या खूप चर्चा आहे आणि सध्या कोणत्याही व्यक्तीचे बुद्धिमापन करण्यासाठी तोच सर्वात महत्त्वाचा निकष मानला जात आहे. मानसशास्त्रानुसार, एखाद्या व्यक्तीत आव्हानांचा मुकाबला करण्याचे कौशल्य किती आहे, त्याचे आकलन विपरित स्थितीतच केले जाते. कारण वाईट काळात



बहुतांश लोक सकारात्मकतेने बुद्धीचा वापर करू शकण्यास

शुभांगी कुलकर्णी, समाजशास्त्राच्या अभ्यासक

असमर्थ ठरतात. अनेक चांगले लोक आणि सज्जन, सद्गुणी मंडळी देखील रागाच्या भरात संयम गमावून बसतात. बरेचदा तर अशा व्यक्ती इतक्या वाईट पद्धतीने वर्तन करतात की अशिक्षित व्यक्तीही तशा प्रकारे वागत नाहीत. साहजिकच एक्यूच्या निकषांनुसार अशा लोकांना बुद्धीमान मानले जात नाही. ॲडव्हर्सिटी कोशंट हा प्रतिकूल परिस्थितीतील बुद्धीचे आकलन करणारा गुणांक आहे. प्रत्येक व्यक्ती हा आव्हानांचा मुकाबला आपापल्या पातळीवर करत असतो. ज्या व्यक्तीकडे आव्हानांवर मात करण्याची अचूक आणि परिणामकारक पद्धत असते तो सर्वात प्रभावी व्यक्ती ठरू शकतो. त्यामुळे अनेक यशस्वी मंडळी सामान्य स्थितीत फारसे बोलत नसतील, एरवी शहाणपणा दाखवत नसतील, परंतु एखाद्या वाईट काळातून ते अतिशय कौशल्याने वर्तन करत आणि रणनिती आखत बाहेर पडतात. कॉर्पोरेट सेक्टरमध्ये यशाच्या शिखरावर असणाऱ्या व्यक्तीचा आयक्यू महत्त्वाचा गृहित धरला जात नाही. कारण या पदापर्यंत तो पोचत असेल तर अर्थातच त्याची बौद्धिक क्षमता ही सामान्य लोकांपेक्षा अधिकच असते. या पातळीवर ईक्यू देखील महत्त्वाचा मानला जात नाही. कारण यशाच्या उंचीवर असलेल्या मंडळींना भावनिकदृष्ट्या खंबीर असतात आणि त्यांना या गोष्टी महत्त्वाच्या वाटत नाहीत. एवढेच नाही तर या ठिकाणी कनिष्ठ स्तरावर महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या सामाजिक संबंधांना देखील फारसे महत्त्वाचे स्थान दिले जात नाही. पण यशाची उंची गाठल्यानंतर अचानक अडचणीत सापडल्यास किंवा आव्हाने समोर ठाकल्यास अशा प्रतिकुल स्थितीत दाखविलेले बौद्धिक चातुर्य महत्त्वाचे ठरते. या कठीण काळात बुद्धीचा वापर करुन परिस्थितीवर मात करुन उद्दिष्टपूर्ती करण्याची क्षमता कितपत आपल्या अंगी आहे, याचे आकलन करण्याच्या दृष्टीने एक्यू महत्त्वाचा ठरतो.

गेल्या काही दशकांत बुद्धीमापनाच्या निकषावर लोकांची पडताळणी केल्यानंतर आता बहुतांश मानसशास्त्रज्ञ एका निष्कर्षाप्रत येऊन ठेपले आहेत, ते म्हणजे आयुष्यात सर्वात बिकट, वाईट, कठीण काळात दाखविलेली प्रसंगावधानता आणि बुद्धीचातुर्य हेच जीवनात सर्वांत महत्त्वाचे आहे आणि तेच आपल्याला वाईट काळातून बाहेर काढते. अशा प्रकारचे कौशल्य अनेक प्रकारे व्यक्त होते. स्वत:साठी सहानुभुती मिळवून, जबरदस्त इच्छाशक्ती, शिस्त, एकाग्रता या गुणांच्या जोरावर अशी बुद्धीमत्ता विकसित करता येते.

आज जगभरातील अनेकांची कितीही मालमत्ता वाढली असेल, प्रगती कितीही झाली असेल; परंतु सध्याच्या काळात दिसणारी निराशा, तणाव, अस्वस्थता, अपराधीपणाची भावना ही यापूर्वी कधीही दिसली नाही. त्यामुळे आर्थिक रुपातून आणि क्रयशक्तीच्या पातळीवर नागरिक समाधानी दिसत असले तरी मानसिक पातळीवर अस्वस्थांची भाऊगर्दी आहे. जुन्या काळातील लोकांच्या तुलनेत अधिक सधन असले तरी आपण निराशा अणि तणावाने घेरलेलो आहोत. अशा वेळी अडचणीतून बाहेर पडणे हे खरे बुद्धिमत्तेचे लक्षण. म्हणून आज ॲडव्हर्सिटी कोशंट किंवा कठीण काळातून कौशल्याने बाहेर पडण्याच्या गुणवैशिष्ट्यांना अधिक महत्त्वाचे मानले जात आहे.

क्रीडाविश्वामध्ये चांगला एसक्यू असणाऱ्यांची उदाहरणे प्रकर्षाने आढळतात. आपला संघ अडचणीत असताना संयमाने खेळी करत डाव सावरण्याबरोबरच विजयापथाकडे नेणारे अनेक खेळाडू आपण पाहिले. सांघिक खेळ असो वैयक्तिक खेळ असो अनेक खेळाडू गमावलेला सामना परत खेचून आणण्याची क्षमता बाळगातात. त्यामुळे असे खेळाडू संघासाठी, देशासाठी महत्त्वाचे असतात. अलीकडेच टी-२० विश्वकरंडक भारताने जिंकला. मात्र अंतीम सामन्यात विराट कोहलीची खेळी स्मरणीय राहिली. विशेष म्हणजे संपूर्ण स्पर्धेत विराट कोहली चालला नाही. मात्र अंतीम सामन्यात त्याची बॅट तळपली. त्याने ५९ चेंडूत ७६ दावा केल्या आणि या बळावरच भारताने दक्षिण आफ्रिकेवर मात केली. हा सामना गमावण्याचीच शक्यता निर्माण झाली होती. परंतु विराटच्या फलंदाजीने भारताला सन्मानजक धावसंख्या उभारता आली अणि त्यामुळे गोलंदाजांना दक्षिण आफ्रिकेचे गडी बाद करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला. यावरून विराट कोहलीचा एक्यू किती उच्च दर्जाचा आहे, हे कळून चुकते.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

बुधवार, दिनांक ३१ जुलै २०२४आषाढ कृ. ११, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू नक्षत्र : रोहिणी, योग : ध्रुव, करण : कौलव. शुभ दिवस कामिका एकादशी, नाना शंकरशेट पुण्यतिथी सूर्योदय : स.०६.१७ सूर्यास्त : सायं.०७.१२ वा.राहू काळ : दुपारी : १२:०० ते १:३०

### दिनविशेष

*१४९८ : कोलंबसाचे जहाज त्रिनिदाद्र बेटाच्या किनाऱ्यास लागले. *१८५७ : कोल्हापूर संस्थानात असलेल्या इंग्रजांच्या सत्ताविसाव्या बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्रीच्या दोनशे सैनिकांनी उठावाची घोषणा करून इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारले. *१८६५ : जगन्नात तथा नाना शंकरशेठ यांचे निधन. 'आधुनिक मुंबईचे शिल्पकार' असा त्यांचा लौकिक आहे. *१८७२ : संतचरित्रकार लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचा जन्म. *१८८० : 'गोदान' सारख्या भारतीय ग्रामीण पार्श्वभूमीवर कादंबऱ्या लिहिणारे हिंदी लेखक मुन्शी प्रेमचंद्र यांचा जन्म. *१८८२ : हेर्बड आईव्हज यांचा जन्म. तारेतून चित्र पाठवून त्याची पुन्हा जशीच्या तशी प्रतिमा मिळवता येते, हे त्यांनी सिद्ध केले. रंगीत छायाचित्रणातही त्यांनी सुधारणा घडवून आणली. तसेच दृष्टीची तीक्ष्णता शोधण्याचे यंत्र बनवले. *१९२१ : मुंबई येथे महात्मा गांधींच्या उपस्थितीत परदेशी कपड्यांची होळी. *१९५४ : जगातील उंचीच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर के-२ इटालियन गिर्यारोहकांनी सर केले. *१९८० : ज्येष्ठ पार्श्वगायक महम्मद रफी यांचे निधन.

### राशीभविष्य

*मेष : दिवस खर्चिक, कंटाळवाणा, कामे रेंगाळतील. *वृषभ : आर्थिक लाभाच्या घटना घडतील. *मिथुन : धंदा व्यवसायात महत्त्वाची घडना घडेल. *कर्क : वरिष्ठांची मर्जी सांभाळा. *सिंह : सदी-पडसे, शारीरिक व्याधी जाणवतील.*कन्या : स्वतः टरविलेल्या उद्दिष्टाच्या मागे लागाल.*तुळ : आर्थिक आवक अपेक्षेपेक्षा कमी व जेमतेम होईल. *वृश्चिक : कामाकेड दुर्लक्ष झाल्यास ते बिघडू शकेल. *धनु : घरगृहस्थीचय समस्यांकडे लक्ष द्याल. *मकर : गाठीभेटी, प्रवासासाठी धावपळ होईल. *कुंभ : अचानक खर्च उद्भवेल. *मीन : उत्साहाने कामे कराल.

### मेसेज आया

छोट्या राघूला शेजारणींन लोणी लावलेला पाव दिला. तो मिळताच राघू 'थँकू यू' म्हणाला, त्यावर शेजारीण कौतुकांन म्हणाली, ''अरे वा! एवढा लहान असूनही तुला 'थँकू यू' म्हणायचं ठाऊक आहे? त्यातून किती गोड आवाजात 'थँकू यू' म्हणालास! राघू, पुन्हा एकदा 'थँक यू' म्हणून दाखवतोस का?'' राघू म्हणाला, काकू! मी पुन्हा 'थँक यू' म्हणावं असं जर तुला वाटत असेल, तर या पावाला पुरेसा जॅम पण लाव ना.

### व्यक्तीविशेष

**महंमद रफी**

'चाहे कोही मुझे जंगली कहे...', 'सुहानी रात ढल चुकी', 'चौदहवी का चांद हो', 'तेरे मेरे सपने...' अशी एकाहून एक सरस गाणी रसिकांच्या मनात कोरून ठेवणाऱ्या गायक महंमद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ रोजी पंजाबमधील अमृतसरजवळील कोटला सुलतानसिंह या गावात झाला. त्यांच्या कुटुंबाचा गाण्याशी काही संबंध नव्हता. त्यांचे गाणे ऐकून त्यांच्या मोठ्या भावाने उस्ताद अब्दुल वहिद खान यांच्याकडे गाणे शिकण्यासाठी पाठवले. पुढे आकाशवाणीच्या एका कार्यक्रमात त्यांचे गाणे त्या काळातील प्रख्यात संगीतकार श्यामसुंदर यांनी ऐकले आणि त्यांना एका पंजाबी चित्रपटात गायची संधी दिली. त्यानंतर ते मुंबईत आले. संगीतकार नौशाद यांनी त्यांना 'अनमोल घडी' या चित्रपटात गायची संधी दिली. नंतर 'शहीद', 'मेला' आणि 'दुलारी' यात ते गायिले. पण त्यांना 'बैजू बावरा'तील गाण्यांनी लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. 'तू गंगा की मौज..', 'मन तडपत हरी दर्शन को...' अशी एकाहून एक सरस गाणी त्यात होती. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांनी आघाडीच्या सर्व नायकांना आपला आवाज दिला.

### जिज्ञासा

**सूक्ष्मशरीर शास्त्राची पायाभरणी**

सूक्ष्मशरीर शास्त्रज्ञ मार्सेलो माल्पिगी यांनी मानवी व कीटकांच्या शरीरातील विविध अवयवांचा आणि कीटकांच्या गर्भावस्थेचे निरीक्षण, संशोधन करून सुक्ष्मशरीरशास्त्राची पायाभरणी केली. मार्सेलो यांचा जन्म १६६८ मध्ये १० मार्च या दिवशी इटलीतील एका गावात झाला. लहानपणापासून विद्याध्ययनाची आवड असणाऱ्या मार्सेलोने आपल्या माता-पित्यांच्या मृत्यूनंतरही शिक्षण सुरू ठेवले. त्यांनी तत्वज्ञान व वैद्यकशास्त्रात बोलोग्न विद्यापीठाची डॉक्टरेट मिळवली. पिसा विद्यापीठात त्यांनी आपले संशोधन सुरू केले. वैद्यकीय प्रश्नांबाबत त्यांनी प्रस्थापितांना प्रश्न विचारून खळबळ निर्माण केली. यामुळे मार्सेलोला राजिनामा द्यावा लागला. ते पुन्हा बोलग्ना विद्यापीठात आले. १६६१ मध्ये त्यांनी प्रथमच फुफ्फुसातील निला व रोहिण्या यांना जोडणाऱ्या सुक्ष्म केशवाहिन्या असतात हे सूक्ष्मदर्शकाच्या मदतीने दाखवून दिले. विज्ञानातील हा खूप महत्त्वाच्या शोधाचा टप्पा होता. रोहिणीतून निलेमध्ये रक्त कशा प्रकारे येते यामागचे कारण मार्सेलोच्या पूर्वीचे शास्त्रज्ञ सांगू शकले नव्हते. रोहिणी आणि निलांना जोडणाऱ्या अतिसुक्ष्म केशवाहिन्यांचे अस्तित्व सुक्ष्मदर्शक यंत्राच्या खाली दाखवल्यामुळे मार्सेलोने पंधराशे वर्षांपासून मानल्या जात असलेल्या वैद्यकीय सिद्धांतांना धक्का दिला. त्या सिद्धातांनुसार रोहिण्यांमधील रक्त मोकळ्या जागेत जाते आणि त्यापासून शरीराचे अवयव बनतात, या प्रस्थापित विचाराला धक्का बसल्यामुळे त्यावेळच्या प्रस्थापित तज्ज्ञांनी मार्सेलोवर प्रचंड टीका केली. या विरोधाला कंटाळून शेवटी मार्सेलो सिसिली येथील व्हेसिना विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. आपला व्यवसाय सुरु असताना त्यांनी सुक्ष्मदर्शीय संशोधन सुरूच ठेवले. चवीचे संवेदन ग्रहण करणारे मज्जातंतू जिभेतील उंचवट्यांमध्ये असते हे त्यांनी दाखवले. तसेच रक्तातील लाल पेशी त्यांनीच प्रथम सुक्ष्मदर्शकाखाली बघितल्या. या पेशींमुळेच रक्ताला लाल रंग येतो, असा विचारही त्यांनी मांडला. या व्यतिरिक्त मेंदू, यकृत प्लिहा, मूत्रपिंड, हाडे, त्वचा या अवयवांचा सुक्ष्मदर्शकाखाली अभ्यास करून त्याची अचूक निरीक्षणे मांडली. याबरोबरच त्यांनी अनुमान काढले की आपल्या शरीरातील बहुसंख्य अवयव म्हणजे अतिशय सुक्ष्म अशा पेशींचा समूह होय. फलित अंड्यापासून कोंबडीचे पिल्लू बनवण्याच्या गर्भावस्थेतील निरनिराळ;या टप्प्यांचा अभ्यासही त्यांनी केला. वनस्पती आणि प्राणी यांच्या रचनेतील तुलनात्मक अभ्यास केला. मार्सेलो यांनी संशोधनात मोठे नाव मिळवले असले तरीही त्यांना स्थानिक विरोध तीव्र होता. १६८४ मध्ये त्यांचे घर जाळण्यात आले. त्यांची अभ्यासाची उपकरणे, कागदपत्रे नष्ट करण्यात आली. पण, मार्सेलो हरले नाहीत. आपला अभ्यास त्यांनी सुरूच ठेवला आणि वैद्यकीय संशोधनात खूप मोलाची भर घातली.

### व्यक्तिमत्व

**तणाव**

दल हा निसर्गाचा नियम आहे. कोणतीही वाईटच काय पण चांगली स्थितीसुद्धा तशीच काम राहात नसते. रात्रीमागून दिवस आणि दिवसामागून रात्र येतच असते. तेव्हा 'रात्रीच्या गर्भात उद्याचा उषःकाल' ही उक्ती लक्षात ठेवली पाहिजे. उद्याच्या उषःकालची खात्रीच आपल्याला रात्रीची भयानकता सुसह्य करुन देत असते.कोणत्याही छोट्या-मोठ्या अपयशाने खचून जाणारांनीही हीच बाब लक्षात ठेवली पाहिजे. अपयशातही यशाची बीजे असतात. कारण अपयशात काही तरी धडा मिळत असतो.

जो उद्याच्या यशाचा पाया बनतो. अपयश आल्यावर खचून न जाता अपयशाचे विश्लेषण करावे. त्यातून नवा काही धडा मिळाला आहे का याचा शोध घ्यावा. तसे काही सापडले की अपयशातही आपल्या चेहऱ्यावर हसू फुटते. यशाचा मार्ग पुन्हा नव्या जोमाने आक्रमायला नवे बळ येते. जगात यशाची उंच शिखरे गाठलेल्या यशस्वी महापुरुषांना एकामागे एक अशी सतत यशेच मिळाली आहेत असे घडत नसते. त्यांना अनेक अपयशांनी फटके मारलेले असतात. त्यांना पराभवांनी जखमी केलेले असते. आपण त्यांचे केवळ यशच पाहतो आणि त्यांना त्यांच्या नशिबाने साथ दिलीय म्हणून ते यशस्वी झाले आहेत असे समजतो पण त्यांनी पचवलेले पराभव आपल्याला माहीत नसतात. प्रत्यक्षात ते अनेक पराभव सहन करुन त्यापासून खूप काही शिकून यशाच्या शिखरापर्यंत पोचलेले असतात. सामान्य माणसाच्या जीवनात संकटे येतात, तसी संकटे महापुरुषांच्या जीवनातही येत असतात. पण या दोघांत फरक असा असतो की सामान्य माणसे संकटावर मात करीत नाहीत. मोठी माणे संकटावर मात करतात. त्यासाठी त्यांच्यातही सहनशक्ती, चिकाट, इच्छाशक्ती, आत्मविश्वास, सकारात्मक विचार आणि तणावाचे व्यवस्थापन करण्याची क्षमता हे गुण पणाला लागलेले असतात. म्हणूनच ते स्वतःच्या जीवनाचे शिल्पकार ठरलेले असतात.आपणही आपल्या जीवनाचे शिल्पकार बनू या.(समाप्त)

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक १८०**

| | | | |
|---|---|---|---|
| | 1 | 4 | 2 |
| 4 | | | 1 |
| 2 | 4 | | |
| 1 | | | |

**क्रमांक १७९ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 4 | 1 | 3 |
| 1 | 3 | 4 | 2 |
| 4 | 2 | 3 | 1 |
| 3 | 1 | 2 | 4 |

### महिलायन

**साइड टेबलची सजावट**

घरात गरजेनुसार फर्निचर असतेच; पण घरातील कोपऱ्यात सोफ्याच्या दोन्ही बाजूंनी स्पर्श करणारे साइड टेबल ठेवल्यास तो कोपरा भरलेला दिसतो. साइड टेबलशिवाय लिव्हिंग रूम परिपूर्ण वाटत नाही. साइड टेबल ठेवण्यासाठी ज्या खोलीत आवश्यक ती जागा आहे तेथे जरूर ठेवावे. जागा कमी असल्यास एखादा गोलाकार टेबल ठेवावा ज्यावर आपण डेकोरेटिव्ह पिस, पुस्तके किंवा खाण्या-पिण्याच्या वस्तू ठेवू शकतो. साइड टेबल हे केवळ लिव्हिंग रूमचे सौंदर्य वाढवते असे नाही तर फॅमिली रूममध्येही ते चांगले दिसते. येथे छोटेसे कॉफी टेबल ठेवावे. घरात हॉल असेल तर येथे लांब असे साइड टेबल करावे. ते सोफ्याचे काम करू शकते. हे सजवण्यासाठी काही डेकोरेटिव्ह पिस ठेवता येऊ शकतात. बेडरूममध्ये बेडच्या दोन्ही बाजूला साइड टेबल ठेवावे. त्यावर घड्याळ, चष्मा, पुस्तके, नाईट लॅम्प इत्यादी वस्तू सहजपणे ठेवता येऊ शकतात. बाथरूम मोठे असल्यास तेथेही साइड टेबल ठेवता येऊ शकतात. त्यावर बाथरूममध्ये आवश्यक असणारे सामान ठेवावे. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे साइड टेबल मिळतात. मध्यम आकाराचे साइड टेबल हे लाकडापासून बनलेले असते. खोलीतील फर्निचर व रिकामी जागा याचा विचार करून टेबलाची निवड करावी. त्यावर सुंदर कुंड्या, पुस्तके, टेबल लॅम्प इत्यादी काहीही ठेवता येईल. काचेचे टेबल ठेवण्याचा पर्यायही चांगला आहे. छोट्या आकाराचे टेबल बॉक्सेससारखे असतात. चौकोनी आकाराच्या या टेबलमध्ये आणि टेबलावर अशा दोन्ही ठिकाणी वस्तू ठेवता येतात. हे टेबल आपले ड्रॉईंगरूम अतिशय मोहक दिसण्यासाठी उपयोगाचे ठरते. फोल्डिंग ट्रे टेबल हे वजनाला हलके, पण उत्तम साइड टेबल आहे. यामुळे जास्त जागा व्यापली जात नाही. गरज वाटल्यास ते फोल्ड करूनही ठेवता येते. या टेबलाची स्वच्छताही सहज करता येते. हे टेबल मेटलचे किंवा लाकडाचे बनलेले असते. बाजारात सहजपणे मिळते. यावर कॉफी मग, पुस्तके किंवा बोन्सायचे झाड ठेवताही येऊ शकते. अशा प्रकारे वेगवेगळ्या साइड टेबलचा वापर करून आपण घरातील वेगवेगळ्या खोल्यांतील शोभा वाढवू शकतो.

### गंमतग्यान

**मृत समुद्र**

जगातील अधिक क्षारता असलेला आणि समुद्रसपाटीपासून सुमारे ३९७ मीटर पाण्याची पातळी खाली असलेला इझाएल-जॉर्डन या देशांच्या दरम्यानचा एक नैसर्गिक जलायश मृत समुद्र म्हणून ओळखला जातो. या समुद्राची दक्षिण उत्तर लांबी ७४ किलोमीटर, तर पूर्व पश्चिम रुंदी सुमारे १६ किलोमीटर असून त्याचे क्षेत्रफळ सुमारे ९३० चौरस किलोमीटर इतके आहे. संपूर्णपणे भूवेष्टित असलेल्या या समुद्रात प्राणीजीवन आढळत नसल्यामुळे ग्रीक नागरिकांनी त्यास 'मृत समुद्र' असे नाव रुढ केले. भूरचनेच्या दृष्टीने हा समुद्र जॉर्डनच्या भल्या मोठ्या खचदरीचा भाग आहे. शास्त्रज्ञांच्या मते तृतीयक कालखंडातील पृथ्वीच्या हालचालीमुळे या समुद्राची निर्मिती झाली असावी.

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# शंभर इंचांची पारदर्शक टीव्ही स्क्रीन



दक्षिण कोरियातील संशोधकांनी मोठ्या आकाराची व स्वस्त अशी पारदर्शक स्क्रीन बनवण्यात यश मिळवले आहे. त्यामुळे नजिकच्या भविष्यात ट्रान्सपरंट टीव्हीसाठी म्हणजेच पारदर्शक टीव्हीसाठी अधिक किफायतशीर स्क्रीन उपलब्ध होऊ शकते. एका नव्या प्रकारच्या फिल्म मटेरियलपासून संशोधकांनी ही शंभर इंची नॅनो ट्रान्सपरंट स्क्रीन (एनटीएस) बनवली आहे. ती मानवी केसाइतक्या जाडीची असून ती रंग व प्रकाशाच्या अत्युच्च गुणवत्तेसह अधिक तपशीलासह इमेज दाखवू शकण्यास सक्षम आहे.

या स्क्रीनच्या हलक्या आणि लवचिक वैशिष्ट्याबरोबरच त्याची पारदर्शकताही नियंत्रित करता येऊ शकते हे विशेष. अतिशय सूक्ष्म तपशीलही या स्क्रीनवर स्पष्ट पाहता येऊ शकतील. टार्गेटेड लाईटसाठीही ती अतिशय मोठ्या प्रमाणात रिफ्लेक्टिव्ह आहे. त्यामुळे एखाद्या पॉवरफुल प्रोजेक्टरमधून निघालेली बीम त्यावर धडकली की ती अत्यंत स्पष्ट प्रतिमा निर्माण करू शकते. तिच्यामध्ये १७० अंशाचा व्ह्युईंग अँगलही आहे. कोरिया इन्स्टिट्यूट ऑफ मशिनरी अँड मटेरियल्स (केआयएमएम) मधील संशोधकांनी 'मेटा पिपल' या खासगी कंपनीच्या सहकार्याने या स्क्रीनचे व्यावसायिक उत्पादन सुरू करण्याचे पाऊल उचलले आहे. या स्क्रीनसाठीच्या फिल्मची शिट टायटॅनियम डायऑक्साईडच्या सूक्ष्म कणांनी युक्त आहे. हे नॅनोपार्टिकल्स 'एनटीएस'ला अधिक काळ टिकण्याची आणि फिल्मची ऑप्टिक क्वॉलिटी सुधारण्याची क्षमता देते. याचा अर्थ त्यावर प्रोजेक्ट केलेल्या इमेज अतिशय स्वच्छ, स्पष्ट दिसतात. या फिल्मवर एका विशिष्ट अशा क्रिस्टल पॉलिमरचाही स्तर आहे. भविष्यातील पारदर्शक टीव्हीला या नव्या पारदर्शक व स्वस्त स्क्रीनचा लाभ मिळू शकतो.

# जपा पावसाळ्यातील ॲलर्जीपासून...

'नेमिचि येतो मग पावसाळा' असे असले, तरी दरवर्षी येणाऱ्या पावसाळ्यात आरोग्याची नव्याने काळजी ही घ्यावीच लागते. पावसाळ्याच्या ऋतूमध्ये अनेक आजार पसरतात. यामध्ये बुरशी संसर्गामुळे होणाऱ्या श्वसनाच्या आजारांचाही समावेश आहे. अस्थमा आणि ब्राँकायटिसची प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत. हवेतील परागकण, धुलीकण आणि ओलसरपणामुळे ॲलर्जीची समस्या उद्भवते. एखाद्या व्यक्तीला अशा ॲलर्जीमुळे दमा, ब्राँकायटिस, ॲलर्जीक राईनाइटिस आणि परागज्वर होण्याचा धोका अधिक असतो. पावसाळ्यातील ॲलर्जीचा धोका व त्यावरील उपायांची ही तज्ज्ञांनी दिलेली माहिती...



**बुरशीमुळे होणारी ॲलर्जी–** हवेतील दमटपणा आणि ओलावा हे बाथरूम आणि स्वयंपाकघशीच्या वाढीस कारणीभूत ठरते. शिंका येणे, खोकला येणे, डोळ्यातून पाणी येणे आणि श्वासोच्छवासाची समस्या यासारखी लक्षणे आढळतात.

**धुलीकण –** खाज सुटणे, छातीत घरघर होणे आणि त्वचेवर पुरळ उठणे यासह ॲलर्जीक प्रतिक्रिया आढळून येते.

**परागकण–** हे ॲलर्जीस कारणीभूत ठरते आणि नाक चोंदणे, घशाला खाज सुटणे आणि डोळ्यातून पाणी येणे अशी लक्षणे दिसून येतात.

**ॲलर्जीचे निदान –** ॲलर्जीचा शोध घेण्यासाठी स्पायरोमेट्री (फुफ्फुसाचे कार्य चाचणी) आणि ब्रोन्कोप्रोव्होकेशन चाचणी, एक्स–रे, शारीरिक तपासणी आणि रक्त चाचण्या केल्या जातात. तज्ज्ञांकडून वैद्यकीय इतिहास जाणून घेतला जाईल आणि विशिष्ट ॲलर्जीचे निदानाकरिता लक्षणांचा अभ्यास केला जातो. वेळीच योग्य उपचार सुरू केल्यास भविष्यातील त्रास कमी होतो.

**उपाय –** या स्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी तुम्हाला तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार औषधं घ्यावी लागतील. स्वतःच्या मर्जीने औषधोपचार करणं धोकादायक ठरू शकतं. पावसाळ्याच्या दिवसात ॲलर्जीचा धोका टाळण्यासाठी खाली दिलेल्या प्रतिबंधात्मक उपायांचा अवलंब करा. घराची नियमित साफसफाई केल्यास ॲलर्जीची समस्या टाळता येते. घरात हवा खेळती राहील हे सुनिश्चित करा आणि बुरशीची वाढ रोखण्यासाठी ह्युमिडिफायर वापरा.

# ज्युलिएट रोज... किंमत १३० कोटी!



गुलाबाचे फूल प्रेमाचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. गुलाबाचे फूल अनेक प्रकारांमध्ये आणि रंगांमध्ये उपलब्ध आहे, पण तुम्हाला जगभरातील सर्वात महाग गुलाब माहित आहे का? जगातील सर्वात महाग गुलाबाचं नाव आहे, ज्युलिएट रोज. ज्युलिएट रोज त्याच्या सुगंध, सौंदर्य आणि किमतीसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. आता तुम्ही म्हणाल, अशी किती किंमत असेल याची? १० रुपये, २० रुपये किंवा मग १०० रुपये... तर थांबा... तुम्ही चुकताय, ज्युलिएट रोजची किंमत अनेक कोटींमध्ये आहे. या गुलाबाच्या किमतीमध्ये तुम्ही मर्सिडीज, ऑडी आणि बीएमडब्ल्यू कार किंवा तीन मोठे बंगले विकत घेऊ शकता. तुमच्या आमच्यासारखे सर्वसामान्यच नाहीतर अगदी गडगंज श्रीमंत असणारे लोकही हा गुलाब विकत घेताना शंभरदा विचार करतील. या गुलाबाची किंमत आहे १३० कोटी रुपये!

जगातील सर्वात महागड्या गुलाबांमध्ये समाविष्ट होणारे ज्युलिएट रोज एवढे महाग का आहे? असा प्रश्वन तुम्हाला पडला असेलच. ज्युलिएट रोजची किंमत १३० कोटी रुपये आहे, असे म्हणताच आपल्या भुवया उंचावू शकतात. २००६ मध्ये जगाला पहिल्यांदा ज्युलिएट रोजची ओळख झाली. प्रसिद्ध रोज ब्रीडर डेविड ऑस्टिननं जगासमोर सर्वात आधी ज्युलिएट रोज सादर केलं. या रोज ब्रीडरनं अनेक गुलाबांच्या प्रजाती संकरित करून ज्युलिएट रोज तयार केले होते. त्यावेळी हे गुलाब तब्बल ९० कोटींना विकण्यात आले होते. ज्युलिएट रोजची किंमत ऐकून तुम्हालाही प्रश्न पडेल की, या गुलाबात नक्की आहे काय? एवढे महाग का? हे गुलाब उगवण्यासाठी तब्बल १५ वर्षांचा वेळ लागतो आणि ५ मिलियन डॉलर्स (जवळपास ३४ कोटी रुपये) लागतात. डेविड ऑस्टिनच्या वेबसाईटनुसार, ज्युलिएट रोजचा सुगंध चहाच्या गंधाप्रमाणे असतो. त्यामध्ये अनेक छोट्या छोट्या पाकळ्या एखाद्या गुच्छासारख्या असतात.

# घरबसल्या मिळवते ५० लाख!

पूर्वी घरी मनुष्यबळ असणे, हे प्रत्येकाकडेच शक्य असत नाही. त्यातही दोघेही नोकरीत असतील तर मुलांना सांभाळणार कोण, हादेखील अनेकांसमोर यक्ष प्रश्न असतो. विशेषतः विदेशात तर ही अडचण खूपच जाणवते. यातूनच बेबी केअर, डे केअरची संकल्पना समोर आली आणि या अभिनव व्यवसायातून होणारी कमाई तितकीच लक्षवेधी ठरते. ही गोष्ट अशाच एका महिलेची आहे, जिला ना ऑफिसला जाण्याचे टेन्शन आहे ना तिला कशाची घाई आहे. तरीही, घरात आरामात बसून ती वर्षाकाठी ५० लाख रुपये कमावते आहे. विशेष म्हणजे यासाठी तिला दिवसातून फक्त ६ तास काम करावे लागते. आता तिच्याकडे कोणतीही डिग्रीदेखील नाही. पण, तरीही सर्वांच्या गरजा लक्षात घेत डे केअरच्या क्षेत्रात कार्यरत झाली.



जितके महागडे शिक्षण आणि जितकी फॅन्सी पदवी तितकी उत्तम नोकरी, असे म्हणतात. पण, त्याची शाश्वती आजच्या घडीला तर देता येईलच, असे नाही. रोमा नॉरिस नावाची महिला मात्र याला अपवाद ठरते आहे. कोणतीही पदवी किंवा डिप्लोमा नसतानाही ४० वर्षीय रोमा स्वतः दोन मुलांची आई आहे आणि गेली १७ वर्षे पालक सल्लागार म्हणून काम करत आहे. तिचे आयुष्यात दोन डिग्री पूर्ण करायचे स्वप्न होते. पण, ते होऊ शकले नाही. मात्र, आता तिला कोणत्याही पदवीची गरज नाही. कारण, ती दर तासाला २९,००० रुपये सहज कमावत आहे. दिवसाचे ६ तास घरी काम करून ती एका वर्षात ५० लाख रुपयांहून अधिक कमावते. ती मुलांचे पालनपोषण कसे करावे, याबद्दल मार्गदर्शन करते. शिवाय, प्रसूती वेदनांमध्ये आईला आधारदेखील देते. दिवसाचे ६ तास घरी काम करून ती लोक तिच्याकडून ऑनलाईन सल्ला घेऊन यासाठी तिला फीदेखील देतात.

# बुधाच्या पोटात हिऱ्यांचा खजिना

बुध ग्रह अक्षरशः हिऱ्यांनी मढलेला आहे, असे एका नव्या संशोधनावरून दिसून आले आहे. या ग्रहाच्या जमिनीखाली १५ किलोमीटर जाडीचा हिऱ्यांचा दाट स्तर असल्याचे या संशोधनावरून आढळले. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'नेचर कम्युनिकेशन्स' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. नव्या संशोधनावरून बुधाची रचना आणि त्याचे वैशिष्ट्यपूर्ण चुंबकीय क्षेत्र याबाबतचे रहस्य उलगडण्यात यश मिळू शकते.



बुध हा ग्रह नेहमीच संशोधकांसाठी कुतुहलाचा आणि रहस्यमय असा राहिलेला आहे. बुध हा अतिशय छोट्या आकाराचा ग्रह असून तो भूगर्भीयदृष्ट्या म्हणजेच जिओलॉजिकली निष्क्रिय आहे. 'नासा'च्या मेसेंजर यानाच्या मोहिमेत त्याच्या पृष्ठभागावर अनेक काळे ठिपके दिसून आले होते. ते कार्बनचे एक प्रतिरुप असलेल्या ग्राफाईटचे असल्याचे नंतर स्पष्ट झाले. ग्राफाईटबाबतच्या या खुलाशानंतर यानहाओ लिन या संशोधकाचे कुतूहल अधिक चाळवले. ते चीनच्या बीजिंगमधील सेंटर फॉर हाय प्रेशर सायन्स अँड टेक्नॉलॉजी ॲडव्हान्स्ड रिसर्च या संस्थेमधील संशोधक आहेत. बुध ग्रहातील कार्बनचे उच्च प्रमाण पाहता त्याच्या अंतर्गत भागात काही तरी विशेष असू शकेल, असे मला वाटले, असे त्यांनी सांगितले. २०१९ मधील एका संशोधनावरून आढळले होते की त्याचा मँटल हा आधीच्या अनुमानापेक्षा बराच खोल म्हणजे पृष्ठभागापासून ५० किलोमीटर खोलीवर आहे.

कोअर आणि मँटलदरम्यानच्या सीमेवरील उच्च तापमान आणि दाबामुळे तेथील कार्बनचे रुपांतर हिऱ्यांमध्ये झाले आहे. लिन यांच्या नेतृत्वाखाली चिनी व बेल्जियन संशोधकांनी याबाबतचे संशोधन केले. त्यामध्ये आढळले की बुध ग्रहाच्या पोटात १५ किलोमीटर जाडीचा हिऱ्यांचा स्तर आहे. तो पृष्ठभागापासून ४८५ किलोमीटर खोलीवर असू शकतो.

# कहाणी महाविषारी माशाची

मासे खाणे हा अनेकांचा वीक पॉईंट असतो. सी फूड प्रेमींना विविध प्रकाराच्या माशांची माहिती असते. मासे आहारात असणे अनेक दृष्टीने लाभदायी मानले जाते आणि मासे खाण्याचा सल्लाही दिला जातो. मात्र, काही मासे असेही असतात, ज्यापासून दूर राहणेच अधिक श्रेयस्कर असते. यातील एका माशाचे विष तर सायनाईडपेक्षाही अधिक असते आणि हा मासा आहे स्टोन फिश. या जगातील सर्वात विषारी माशाला स्टोन फिश नाव कसे पडले, याची कहाणी रंजक आहे. हा मासा दिसतोच मुळात दगडासारखा. यामुळे, त्याला स्टोनफिश नावाने ओळखले जाते. दगडासारख्या दिसण्यामुळे लोक त्याला ओळखू शकत नाहीत आणि त्याचे बळी बनतात, असे अनेकदा दिसून आले आहे. कोणताही जीव त्याच्या संपर्कात येताच त्याच्या शरीरातून बाहेर पडलेल्या विषामुळे त्याचा मृत्यू होतो. चुकूनही त्यावर पाऊल पडले तरी मृत्यू निश्चित आहे, इतका हा मासा धोकादायक असल्याचे अभ्यासक सांगतात.



या माशाच्या शरीरातून न्यूरोटॉक्सिन नावाचे विष बाहेर पडते, त्याच्या विषाचा वेगही खूप वेगवान आहे. त्याचे विष अवघ्या ०.५ सेकंदात बाहेर पडू लागते. एखाद्या शहरातील पिण्याच्या पाण्यात स्टोन फिशच्या विषाचा एक थेंब मिसळला तर संपूर्ण शहर नष्ट होईल, इतके त्याचे विष धोकादायक असते. तज्ज्ञांच्या मते, या माशाच्या विषाच्या संपर्कात आल्यास मृत्यू निश्चित आहे. हे टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे विषाच्या संपर्कात आलेला भाग लवकरात लवकर कापून टाकणे. यामुळे, या धोकादायक माशापासून दूर राहणे हाच सर्वात योग्य मार्ग ठरतो, असे अभ्यासक म्हणतात.

# रोज कांदा का खावा?




कांद्याचा वापर विविध प्रकारचे पदार्थ बनवण्यासाठी केला जातो. कांदा केवळ जेवणाची चवच वाढवत नाही तर त्याच्या सेवनाने आरोग्यासाठी अनेक फायदे देखील होतात. कांदा उष्माघातापासून देखील आपला बचाव करू शकतो.

आहारतज्ज्ञ सांगतात की, कांदा उष्णतेपासून दिलासा देतो. कांद्यामध्ये नैसर्गिक कुलिंग गुणधर्म असतात. यामध्ये पाण्याचे प्रमाण भरपूरअसते, जे शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढतात. यामध्ये सोडियम आणि पोटॅशियम देखील आढळतात, जे शरीरातील इलेक्ट्रोलाइटस्चे संतुलन राखण्यास मदत करतात. कांद्यात आढळणारे क्वेर्सेटिन आणि सल्फर हे घटक शरीराला थंडावा देतात. कांद्यामध्ये फ्लेव्होनॉइडस्, पॉलिफेनॉल आणि सल्फर संयुगे यासारखी फायटोकेमिकल्स देखील आढळतात. हे घटक कांद्याचे अँटीऑक्सिडंट, अँटी–इंफ्लेमेटरी, अँटीमाइक्रोबियल आणि अँटी–कॅन्सर गुणधर्म वाढवतात. शरीराला सामान्य तापमान राखण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. यामुळे हृदय, फुफ्फुस आणि मूत्रपिंडांवर अतिरिक्त दबाव पडतो. कांद्यामध्ये असलेले एलिल सल्फाइड्स रक्तवाहिन्या विस्तारण्यास मदत करतात, ज्यामुळे रक्तदाब कमी होतो आणि रक्त परिसंचरण सुधारते. कांदा पाचक एंझाइम सक्रिय करून पोटातील गॅस आणि अपचन सारख्या समस्यांपासून बचाव करतो. कांद्यामध्ये भरपूर फायबर आणि प्रीबायोटिक्स असतात. हे आपल्या आतड्यांमध्ये राहणाऱ्या चांगल्या जीवाणूंचे पोषण करतात आणि हे जीवाणू पचनासाठी आवश्यक असलेले लहान फॅटी ॲसिड तयार करतात. कांद्यामध्ये आढळणारे क्रोमियम रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करते. मधुमेहाचे रुग्ण असाल तर तुमच्या आहारात कांद्याचा समावेश जरूर करा. कांद्यामुळे लघवी तयार होण्याची प्रक्रिया वाढते. शरीरातील खराब पदार्थ सहज बाहेर काढता येतात. कांद्यामुळे पुरुषांमधील टेस्टोस्टेरॉन हार्मोनचा स्तर वाढण्यासही मदत मिळते.

# शार्क माशांमध्ये आढळले कोकेन

ब्राझीलच्या समुद्र किनाऱ्याजवळील पाण्यातील अनेक शार्कची कोकेनसाठी केलेली चाचणी सकारात्मक आली असल्याने चिंता व्यक्त होत आहे. फ्लोरिडा, दक्षिण आणि मध्य अमेरिकेत सापडलेल्या कोकेनसह तस्करांनी पाण्यात टाकलेल्या औषधांमुळे समुद्राच्या जीवनावर परिणाम होऊ शकतो, असे संशोधकांनी फार पूर्वीपासून सुचवले आहे. ब्राझीलमधील ओस्वाल्डो क्रूझ फाऊंडेशनच्या अभ्यासात आता पुरावा सापडला आहे की शार्क माशांवर समुद्र प्रदूषित करणाऱ्या औषधांचा प्रभाव पडतो. शास्त्रज्ञांनी १३ ब्राझिलियन शार्पनोज शार्कचे विच्छेदन केले तेव्हा हा निष्कर्स समोर आला सर्व १३ शार्कची चाचणी सकारात्मक आली त्यांची एकाग्रता इतर जलचर प्राण्यांच्या तुलनेत १०० पट जास्त होती, असे शास्त्रज्ञांना आढळले.



शार्कमध्ये कोकेनची उपस्थिती शोधण्याचा हा पहिला अभ्यास आहे आणि शार्कच्या यकृतापेक्षा स्नायूंच्या ऊतींमध्ये हा पदार्थ जास्त प्रमाणात आढळून आला. अभ्यासात असे म्हटले आहे की, हे संशोधनाचे क्षेत्र अत्यंत मर्यादितआहे आणि कोकेनचा जलचरांवर होणारा परिणाम पूर्णपणे ज्ञात नाही. हे संशोधन सायन्स ऑफ द टोटल एन्व्हायर्नमेंट या आउटलेटमध्ये प्रकाशित झाले आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये, यूएस कोस्ट गार्डने कॅरिबियन समुद्र आणि अटलांटिक महासागरात १४,१०० पाउंड (६,४०० किलो) पेक्षा जास्त कोकेन जप्त केले होते, ज्याचे अंदाजे मूल्य १९ कोटी डॉलर्स होते.

# वेदनारहित रुटकॅनलच्या अंतरंगात...

आजच्या काळात मोठ्या लोकसंख्येची जीवनशैली ही व्यस्त बनली आहे. किंबहुना, अतिव्यस्त दिनक्रम, त्यातून वाढत चाललेले ताणतणाव, आहाराच्या बदललेल्या सवयी, पोषणाची कमतरता या सर्व गोष्टी आधुनिक जीवनशैलीच्या अविभाज्य घटकच जणू बनल्या आहेत. पण यामुळे शारीरिक आरोग्याचे मोठे नुकसान होत आहे. त्यातून अत्यंत कमी वयामध्ये विविध व्याधी जडण्याचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये तोंडाचे आरोग्य, दातांचे आरोग्य याबाबत तर मोठ्या प्रमाणावर अनास्था दिसून येते.

● सकाळी उठल्यानंतर कसे–बसे दात घासले म्हणजे आपली जबाबदारी संपली असा गैरसमज बहुतांश लोकांमध्ये दिसून येतो. परंतु बदलत्या काळात आहारविहाराच्या सवयी बदलल्या असून जंक फूड, फास्ट फूड, कोल्ड्रिंक, विविध प्रकारच्या मिठाया, चॉकलेटस्, खारवलेले पदार्थ यांचे सेवन दशकभरापूर्वीच्या तुलनेत जवळपास ३० ते ४० टक्क्यांनी वाढले आहे. या सर्वांचे शरीरावर तर प्रतिकूल परिणाम होतातच; पण दातांसाठीही हे पदार्थ अत्यंत हानिकारक ठरतात. कार्बोनेटेड पेयांमुळे, कृत्रिम शर्करेचे अतिप्रमाण असणारी चॉकलेटस सतत खाल्ल्यामुळे दातांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. नोकरदार मंडळींमध्ये दातांची नियमित स्वच्छता न केली गेल्यामुळे, दिवसभर वेफर्स, कोल्ड्रिंक्स, मद्यपान, तंबाखू, मद्यपान यांचे सेवन केल्यामुळे मौखिक आरोग्याला बाधा येते.



● खरे पाहता, दात ही मानवाला मिळालेली देणगी आहे. पण बहुतेकांना त्याचे मोलच समजलेले नाहीये. त्यामुळेच लहान मुलांपासून ते प्रौढ व्यक्तींपर्यंत सर्व वयोगटातील मुले, महिला, पुरुष यांच्यामध्ये दात किडण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. धक्कादायक बाब म्हणजे जोपर्यंत किडलेला दात किंवा दाढ दुखत नाही तोपर्यंत रुग्ण दंतवैद्यकांकडे जाणे टाळतात. पण जेव्हा दंतदुखी असह्य होते, अन्न खातानाच नव्हे तर पाणी पितानाही दातांमधून कळा येऊ लागतात, रात्री झोपही लागेनाशी होते तेव्हा मग उपचारांसाठी दंतवैद्यकाकडे धाव घेतली जाते.



● अशा किडलेल्या दातांसाठी रुट कॅनल ही उपचारपद्धती अत्यंत प्रभावी ठरते. ही पद्धती सर्वत्र वापरली जाते; परंतु त्यासाठी रुग्ण टाळाटाळ करतात. याचे कारण पारंपरिक पद्धतीमध्ये रुट कॅनल करण्यासाठी बरेचदा डेंटिस्टकडे जावे लागते. तसेच या पद्धतीनुसार उपचार करताना वेदनाही सहन कराव्या लागतात. याशिवाय रुट कॅनल सुरू असेपर्यंत खाण्यापिण्याचे पथ्यही पाळावे लागते. त्यामुळे रुग्णांकडून यासाठी चालढकल केली जाते.

● आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आता या सर्व त्रासातून, कटकटीतून सुटका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आता वेदनारहित रूट कॅनल करण्याची पद्धत विकसित झाली असून त्याचा फायदाही अनेक रुग्णांना होत आहे. पेनलेस पद्धतीमध्ये तात्पुरती भूल देऊन दातांच्या मुळाच्या टोकापर्यंत जाऊन स्वच्छता केली जाते. तसेच आत निर्माण झालेली पोकळीही भरता येऊ शकते. इतकेच नव्हे तर त्यावर कॅप बसवल्यामुळे दात अगदी पूर्वीसारखे होतात. ही कॅप प्रामुख्याने मेटल किंवा सिरॅमिकपासून बनवलेली असते. त्यामुळे आता पूर्वीसारखे रुट कॅनल करण्यासाठी सतत डेंटिस्टकडे जाण्याची गरज राहिलेली नाही.

● आपले दात पृष्ठभागावर घन असतात; परंतु त्यांची त्वचा अतिशय संवेदनशील असते. दातांच्या बाहेरील आवरणाला इनॅमल म्हणतात. यामुळे दातांचे संरक्षण होत असते. त्याच्या आतील बाजूस कमी घनता असणारा एक थर असतो. त्याला डेंटिन म्हणतात. त्याच्याही आतमध्ये एक भाग असतो त्याला पल्प म्हणतात. या पल्पमध्ये अनेक पेशी, तंतू, तसेच मेंदूला वेदनांचे संदेश पाठवणाऱ्या नसा आणि रक्तवाहिन्या असतात. दातांना लागलेली कीड जेव्हा इनॅमलच्या थरातून त्याच्या आतल्या डेंटिनच्या थरापर्यंत पोहोचते तेव्हा गार वा गरम अन्नपदार्थ खाताना वेदना होऊ लागतात. या दातावर वेळीच उपचार न केल्यास ती कीड दाताच्या 'पल्प'च्या भागापर्यंत पोहोचते. अशा वेळी 'रूट कॅनाल' इलाज करण्यावाचून गत्यंतर उरत नाही.

● रुट कॅनल केल्यामुळे दात काढून टाकण्याची वेळ येत नाही. कॅनॉल झालेला दात वेदनारहित असल्यामुळे पूर्वीप्रमाणे आपण अन्न चावण्यासाठी त्यांचा वापर करु शकतो. बरेचदा लहान मुलांचे किडलेले दात काढल्यास येणारे पक्के दात हे वेडेवाकडे येण्याची भीती असते. पण लहान मुलांसाठीदेखील ही वेदनारहित आणि एकाच व्हिजिटमध्ये पार पडणारी रुट कॅनल पद्धती फायदेशीर ठरू शकते. एकंदरीत वेदनादायी पारंपरिक रुट कॅनल उपचारांना आता घाबरण्याची गरज राहिलेली नाहीये. अत्याधुनिक तंत्रामुळे एका तासात ही प्रक्रिया पार पडू शकते. एखाद्या अपघातामध्ये किंवा चालताना–खेळताना पडल्यामुळे किंवा मार लागल्यामुळे एखादा दात तुटला असेल तर तोही अगदी पूर्ववत करता येणे शक्य झाले आहे.

● **डॉ. अंजली साळुंखे**
दंतोपचारतज्ज्ञ

## लेखी परीक्षेची तारीख जाहीर

# पिंपरी-चिंचवड पोलीसदलात भरती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलाच्या आस्थापनेवरील २६२ पोलीस शिपाई पदांसाठी पोलीस भरती सुरु आहे. भरतीची लेखी परीक्षा १० ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता ताथवडे पुणे येथील श्री बालाजी विद्यापीठ येथे होणार आहे. दरम्यान १९ जून ते ११ जुलै या कालावधीत झालेल्या मैदानी चाचणी मधून सामाजिक व समांतर आरक्षण या बाबींचा विचार करत १:१० या प्रमाणानुसार २९८९ उमेदवारांची लेखी परीक्षेसाठी निवड करण्यात आली आहे.

राज्यात ९ हजार ५९५ पोलीस शिपाई पदे, १ हजार ६८६ चालक पोलीस शिपाई पदे, ४ हजार ४४९ सशस्त्र पोलीस शिपाई पदे, १०१ बँण्डसमन पदे, १ हजार ८०० कारागृह पोलीस शिपाई पदांची भरती सुरु आहे. पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात २६२ पदे भरली जाणार आहेत. त्यामध्ये सर्वसाधारण उमेदवारांसाठी ७९ पदे, महिला ७८ पदे, खेळाडू १५ पदे, प्रकल्पग्रस्त १४ पदे, भूकंपग्रस्त ४ पदे, माजी सैनिक ४१ पदे, अंशकालीन पदवीधर ११ पदे, पोलीस पाल्य ७ पदे, गृहरक्षक दल १३ पदे, अनाथ ३ पदे राखीव आहेत.

भरती प्रक्रियेत प्रथम शारीरिक चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये किमान ५० टक्के गुण मिळवणाऱ्या उमेदवारांमधून १:१० प्रमाणात उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी बोलावले आहे. त्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांनी लेखी परीक्षेत किमान ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. ४० टक्क्यांहून कमी गुण मिळवणारे उमेदवार अपात्र समजले जातील.



### १२ हजार उमेदवार मैदानी मधूनच बाहेर

● पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील २६२ जागांसाठी राज्यभरातून १५ हजार ४२ अर्ज आले. त्यामध्ये वकील, डॉक्टर, इंजिनिअर यासह पदव्युत्तर पदवी धारकांचा देखील समावेश होता. दोन तृतीयपंथी उमेदवारांनी देखील अर्ज केला. मात्र मैदानी चाचणी मध्ये उत्तीर्ण होऊन लेखीसाठी अवघे दोन हजार ९८९ उमेदवार पात्र ठरले. उर्वरित १२ हजार ५३ उमेदवार मैदानी चाचणी मधूनच बाहेर पडले.

### भरली जाणारी पदे

- ईडब्ल्यूएस – ६३ (२३)
- एसईबीसी – २४९(२४)
- इमाव – १२१९ (९९)
- विमाप्र – १४२ (१३)
- भ.ज.-ड – ०
- भ.ज.-क – १५२ (१२)
- भ.ज.-ब – ७१ (७)
- वि.जा.-अ – १२१ (१०)
- अ.ज. – २१५ (२०)
- अ. जा. – ७५७(५४)
- अराखीव - ०

## रावेतमध्ये दुषित पाणीपुरवठा

# नागरिकांच्या जीवाशी खेळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** रावेत येथील सोसायट्यांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून मिळणारे पाणी दुषित असल्याचे समोर आले आहे. यामुळे सोसायटील रहिवाश्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. गेली अनेक वर्षे या परिसरातील नागरिक स्वच्छ पाणीपुरवठ्याची मागणी करत आहेत. मात्र, त्यांच्या या मागणीकडे प्रशासन दुर्लक्ष करताना दिसत आहे.

सध्या शहरात अनेक साथीचे आजार झपाट्याने पसरत आहेत. डेंग्यू, मलेरिया, चिकन गुनिया सारख्या आजारांची लागण झालेल्या रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. त्यात आता होणाऱ्या दुषित पाणी पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे.

### विकतच्या पाण्याचा भुर्दंड

नळावाटे अशाप्रकारे दूषित पाणी येत असल्याने रहिवाशांना विकतचे पाणी आणावे लागत आहे. महिनाकाठी ४०० ते ५०० रुपये खर्च करावे लागत आहेत, तर नळाला रुमाल अथवा कापड लावून पाणी गाळून घावे लागत आहे.



### पाण्याच्या प्रेशरच्या असंख्य तक्रारी

● एवढंच नाही तर वाकड रस्त्यावरील मंगलनगर येथील भागात काही महिन्यांपूर्वीच जलवाहिनी बदलण्यात आली. जुनी मोठ्या व्यासाची जलवाहिनी बंद करून तुलनेने छोटे पाईप टाकण्यात आले. यास नागरिकांनी विरोध केल्यानंतर यामुळे पाण्याचा प्रेशर वाढेल असे सांगण्यात आले. प्रत्यक्षात यामुळे पाण्याचा प्रेशर आणखी कमी झाला आहे. संबंधित अधिकाऱ्यांना तक्रार करूनही एकही अधिकारी तेथे फिरकला नाही.

## » Selected

### श्री नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड नामदेव शिंपी समाज संस्थेच्या वतीने येत्या शुक्रवारी (दि. २ ऑगस्ट) रोजी संत शिरोमणी नामदेवमहाराज यांच्या ६७४ व्या संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवड नामदेव शिंपी समाज संस्थेचे अध्यक्ष एकनाथ सदावर्ते यांनी दिली. श्री संत नामदेव महाराज मंदिर व सांस्कृतिक सभागृह, साठे मळा, वाल्हेकरवाडी रस्ता, चिंचवड येथे सकाळी आठ वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी आणि नामदेवमहाराज यांच्या मूर्तींना अभिषेक, सत्यनारायण महापूजा करून सोहळ्याचा प्रारंभ होईल. त्यानंतर सकाळी दहा ते बारा या वेळेत श्री मोरया गोसावी मंदिर ते संत नामदेवमहाराज मंदिर या मार्गावर पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. पालखीचे आगमन मंदिरात होताच ठीक बारा वाजता नामदेवमहाराजांच्या मूर्तीवर पुष्पवृष्टी आणि विधिवत आरती करून समाधी सोहळ्याचा मुख्य कार्यक्रम होणार आहे.

### पीएमपीएमएल बसची दुचाकीला धडक, दोघांचा मृत्यू

**चिंचवड :** भरधाव वेगातील पीएमपीएमएलच्या बसने धडक दिल्याने दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला. ही घटना चिंचवड रेल्वे ब्रीजवर घडली. महेश भाऊसाहेब नरवडे आणि सागर अरूण कदम (वय १९, रा. कासारसाई, मावळ) अपघातात मृत्यूमुखी पडलेल्यांची नावे आहेत. याबाबत सुधाकर भाऊसाहेब नरवडे (वय २७, रा.थेरगाव) यांनी रविवारी (दि. २८) चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संभाजी शंकर राशिनकर (वय ३३, रा. भिमा कोरेगाव, शिरूर) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा भाऊ महेश आणि त्यांचा मित्र सागर हे दोघेजण दुचाकीवरून चालले होते. ते चिंचवड रेल्वे ब्रीज येथे आले असता त्यांच्या दुचाकीला पीएमपीएमएलच्या बसने धडक दिली. या अपघातात सागर आणि महेश या दोघांचाही मृत्यू झाला लो व दुचाकीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. चिंचवड पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### मामासाहेब खांडगे इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये हस्त पुस्तिकेचे प्रकाशन

**तळेगाव :** मामासाहेब खांडगे इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये मातोश्री तिलोत्तमा वसंतराव खांडगे उद्यानाच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित पर्यावरण पूरक प्रकल्पाच्या हस्त पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी नूतन महाराष्ट्र अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य विलास देवतारे, संस्थेचे अध्यक्ष गणेश खांडगे, सोनबा गोपाळे, संदीप पानसरे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजन आणि वृक्षारोपण करण्यात आले. इयत्ता आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांनी 'जागतिक तापमान वाढ' जागृती विषयक लघुनाटिका सादर केली. डॉ. विलास देवतारे यांनी इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन करून शाळेने जपलेला पर्यावरणाचा वसा असाच वृद्धिंगत करावा, असे मत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपाळे गुरुजी यांनी केले. सूत्रसंचालन चैताली ठाकूर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका, शाळा प्रशासन आणि शिक्षकवृंद यांनी विशेष सहकार्य केले.


### दुर्गा ब्रिगेडचे महिला बालविकास मंत्र्यांना निवेदन



**पिंपरी :** दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे संस्थापक अध्यक्ष दुर्गा भोर यांनी महिला तथा बालविकास मंत्री आदिती तटकरे यांना महिलांच्या रोजगाराच्या सुरक्षेसह अनेक योजनांना येणाऱ्या समस्यांबाबतचे निवेदन दिले. यामध्ये महिला रोजगार महिला शक्ती केंद्र महिला मिशन शक्ती योजना आणि पेन्शन योजना याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी तटकरे यांनी या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्वरित यावर अंमलबजावणी करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या संख्येने महिला वर्ग असून औद्योगिक नगरी म्हणून ओळख असणाऱ्या शहरांमध्ये महिलांसाठी रोजगार निर्मिती कार्यक्रम घेऊन त्याद्वारे शहरातील महिलांच्या हाताला काम निर्माण करून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

राष्ट्रसंचार लक्षवेधी रा

# दापोडी गावाचा पाणीपुरवठा आज राहणार बंद



**पिंपरी :** भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पुर्व सुचनेनुसार २४ आणि २५ जुलै २०२४ रोजी पुणे जिल्हयाला अतिवृष्टीचा इशारा दिला होता. हा इशारा लक्षात घेता २५ जुलै रोजी पिंपळे गुरव ते दापोडीला जोडणाऱ्या पुलावरील ग्रॅव्हीटी पाईपलाईनचे पाणीपुरवठा विषयक अत्यावश्यक कामकाज करण्यासाठी आलेला शटडाऊन रद्द करण्यात आला होता. तथापि कामाची आवश्यकता पाहता हा शटडाऊन आज ३१ जुलै घेण्यात येणार असून दापोडी गावाचा पाणीपुरवठा सकाळी १० ते रात्री १० पर्यंत बंद राहणार आहे, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी दिली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पिंपळे गुरव ते दापोडीला जोडणाऱ्या पुलावरील ग्रॅव्हीटी पाईपलाईनचे पाणीपुरवठा विषयक अत्यावश्यक कामकाज करणे गरजेचे असल्यामुळे २५ जुलै रोजी पिंपरी चिंचवड शहरामधील मौजे दापोडी गावाकरीता शटडाऊन घेण्यात आला होता. त्यानतंर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे यांच्या आदेशानुसार तसेच भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पुर्व सुचनेनुसार दि. २४ व २५ जुलै रोजी पुणे जिल्ह्याला अतिवृष्टीचा (रेड अलर्ट) इशारा देण्यात आला होता. इशारा लक्षात घेता हा शटडाऊन स्थगित करण्यात आला होता. त्यामुळे सदरचे कामकाज करण्यासाठी आज बुधवार ३१ जुलै रोजी दापोडी गावाचा पाणीपुरवठा सकाळी १० ते रात्री १० पर्यंत बंद राहणार आहे.

दुरुस्तीच्या कामासाठी मौजे दापोडी परीसरातील सर्व पाणीपुरवठ्याची यंत्रणा बंद ठेवल्यामुळे दापोडीमधील सर्व भागात दुसऱ्या दिवशी म्हणजेच उद्या शुक्रवार १ ऑगस्ट रोजी होणारा सकाळचा पाणीपुरवठा अनियमीत व कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी महापालिकेकडील उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करुन काटकसरीने पाण्याचा वापर करावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## सत्कार सदिच्छा दुतांचा...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



» **पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने विविध क्षेत्रातील सदिच्छा दुतांचा सत्कार आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आला.

# सदिच्छा दुतांचा महापालिकेच्यावतीने सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या विविध क्षेत्रातील सदिच्छा दुतांचा सत्कार आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आला.

महापलिकेच्या वतीने नागरिकांच्या कल्याणासाठी तसेच शहराच्या विकासासाठी विविध योजना, उपक्रम राबविण्यात येतात. या योजना व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी विविध समाजमाध्यमांवरील आपल्या खाजगी खात्यांद्वारे प्रसिद्धी करणारे इन्फ्लूएन्सर अर्थात प्रभावक यांनी सदिच्छा दूत म्हणून प्रचार प्रसार केला. या कार्याची दाखल घेऊन आयुक्त शेखर सिंह यांनी चिंचवड येथील आटोक्लस्टर येथे इन्फ्लूएन्सर यांचा सत्कार केला, यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे, पीसीएमसी स्मार्ट सारथी टीम आणि विविध क्षेत्रातील इन्फ्लूएन्सर उपस्थित होते.

यामध्ये प्रेरणात्मक चित्रफिती तयार करणारे पियुष सजगने यांचा मालमत्ता कर सवलत योजनेच्या प्रसिद्धीसाठी, सिने कलाकार स्वराज भोईटे यांचा किल्ले बनवा स्पर्धेच्या प्रसिद्धीसाठी, स्नेहल बनकर यांचा गणपती डेकोरेशन स्पर्धेसाठी, अविरत श्रमदानचे वैद्य निलेश लोंढे यांचा आयुर्वेद आणि पर्यावरण संवर्धनासाठी, रांगोळीकार राजश्री भागवत यांचा रांगोळीसाठी, स्वप्नाली भोदगे यांचा विविध स्पर्धांसाठी, रितू सिंग यांचा आरोग्य क्षेत्रासाठी तर अक्षय ढेरे यांचा सांस्कृतिक उपक्रमाच्या माध्यमातून विविध योजनांचा प्रसार प्रचार करण्यासाठी सदिच्छा दूत म्हणून केलेल्या प्रसिद्धीच्या कार्यासाठी महापालिकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. महापालिकेच्या विविध योजना उपक्रम नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी इन्फ्लूएन्सर यांनी सदिच्छा दूत म्हणून केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे शेखर सिंह म्हणाले.

# 'माझी लाडकी बहीण' योजनेचा पिंपरीत रिक्षातून होतोय प्रचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ शहरातील प्रत्येक महिला लाभार्थ्याला देता यावा यासाठी महापालिका स्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी शहरात क्षेत्रीय कार्यालय स्तरावर रिक्षा सुरू करण्यात आल्या असून या रिक्षांचा प्रारंभ आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आला.

मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचार प्रसिद्धीसाठी महापालिकेच्या सर्व अधिकृत सोशल मिडीया हॅन्डल्स तसेच अधिकृत संकेतस्थळावर योजनेबद्दल सविस्तर माहिती देण्यात येत असून अर्ज करण्याच्या प्रक्रियेची देखील माहिती देण्यात आली आहे. शहरातील विविध ठिकाणी योजनेची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी माहितीदर्शक स्टँडीज, फ्लेक्स, बॅनर्स सर्व क्षेत्रीय कार्यालयअंतर्गत निश्चित केलेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच पालिकेच्या व्हीएमडीवरही योजनेचा लाभ घेण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त योजनेचे माहितीदर्शक व्हिडीओ, मेसेजेस, जिंगल्स तयार करून प्रसारित करण्यात येत असून योजनेची माहितीदर्शक भित्तीपत्रके लावण्यात येत आहेत. तसेच हस्तपत्रिका आणि पॅम्प्लेट्स तयार करून घरोघरी वितरित करण्यात येत आहेत.

"मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण" योजनेचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी आवश्यक कागदपत्रांसह महिला विकास महामंडळाच्या महिलांच्या आधारे ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरून घेऊन त्यानंतर ते अर्ज क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येत आहेत. तसेच महापालिकेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी १२३ पेक्षा जास्त सुविधा केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. या केंद्रांवर भेट देवून जास्तीत जास्त पात्र महिलांनी दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत विहित मुदतीत अर्ज भरून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुळशीत पर्यटनबंदी फक्त कागदावरच

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**हिंजवडी :** जिल्ह्यात मागील आठवडा भरापासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्हा प्रशासनाने मुळशी, मावळ तालुक्यांतील पर्यटन स्थळांवर पर्यटकांना बंदी घातली आहे. मात्र मुळशी, टेमघर व कासरसाई धरण परिसरात पर्यटक आणि पर्यटनस्थळां शेजारील काही हॉटेल्स व्यवसायिकांनी जिल्हा प्रशासनाच्या या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. काही ठिकाणी काही व्यावसायिकांनीच आपल्या नेहमीच्या पर्यटकांनी छुपे रस्ते दाखवून आपल्या हॉटेल्स व दुकानाचे मागील दरवाजे उघडून दिल्याचे आरोप होत आहेत.

पावसाचे प्रमाण कमी होताच शनिवार रविवारी ( दि. २८ ) शासनाच्या या आदेशाकडे दुर्लक्ष करत कासरसाई, मुळशी, टेमघर या पर्यटनस्थळी शेकडो पर्यटकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार मावळ-मुळशीचे उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले यांनी काढलेल्या पर्यटन बंदीच्या आदेशाला पर्यटकांसह तेथील व्यवसायिकांनी पध्दतशीरपणे केराची टोपली दाखवली असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

## शहराला वर्षभर पुरेल एवढे पाणी

# खुशखबर! पवना धरणात ८४ टक्के पाणीसाठा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांचे तहान भागविणारे पवन मावळातील प्रमुख पवना धरण ८४ टक्के भरले आहे. दोन आठवडे झालेला समाधानकारक पाऊस आणि मागील आठवड्यात सलग तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे पवना धरणातील जलसाठ्यात कमालीची वाढ झाली आहे.

गेल्या आठवडाभरात झालेल्या मुसळधार पावसामुळे पवना धरणात एकूण ८३.६९ टक्के पाणीसाठा जमा झाला होता. तर २४ तासात झालेल्या ३० मीमी पावसासह चालू हंगामात एकूण १८५४ मीमी पाऊस झाल्याची नोंद आहे.



### मुसळधार पावसामुळे धरण भरले

सततच्या पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला. त्यामुळे धरणाच्या वीज निर्मिती केंद्राच्या विद्युतगृहातून १४०० क्सुसेक क्षमतेने पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे पवना नदीचे पात्र वेगात वाहत आहे; मात्र ते धोकादायक स्थितीत नाही. . पावसाची शक्यता लक्षात घेऊन धरणात योग्य प्रमाणात पाणीसाठा ठेवला जात आहे. दरम्यान, गेल्या वर्षी या दिवशी धरणात ७४ टक्के साठा होता.

वर्षभर पुरेल इतके पाणी
पवना धरणातील समाधानकारक पाणी साठ्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह एमआयडीसीचा वर्षभराचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे. ते पाणी पुढील वर्षभर पुरेल इतके आहे. नदीकाठच्या गावांना आणि शेतकऱ्यांना वर्षभर पाणी उपलब्ध होणार आहे.

#रा

# शालेय साहित्य वितरणासाठी ई-रुपी प्रणालीचा अवलंब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी- सर्व शैक्षणिक सुविधांसह दर्जेदार शिक्षण देण्यासाठी महापालिका कटीबद्ध असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांचा परिपूर्ण लाभ मिळावा आणि शालेय साहित्याचे थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) पद्धतीने वितरण करण्यासाठी ई-रुपी कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यानुसार येत्या १० दिवसात महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना दरवर्षी शालेय साहित्याचे वाटप महापालिकेच्या वतीने करण्यात येते. त्यासाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीचा अवलंब करण्यात येते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शालेय साहित्याचे वाटप करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धती अंतर्गत ई-रुपी कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन श्रीमती लिलाबाई कांतीलाल खिंवसरा प्राथमिक विद्यालय मोहननगर, चिंचवड येथे आयुक्त शेखर सिंह यांचे हस्ते आज पार पडले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापक रविंद्र शिंदे, वैशाली बागलाने, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, शिक्षिका मालन वीर, स्वाती घोडके, मनीषा येणारे, रुपाली जगधने, वीणा भैरवकर, सुजाता गायकवाड, दिपाली फुंदे, प्रकाश पवार, गजराज आस्मर, मुख्य लिपिक सुभाष सदगीर, डाटा ऑपरेटर प्रियंका गावडे, यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त सिंह म्हणाले, महापलिकेच्या वतीने विद्यार्थ्यांना वितरीत केल्या जाणा-या शालेय साहित्याच्या दर्जाच्या बाबतीत तक्रारी येत होत्या. त्यावर उपाय म्हणून मागील वर्षापर्यंत शालेय साहित्याची रक्कम थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने पालकांच्या खात्यावर वितरीत केली जात होती. त्यातही त्रुटी आढळून आल्याने महापालिकेने शैक्षणिक शालेय साहित्याचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांचा परिपूर्ण लाभ मिळावा आणि या प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण व्हावी यासाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धती अंतर्गत ई-रुपी या नवीन कार्य पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच नवीन प्रणाली अंतर्गत देण्यात येणाऱ्या सर्व शालेय साहित्याचा दर्जा महापालिकेने तपासून घेतला असून येत्या 10 दिवसात सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### कशी आहे ई-रुपी प्रणाली?

थेट लाभ हस्तांतरण ई-रुपी पद्धती अंतर्गत शालेय साहित्याच्या वितरणासाठी पालकांद्वारे विद्यार्थ्यांच्या संबंधित शाळेमध्ये अद्ययावत मोबाईल क्रमांकाची नोंदणी करण्यात आली आहे. बँकेमार्फत या मोबाईल क्रमांकावर क़्यूआर कोड संबंधित लिंक असलेला संदेश पाठविण्यात येतो. या लिंकद्वारे मोबाईलमध्ये क़्यूआर कोड जनरेट करण्यात येतो. पालकांनी हा क़्यूआर कोड महापालिकेने निश्चित केलेल्या पुरवठादाराकडे सादर करायचा आहे. शालेय साहित्य पुरवठादाराकडून क़्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर पालकांच्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी जातो. हा ओटीपी पालकांनी पुरवठादारास सादर केल्यानंतरच विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मिळते.

### » कोणत्या वस्तूंचा समावेश आहे?

- महापालिकेच्यावतीने देण्यात येणाऱ्या शालेय साहित्यामध्ये दप्तर, बुट, सॉक्स, पी.टी बुट,कंपास पेटी, फुट पट्टी, वह्या, स्वाध्यायमाला, प्रात्याक्षिक पुस्तिका, चित्रकला वही, नकाशा पुस्तिका, रेनकोट, स्टीलची पाण्याची बॉटल आदी साहित्यांचा समावेश आहे. तसेच महापालिकेने निश्चित केल्या प्रमाणे साहित्याचे वितरण व्हावे, याबाबत शालेय स्तरावर सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी दक्षता घ्यावी,अशा सूचना आयुक्त सिंह यांनी केल्या.
- या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी नव्या प्रणाली अंतर्गत आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक अशा एकूण १४० शाळांमधील एकूण ४८ हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात येत असून १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यर्थ्यांना प्रत्येकी ३ हजार ७०० आणि ५ वी ते १० वीच्या विद्यर्थ्यांना प्रत्येकी ३ हजार ९०० इतका खर्च ई-रुपये क़्यूआर कोड च्या माध्यमातून वितरीत करण्यात येत आहे.

**“ अधिक वेळ घेऊन महापालिकेने विद्यार्थ्यांची आवश्यक अचूक माहिती संकलित केली आहे. त्यामुळे या नव्या प्रणालीचा परिपूर्ण लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे. प्रशासनात नवीन प्रयोग केल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. शालेय साहित्याचे वितरण करण्यासाठी महापालिकेने अवलंबविलेल्या नवीन प्रणालीत भविष्यात येणाऱ्या त्रुटी दूर करून पुढील शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना सर्व साहित्याचे वितरण करण्यात येणार आहे. — शेखर सिंह, आयुक्त**

## » Selected



### जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेला सुरुवात

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हास्तरीय कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने तसेच नव प्रगती मित्रमंडळ यांच्या सहकार्याने कै. मनीषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड या ठिकाणी जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा दरवर्षी घेण्यात येते. त्यानुसार सन २०२४-२५ या वर्षात ही स्पर्धा दिनांक २९ ते ३१ जुलै या कालावधीत सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरु राहणार असून पुरुष गट, महिला गट, ज्येष्ठ नागरिक गट या तीन गटात होणार आहे. या स्पर्धेच्या विजेत्यांना विविध बक्षिसांचे वाटप करण्यात येणार आहे. या स्पर्धेतील पुरुष गटातील प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विजेत्यास ५१ हजार रुपये , द्वितीय क्रमांक ४१ हजार रुपये, तृतीय क्रमांक ३१ हजार रुपये, चतुर्थ क्रमांक २१ हजार रुपये, पाचवा क्रमांक १५ हजार रुपये, सहावा क्रमांक १५ हजार रुपये, सातवा क्रमांक ११ हजार, आठवा क्रमांक ११ हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच महिला गटात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या महिलेस १५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ११ हजार रुपये, तृतीय क्रमांक ७ हजार रुपये, चतुर्थ क्रमांक ५ हजार रुपये, पाचवा क्रमांक ३ हजार, सहावा क्रमांक ३ हजार, सातवा क्रमांक ३ हजार, आठवा क्रमांक ३ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

पान १ वरून

## नदीकाठ सुधार योजना म्हणजे मेकअप - आदित्य ठाकरे

आमचा विकास कामांना विरोध नाही असे नमूद करीत, ठाकरे म्हणाले, “या प्रकल्पाचा कंटूर स्टडी केला पाहिजे. जगात कोठेही नदीसंदर्भात काम करताना नदीची खोली वाढविली जाते, तसेच तिची रुंदी वाढवली जाते. पण पुण्यात मात्र उलटेच होत आहे. या नदीतील पाणी आधी स्वच्छ करणे गरजेचे असताना, तिचे ब्युटीफिकेशन करण्याच्या नावाखाली केवळ मेक अप केला जात आहे. पुण्यात पात्र अरुंद केले जात असल्याने नदी ही सिमेंटचे बकेट होणार आहे. भविष्यात अशा पुरांचा धोका निर्माण होईल.”

सदर प्रकल्पाला पर्यावरण प्रेमी, या क्षेत्रातील तज्ज्ञ व प्रतिष्ठीत नागरिकांकडून विरोध केला जात आहे. राज्य सरकार त्यांचे म्हणणे न ऐकता हा प्रकल्प पुण्यावर लादत आहे, असा आरोप ठाकरे यांनी केला.

...........

### आणखी काय म्हणाले ठाकरे ?

- पुण्यातील नद्या व गुजरातमधील साबरमती यांच्या भौगोलिक रचनेत मोठा फरक
- महाविकास आघाडी सरकारची सत्ता असताना या प्रकल्पाला स्थगिती दिली होती.
- प्रकल्पाच्या तांत्रिक बाजू सर्व पक्षाच्या नेत्यांना समजुन सांगणे आवश्यक
- नाले व डोंगरमाथा- डोंगर उतारावरील बांधकामासंदर्भात संवेदनशीलपणे विचार करून ठोस मार्ग काढणे गरजेचे
- मुंबई तुंबू नये यासाठी केलेल्या उपाययोजनांकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष

# भारत, रशिया आणि युक्रेनच्या संपर्कात राहणार

## परराष्ट्रमंत्री जयशंकर यांचे विधान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**टोकियो :** टोकियोमध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी जगाला एक नवा संदेश दिला. भविष्यात युक्रेन आणि रशियाशी भारताचे अधिक संपर्क राहतील, कारण दोन्ही बाजूच्या वाटाघाटी करणाऱ्या देशांचे असे संपर्क त्यांच्यातील संघर्ष सोडविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत, असे विधान त्यांनी केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील महिन्यात युक्रेनच्या दौऱ्यावर जाणार असताना जयशंकर यांनी हे वक्तव्य केले आहे.

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध सुरू होऊन दोन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. एवढ्या कालावधीनंतरही रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी आपली जिद्द सोडलेली नाही किंवा युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोडोमीर झेलेन्स्की यांनीही पराभव मान्य केलेला नाही. अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांच्या मदतीने युक्रेन रशियाच्या घातक शस्त्रास्त्रांचा सामना करत आहे. तसेच हे दोन्ही देश एकमेकांवर बॉम्बफेक करत आहेत. हे महायुद्ध संपवण्यासाठी जगभरातील देशांनी सर्वतोपरी प्रयत्न केले, पण त्याचा परिणाम आलेला नाही. रशिया आणि युक्रेनमधील युद्ध थांबवण्यासाठी भारताही प्रयत्नात आहे. मात्र, त्याला अद्याप यश आलेले नाही.

परराष्ट्रमंत्री जयशंकर म्हणाले की, युद्धभूमीतून संघर्षाचा तोडगा निघणार नाही, अशी भारताची भूमिका आहे. परिस्थिती स्वत:च्या मार्गाने जाऊ देणे आणि जगातील इतर भागांतील घटनांमुळे संकट संपुष्टात येण्यासाठी काही मदत होईल, याची वाट पाहणे हा घातक दृष्टिकोन ठरेल, असा इशारा त्यांनी दिला.

मोदींच्या किव्ह दौऱ्याच्या बातम्यांबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना जयशंकर म्हणाले, आम्ही योग्य वेळी योग्य माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट करतो. आमची आजची भावना अशी आहे की, अजून काही करण्याची आवश्यकता असून, सध्याचा संघर्ष कायम ठेवणे स्वीकारू नये. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांच्या संपर्कात असलेल्या देशांसाठी हे महत्त्वाचे आहे. प्रत्यक्षात अनेक देश दोन्ही देशांशी बोलत नाहीत. भारताचा असा विश्वास आहे की, काही सुधारणा होईल आणि गोष्टी युद्धभूमीतून वाटाघाटीच्या टेबलावर येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## अशा रस्त्याने जायचं कसं?



» **जमशेदपूर :** राष्ट्रीय महामार्ग २२० ची अवस्था!

पान १ वरून

## लोकसभेचे मतदान आणि मतमोजणीत तफावत

जाहीर झाला की नाही, या सर्व कारणांमुळे सर्वसामान्यांमध्ये निवडणूक निकालाच्या सत्यतेबाबत चिंता आणि शंका निर्माण झाली होती, याकडे एडीआरने लक्ष वेधले आहे.

एडीआरने आपल्या अहवालात म्हटले आहे की, भारत निवडणूक आयोगाने आतापर्यंत मतमोजणी, ईव्हीएममधील मतांमधील फरक, मतदानात वाढ, मतदानाची संख्या जाहीर न करणे, मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यास अवाजवी उशीर केला असून, अंतिम निवडणूक निकाल जाहीर करण्यापूर्वी वेबसाइटवरून काही डेटा क्लिअर केला आहे. त्याबाबत कोणतेही वाजवी स्पष्टीकरण दिलेले नाही. लोकसभा निवडणुकीत घडलेल्या अनियमिततेच्या गंभीर घटनांविरोधात योग्य ती पावले उचलण्यात निवडणूक आयोग अपयशी ठरल्याने मतदारांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. या शंकांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्या दूर करण्यासाठी निवडणूक आयोगाने योग्य ती पावले उचलली पाहिजेत.

एकूण मतदानाची संख्या आणि मतमोजणीच्या संख्येत तफावत असल्याने, किती जागांवर वेगवेगळे निकाल लागले असतील, हे एडीआरने स्पष्ट केलेले नाही. अहवालानुसार ५३८ जागांमध्ये ५ लाख ८९ हजार ६९१ मतांची तफावत आहे. ३६२ जागांसाठी झालेल्या एकूण मतांपेक्षा ५ लाख ५४ हजार ५९८ मतांची मोजणी कमी झाली आहे, तर १७६ जागांवर झालेल्या एकूण मतांपेक्षा ३५ हजार ९३ मतांची मोजणी अधिक झाली आहे.

२०१९ च्या निवडणुकीत १९५ जागांवर झालेल्या मतदानात आणि मतमोजणीत कोणतीही तफावत नसल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०१९ मध्ये १ मत (सर्वात कमी) ते १ लाख १३२३ मतांपर्यंत तफावत होती, जी एकूण मतांच्या १०.४९ टक्के (सर्वोच्च) होती. तसेच २०१९ मध्ये लोकसभेच्या ६ जागा अशा होत्या जिथे मतांची तफावत विजयाच्या अंतरापेक्षा जास्त होती. एकूण विसंगतींचे प्रमाण मतांच्या स्वरूपात ७, ३९,१०४ इतके होते.

- उत्तर प्रदेश : एकूण जागा : ८०,

सर्व जागांमध्ये तफावत

- ५५ जागांवर झालेल्या एकूण मतांपेक्षा ५३,९६० मते कमी आहेत.
- एकूण २५ जागांवर झालेल्या मतदानापैकी ६,१२४ मतांची संख्या अधिक
- बिहार : एकूण जागा ४०, सर्व जागांमधील तफावत १९ जागांची
- एकूण मतांपेक्षा ९,९२४ कमी मते आहेत.
- एकूण २१ जागांपैकी ५,०१५ हून अधिक मतांची मोजणी झाली.
- झारखंड : एकूण जागा १४, तफावत १२ जागांवर
- एकूण मतांपेक्षा २६,३४२ कमी मते आहेत.
- २ जागांवर झालेल्या एकूण मतांपैकी ३९३ मतांची मोजणी अधिक झाली.
- दिल्ली : एकूण ७ जागा, सर्व जागांमध्ये तफावत
- मतमोजणी सर्व ७ जागांवर झालेल्या एकूण मतांपेक्षा ८,१५९ कमी मते.
- उत्तराखंड : एकूण ५ जागा,
- सर्व ५ जागांवर झालेल्या एकूण मतांपेक्षा ६,३१५ मतांची तफावत.

# कर्नाटक काँग्रेस सरकारमध्ये मोठ्या बदलाचे संकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बेंगळुरू :** कर्नाटकमध्ये लोकसभा निवडणुकीपासून भाजपने काँग्रेस सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. भाजप आणि जेडीएसच्या विरोधाला सामोरे जाण्यासाठी काँग्रेसने सरकारमध्ये मोठ्या बदलाचे संकेत दिले आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार हे देखील काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांसमवेत या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते पुढील रणनीती ठरवतील. कर्नाटक सरकारमध्ये मोठ्या फेरबदलाबाबतही निर्णय घेतला जाऊ शकतो, असे संकेत मिळत आहेत. काही मंत्र्यांची खातीही बदलली जाऊ शकतात.

मंत्रिमंडळ बदलाची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. महर्षी वाल्मिकी एसटी विकास महामंडळाला ८४ कोटींहून अधिक रकमेच्या बेकायदा हस्तांतरणाची ईडी चौकशी करत आहे. या चौकशीत आमदार बी. नागेंद्र यांना अटक करण्यात आली असून, त्यांना मंत्रिपदावरूनही हटवण्यात आले आहे. भाजप सातत्याने मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहे.

या बैठकीत काँग्रेस नेतृत्व कर्नाटकातील भाजप-जेडीएसला सामोरे जाण्याची योजना आखत आहे. सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी भाजप पदयात्रा काढणार आहे. म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ॲथॉरिटीने नियमांचे उल्लंघन करून कोट्यवधी रुपयांचे भूखंड वाटप केल्याचा आरोप भाजपने केला आहे. यात मुख्यमंत्र्यांच्या नातेवाईकांचाही समावेश आहे.

लोकसभा निवडणुकीतील खराब कामगिरीनंतर कर्नाटक सरकार बचावात्मक पवित्र्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला केवळ ९ जागा मिळाल्या. भाजप-जेडीएस युतीला २१ जागा मिळाल्या. आता विधानसभेतही भाजप-जेडीएस सरकारला घेरत मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहे. तेथे लवकरच स्थानिक निवडणुका होणार आहेत. डीके शिवकुमार यांना कर्नाटक काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून हटवले जाऊ शकते, अशीही चर्चा आहे.

## पारंपारिक लोकगीते गाऊन घेतला जातोय भात लावणीचा आनंद

**मावळ-** मावळ तालुक्यात प्रामुख्याने भात शेती केली जाते. भातशेती करताना भात रोपांची लागवड म्हणजेच लावणीच्या वेळी महिला वर्ग पारंपारिक लोकगीते, भक्तीगीते गाऊन शेतीकामाचा आनंद घेतात. गाणे म्हणत भात लागवड करण्याची ही पद्धती ‘भलरी’ म्हणून प्रसिद्ध आहे.

**उर्जा मिळते, उत्साह वाढतो –** आंदर मावळ, पवन मावळ या ग्रामीण भागामध्ये सध्या भात लागवडीचा अंतिम टप्पा सुरू आहे. मावळात भात शेतीमुळे एक आगळीवेगळी कृषी संस्कृती विकसित झाली असून यात भात लावणीवेळी पारंपारिक गाणी म्हणण्याची भलरी पद्धत रूढ आहे. लोकगीते गाऊन काम केल्याने उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण तयार होते. कामासाठी नवी उर्जा मिळते, ज्यातून कामाचा वेग वाढतो, असे शेतकरी सांगतात. मावळातील साते गावात सध्या भात लावणी सुरू आहे.

## पूररेषेत राडाराडा; पाच एकर जागेत ‘कमाई’

समोर आले आहे. सिंहगड रस्त्यावर एकतानगरी, निंबजनगर आणि विठ्ठलवाडीतील पूरस्थितीला हाच राडारोड्याचा भराव जबाबदार असल्याचे समजल्यानंतर महापालिकेने जलसंपदा विभागासोबत संयुक्त कारवाई सुरू करून राडारोडा उचलण्यास सुरुवात केली आहे. आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, उपायुक्त माधव जगताप यांनी ही माहिती दिली.

मनपा बांधकाम विभागाने कर्वेनगर बाजूच्या नदीपात्रात कारवाई केली. यामध्ये १२ जेसीबी, तसेच २५ डंपरने तब्बल ६०० टन राडारोडा काढण्यात आला. येथे बांधकामे करण्याची तयारी सुरू असल्याचे समोर आल्याने तेथील इतर साहित्यांवरही पालिकेने कारवाई केली. या कामाचा खर्च संबंधित जागामालकांकडून वसूल केला जाणार आहे.

### मनसुख मांडविया यांचा संसदेत दावा

# एआय देणार रोजगाराच्या नव्या संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** एआयचा अवलंब करून त्याचा विविध क्षेत्रांत वापर केल्यास मानवासाठी रोजगाराच्या संधी कमी होतील का, याविषयी अनेकदा दिग्गजांमध्ये वादविवाद होत आहेत. यावर केंद्रीय कामगारमंत्र्यांनी आपले मत मांडले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (एआय) वापरामुळे भारतात नोकऱ्या जाणार नाहीत, उलट नव्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असे प्रतिपादन कामगारमंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी संसदेत केले.

तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी एआयमुळे नोकऱ्या गमावण्याच्या चिंतेबद्दल लोकसभेत प्रश्न विचारला. त्याला उत्तर देताना मांडविया म्हणाले, इंटरनेट आले तेव्हा त्यातून नोकऱ्या मिळतील, अशीच अटकळ बांधली जात होती. संगणक आल्यावर अशाच गोष्टी घडल्या. पण आज आपल्याला माहित आहे की अशा तांत्रिक प्रगतीमुळे केवळ अधिक संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे एआयच्या वापरामुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा दावा त्यांनी केला.



मनसुख मांडविया म्हणाले की, मोदी सरकारने उचललेल्या पावलांमुळे देशातील बेरोजगारीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. २०१७-१८ मध्ये श्रमशक्ती सहभागाचा दर ३८ टक्क्यांवरून २०१७-१८ मध्ये ४४ टक्क्यांवर पोहोचला आहे.

पश्चिम बंगालमध्ये पुरेशा नोकऱ्यांच्या उपलब्धतेबाबत प्रश्न उपस्थित करणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्यावर निशाणा साधताना, मंत्री मांडविया म्हणाले की, जे लोक राज्यातील उद्योगांसमोर आंदोलन करत राहतात, त्यांना हे जाणून घ्यायचे आहे की त्याचा परिणाम नोकऱ्यांवरही होईल. राज्याच्या लोकसंख्येचा आकार लक्षात घेता राज्य सरकारने अधिक गुंतवणूक आणि उद्योगांना आकर्षित करायला हवे, असा टोलाही त्यांनी लगावला.

#रा

# भय इथले संपत नाही...



■ वसंत शिंदे

**नारायणगाव :** 'भय इथले संपत नाही' या म्हणीप्रमाणेच अवस्था जुन्नर तालुक्यामध्ये सध्या झाली आहे. सध्या बिबट आणि मानव या संघर्ष या ठिकाणी चालू झाला आहे. सध्या जुन्नर आंबेगाव खेड या तालुक्यामध्ये बिबट्याचे पशुधनावर हल्ल्याचे प्रमाण वाढले असून नागरिक व शेतकरी वर्ग भयभीत झाल्याचे दिसून येत आहे. पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी संरक्षित जाळी लावून सुद्धा काहीच उपयोग होत नाही. यांचा प्रामाणिक रखवालदार कुत्रा सुद्धा आपले संरक्षण करू शकत नाही. यामुळे शेतकरी हातबल असल्याचे दिसून येत आहे.



सध्या जुन्नर तालुक्यामध्ये सुमारे दोन ते तीन हजार बिबट्यांची संख्या असल्याची शक्यता आणि प्राणी मित्रांनी व्यक्त केली आहे. कारण प्रत्येक गावामध्ये दहा ते बारा बिबटे असल्याची शक्यता आहे. यामधील वाड्या व वस्त्या धरल्या तर यांची संख्या हा संशोधनाचा आणि कळीचा मुद्दा ठरू शकतो. तालुक्यात एखाद्या ठिकाणी बिबट्या दिसला अगर त्यांनी पशुधन हल्ला केला तर त्या ठिकाणी पिंजरा लावण्याची मागणी ग्रामस्थांकडून होते. मात्र पिंजरा लावल्यानंतर त्या बिबट्याला परत निसर्गाच्या अधिवासात सोडले जाते. कारण जुन्नर येथील बिबट्या निवारण केंद्रात एकूण बिबट्यांची संख्या ४४ इतकी असून या ठिकाणी जाग्या अभावी नवीन बिबट्याला प्रवेशच मिळू शकत नाही. त्यामुळे बिबट्याला पिंजऱ्यातून परत त्याच जागी तो बिबट्या येतो असे नागरिकांचे म्हणणे आहे. याबाबत शासनाने योग्य भूमिका घेणे गरजेचे आहे किंवा बिबट्यांच्या संख्येला आळा घालण्यासाठी त्यांच्यावर प्रतिबंधित शस्त्रकर्म करावी अशी मागणी पीडितग्रस्त शेतकऱ्यांकडून होत आहे.

प्रजनन काळात तसेच लहान पिल्लांच्या संरक्षणाच्या दृष्टीने बिबट मादी जास्त आक्रमक होते. याचबरोबर नैसर्गिक अधिवासातील त्यांची शिकार असलेल्या प्राण्यांची संख्या झपाट्याने कमी होत असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांच्या पशुधनाकडे आपला मोर्चा वळवला आहे. यामुळे रात्रीच्या वेळी संचार करणारा कदाचित भूक असह्य झाल्यामुळे दिवसाढवळ्या सुद्धा शेतकऱ्यांच्या बांधावर कुटुंबाला घेऊन संचलन करताना दिसत आहे. आता तर बिबट प्राण्याचे हल्ले दररोज होऊ लागले आहेत. वन खात्यातील कर्मचाऱ्यांना सुद्धा लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. खरं तर शासनाने यावर त्वरित निर्णय घेऊन अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

बिबट आणि मानव हा संघर्ष अत्यंत टोकाला पोहोचण्याच्या अगोदरच तात्पुरती मलमपट्टी करण्यापेक्षा कायमस्वरूपी तोडगा यावर शासनाने करावा. तसेच सर्व पक्षीय धुरंधरांनी आपली राजकीय जोडे बाजूला ठेवून याबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा अशी मागणी तालुक्यातील नागरिकाकडून होत आहे.

### शेतकऱ्यांना जीव मुठीत घेऊनच घरी जावे लागते

- एसटी महामंडळाच्या गाड्या काही ठिकाणी तालुक्यात मुक्कामी जातात. सकाळी लवकर गाडी मुक्कामाच्या ठिकाणाहून निघते अशाच एका ठिकाणी ड्रायव्हर प्रतिविधीसाठी गेले असताना त्यांना अगदी समोरच बिबट्याचे दर्शन झाले त्यांची अक्षरशा बोबडीत वळाली.
- जुन्नर तालुक्यामध्ये कुत्र्यांची संख्या कमी आणि बिबट प्राण्यांची संख्या जास्त अशी अवस्था थोड्याच दिवसात होते की काय असे चित्र सध्या दिसत आहे.
- जुन्नर तालुक्यामध्ये बिबट आणि मानव संघर्ष याच्यावर फक्त राजकीय पोळी भाजण्याचे काम होते की काय अशी शंका नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे.
- जुन्नर तालुक्यात उसाचे क्षेत्र खूप मोठी आहे. त्यामुळे संध्याकाळी सात नंतर जीव मुठीत घेऊनच शेतकऱ्यांना घरी यावे लागत आहे.
- व्यायामासाठी पहाटे फिरणाऱ्या नागरिकांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.
- रात्रीच्या वेळी दोन चाकी वाहनांवर प्रवास करणे धोक्याचे झाले कारण काही ठिकाणी बिबट्याने मोटरसायकल स्वरांवर हल्ला करून त्यांना जखमी केले आहे.

## रोटरी इंटरनॅशनलकडून मालुंजकर यांना बेस्ट डायरेक्टर गोल्ड पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** रोटरी इंटरनॅशनल अंतर्गत रोटरी क्लब ऑफ इंदापूरचे माजी अध्यक्ष व मागील तेरा वर्षांपासून रोटरी क्लब मध्ये सक्रियपणे कार्य करणारे, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे व्हेकेशनल डायरेक्टर, रोटेरियन वसंतराव मालुंजकर यांना रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ वर्ष २०२३-२४ या वर्षभरातील केलेल्या कार्याची दखल घेवून, पुणे येथे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू फडके यांच्या हस्ते बेस्ट डायरेक्टर गोल्ड पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

पुणे जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुक्यातील नामवंत व ज्यांच्यामुळे समाजात चांगला बदल घडतो आणि ज्यांच्यामुळे जनसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचविण्यास मदत होते. अशा शेकडो नामवंत व्यक्तीमत्वांची निवड करून, त्यांना मागील वर्षभरात रोटरी इंटरनॅशनल कडून, डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या वतीने, वसंतराव मालुंजकर यांनी प्रांतपाल मंजू फडके यांच्या मार्गदर्शनाखाली व्हेकेशनल पुरस्काराने गौरविण्यात आले.

यामध्ये कला, क्रीडा, साहित्य, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, उद्योग, व्यवसाय, व्यापार, आरोग्य, सामाजिक सेवा, वैद्यकीय, प्रशासन, कृषी, पशुसंवर्धन, कला, विज्ञान, वाणिज्य, माहिती तंत्रज्ञान, समाजकल्याण, पर्यटन, महिला सबलीकरण, निमशासकीय, शासकीय व खाजगी संस्था, आदी क्षेत्रात उल्लेखनीय व उत्कृष्ट काम करणाऱ्या मान्यवरांना आणखी चांगले काम करण्यासाठी रोटरीच्या वतीने गौरविण्यात आले होते. त्यामुळे रोटरीची सर्व स्तरात मान उंचाविली आहे.

इंदापूरमध्ये रोटरीसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेवर जावून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वसंतराव मालुंजकर यांचा तालुक्याला अभिमान आहे. त्यामुळे रोटरी क्लब ऑफ इंदापूरचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप गारटकर, संस्थापक उपाध्यक्ष मुकुंदशेठ शहा, इंदापूर रोटरीचे नूतन अध्यक्ष मोरेश्वर कोकरे, रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेंट्रलचे अध्यक्ष ज्ञानदेव डोंबाळे व सर्व संचालक यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### गौरव

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** रोटरी इंटरनॅशनलकडून, डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या वतीने, वसंतराव मालुंजकर यांनी प्रांतपाल मंजू फडके यांच्या मार्गदर्शनाखाली व्हेकेशनल पुरस्काराने गौरविले.

## कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे केंद्र स्थापन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे येथे कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे केंद्र स्थापनेसाठी राज्य शासन आणि एनएसडीसी इंटरनॅशनल लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला करार

पुणे येथे कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य शासन आणि एनएसडीसी इंटरनॅशनल लिमिटेड यांच्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य कराराचा लाभ राज्यातील युवकांना देशात व परदेशात रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक प्रमोद नाईक,सचिव स्मिता गाडे, एनएसडीसी इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेदमणी तिवारी आदी उपस्थित होते.

POSITIVE NEWS!

इंदापूर

१७२ प्रकरणे मिटवली



## इंदापूर लोकअदालतीमध्ये पाऊण कोटी रुपयांची वसुली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर दिवाणी व फौजदारी न्यायालयात (दि. २७ जुलै २०२४) रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दीप प्रज्वलन करून व संविधान उद्देशिकेचे वाचन करून राष्ट्रीय लोक अदालतचे उद्घाटन करण्यात आले.

लोक न्यायालयामध्ये तडजोडीने दिवाणी व फौजदारी प्रकरणे मिटवून शासनाने दिलेल्या संधीचा लोक न्यायालयाच्या निमित्ताने सदुपयोग करून घ्यावा, असे आवाहन इंदापूर तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष फारुकी साहेब यांनी केले.

यावेळी दिवाणी व फौजदारीचे एकूण १ हजार ६२६ प्रकरणे ठेवणेत आली होती. त्यापैकी १७२ प्रकरणे आपापसात मिटवून तडजोड करण्यात आली. तसेच सदर लोकन्यायालयामध्ये ७५ लाख ७८ हजार ८५५ एवढी रक्कमेची बँक वसुली झाली.

यावेळी इंदापूर तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष माधव शितोळे यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष अनिल पारेकर यांनी आभार मानले. तर सचिव आसिफ बागवान यांनी सूत्रसंचलन केले. सदर कार्यक्रमास न्यायाधीश पी. आर. सबनीस, ए. बी. पाटील, एस.एस. साळुंखे, जे. बी. खटावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

यावेळी वकील सतीश देशपांडे, विनोद पारेकर, महेश शिंदे, स्वप्नील जगताप, संदीप बांदल, रवींद्र कोकरे, रुद्राक्ष मेनसे हजर होते. वकील दीपाली माळवदे, आनंद केकाण, नितीन सोनवले यांनी पॅनल ॲडव्होकेट म्हणून काम पाहिले.

जुन्नर न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश नम्रता. म. बिरादारांच्या हस्ते दीपप्रज्वलन

## महालोकअदालतीचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात तालुका विधी सेवा समिती जुन्नर व जुन्नर तालुका वकील बार असोसिएशन तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महालोकअदालतीचे उद्घाटन जुन्नर न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश नम्रता. म. बिरादार यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून 'नालसा' या थीमचे गाणे लावून करण्यात आली.

यावेळी दुसरे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर जुन्नर स्वप्ना घुले, जुन्नर वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत भास्कर, बार असोसिएशनचे पदाधिकारी, वकील व पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या महालोकअदालतीमध्ये न्यायालयातील दिवाणी व फौजदारी एकूण प्रकरणे ११८४ तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती त्यापैकी १९४ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली असुन ४२ लाख ४८ हजार ६०८ इतकी रक्कम वसूल झाली तसेच दाखलपुर्व प्रकरणांची संख्या १५०१४ ठेवण्यात आली त्यापैकी ११४१७ तडजोडीने प्रकरणे निकाली करण्यात येऊन रक्कम रूपये १ कोटी ९० लाख ४१ हजार ३८८ रूपये वसुल झाले असे एकूण १६१९८ प्रकरणांपैकी ११६११ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात येऊन तडजोडीने एकूण रक्कम रूपये २ कोटी ३२ लाख ८० हजार ९९६ वसुल करण्यात आले आहेत.

या महालोकअदालतीमध्ये सर्व प्रकारचे प्रलंबित दिवाणी व फौजदारी दावे, अदखलपात्र फौजदारी गुन्ह्यांची प्रकरणे, भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ नुसार प्रलंबित प्रकरणे, पती-पत्नी मधील पोटगी, कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे, बँका, पतसंस्था यांचेकडील थकबाकीचे प्रकरणे, नगरपालिका, विद्युत विभाग, पंचायत समिती, ग्रामपंचायतीकडील कर थकबाकीची दाखलपुर्व प्रकरणे सामोपचाराने व तडजोडीने मिटविण्यासाठी ठेवण्यात आली होती. या महालोकअदालत कार्यक्रमाचे ॲड. निलीमा शेरकर यांनी प्रास्ताविक केले.

Selected



## जातेगाव बुद्रुकमध्ये रंगला माजी विद्यार्थी मेळावा

**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण घेऊन पुढील वाटचाल करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच संपन्न झाला असून यावेळी शाळेसाठी इमारत बांधण्यासाठी मदत करण्याचा संकल्प माजी विद्यार्थ्यांनी केला आहे. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये १९९७ साली सातवीचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी नुकतेच माजी विद्यार्थी मेळाव्याचे निमित्ताने एकत्र आले होते, यावेळी तब्बल सत्तावीस वर्षांनी एकत्र आल्याने सर्वजण जुन्या आठवणीत रंगून गेले, यावेळी माजी विद्यार्थ्यांनी तत्कालीन शिक्षक विजय कुंभार, शोभा डफळ, महादेव क्षीरसागर, तुकाराम क्षीरसागर यांसह सध्या शाळेत कार्यरत असलेल्या मुख्याध्यापक विजय गायकवाड, अंजली शिंदे या शिक्षकांचा सन्मान केला, दरम्यान काही दिवंगत गुरुजनांसह काही माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी अनेक शिक्षकांसह काही माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले मात्र यावेळी अनेकांना गहिवरून आले, तर वर्गशिक्षक विजय कुंभार गुरुजी यांनी त्यांच्या भाषणांमधून गतकाळातील आठवणींना उजाळा दिला, तर यावेळी ज्या शाळेने आम्हाला घडवले त्या शाळेची इमारत जुनी झाली असल्याने शाळेच्या नवीन इमारत बांधण्यासाठी माजी विद्यार्थी संघाच्या वतीने यथोचित मदत केली जाईल असे आश्वासन सर्व माजी विद्यार्थ्यांनी दिले, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश इंगवले यांनी केले तर प्रास्ताविक शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व माजी विद्यार्थी हनुमंत पवार यांनी केले आणि राजाराम पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

## गिरवी-गणेशगाव बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करावी : हर्षवर्धन पाटील



**इंदापूर :** नीरा नदीवरील गिरवी-गणेशगाव येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या भरावास पुराच्या पाण्याने शुक्रवारी ( दि. 26) भागदाड पडले. परिणामी, शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने या बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे. या बंधाऱ्याला भरावास पुराच्या पाण्याने भगदाड पडण्याची ही तिसरी वेळ आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. निरेला आलेल्या पुराच्या पाण्याने गिरवी गावच्या बाजूला मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्यातील गिरवी गावातून माळशिरस तालुक्यातील गणेशगाव कडे होणारे दळणवळण बंद पडले आहे. जर या बंधाऱ्याच्या भगदाडाची तातडीने दुरुस्ती केली नाही, तर मात्र हा बंधारा पाण्याभोवी कोरडा राहिल्यास बंधाऱ्याच्या पाण्यावर अवलंबून असणारी इंदापूर व माळशिरस तालुक्यातील पिके धोक्यात येणार आहेत. त्यामुळे जलसंपदा विभागाने तातडीने बंधाऱ्याच्या भगदाडाची दुरुस्ती करावी, अशी सूचना हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

## पारुबाई केवटे यांचे निधन



**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील पारुबाई विठ्ठल केवटे वय ८० वर्षे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले, त्यांच्या मागे पती, एक मुलगा, दोन सुना, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे, शिक्रापूर येथील उद्योजक भाऊसाहेब केवटे यांच्या त्या आई तर किशोर केवटे यांच्या आजी होत.

### तीन दिवसांत झाले विविध धार्मिक कार्यक्रम

## हजरत पठाणशाह बाबांचा उरूस उत्साहात संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरानजीक असलेल्या पाडेगांव (ता. खंडाळा) येथील हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाहचा ४० वा उरूस उत्साहात व शांततेत साजरा करण्यात आला. उरूसानिमित्त हजारो भाविकांनी दर्शना साठी हजेरी लावली. ऊरूसानिमित्ताने आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.



पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या पाडेगाव (ता.खंडाळा) येथे हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेली हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाह अनेक वर्षां पासून आहे. हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतिक म्हणून या दर्ग्याकडे पाहिले जाते. हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबांच्या ४० व्या ऊरूसाच्या उत्सवास शुक्रवारी दि.२६ जुलैला संध्याकाळी संदल व गिलाफच्या ( चादर) मिरवणूकीने सुरूवात झाली. ही मिरवणूक दर्गाह पासून नीरा गावातून काढण्यात आली होती. त्यानंतर रात्री उशिरा बाबांच्या समाधीला धार्मिक विधिवत संदल लावण्यात आला.

शनिवारी २७ जुलैला ऊर्साच्या मुख्य दिवशी बाबांच्या दर्शनासाठी पाडेगांव, नीरा परिसरातील भाविकांनी गर्दी केली होती.तसेच रात्री मिलाद ख्वाणीचा कार्यक्रम पार पडला. रविवारी २८ जुलै ला सकाळी नऊ वाजता कुराण पठण झाल्यानंतर सकाळी ११ वाजता जियारतचा धार्मिक विधी करण्यात आला. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

यावेळी पुरंदरचे आ. संजय जगताप, सोमेश्वर सह.साखर कारखान्याचे चेअरमन पुरूषोत्तम जगताप, पुणे ट्रस्ट प्रँक्टीस असोसिएशनचे माजी अध्यक्ष अँड.शिवराज कदम - जहागिरदार, पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य विराज काकडे, नीरेचे उपसरपंच राजेश काकडे, दत्ताजी चव्हाण, बाळासाहेब ननवरे, समर्थ पतसंस्थेचे चेअरमन राजेश चव्हाण, संदीप धायगुडे, अनिल चव्हाण, महेश काकडे, विक्रम दगडे, पाडेगांवचे भगवान माने यांच्यासह अनेक मान्यवरांनी बाबांचे दर्शन घेतले.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष मुस्तफा आतार यांनी मान्यवरांचे स्वागत व सत्कार केला. तर उपाध्यक्ष रशीदभाई सय्यद, सचिव फिरोज सय्यद, विश्वस्त मोहंम्मदगौस आतार यांच्यासह दर्गाह खिदमदगार कमिटीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. #रा

## राष्ट्रवादी कार्यकर्ते तटस्थ भूमिकेत ?

# आढळराव पाटील यांच्यासोबत शिवसैनिकांची फौज कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. निवडणुकीत त्यांना अपयश आले. निवडणूक संपल्यानंतर मात्र आढळराव पाटील यांचे राजकिय ऋणानुबंध राष्ट्रवादीत जुळले नसल्याचे समोर येत आहे. कारण त्यांच्या रविवारी (दि २८) लांडेवाडी, ता. आंबेगाव येथे नेहमीप्रमाणे भरलेल्या जनता दरबारात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिरूर मतदार संघातील कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.





एकमेव आढळराव पाटील वगळता कोणीही राष्ट्रवादीचा पदाधिकारी कार्यकर्ता दिवसभरात येथे उपस्थित नव्हता. शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांशी आत्मीयतेने होणारा संवाद, सहवास असे चित्र पाहून आढळराव पाटील आता नेमके कोणत्या पक्षात आहेत? असा प्रश्न यनिमित्ताने उपस्थित विचारीत होते. त्याला मी महायुतीचा कार्यकर्ता आहे. लोकांना अडचणी येतात, समस्या निर्माण होतात. ही कामे व्हावीत यासाठी दरबाराचे नियोजन करण्यात येते, असे उत्तर आढळराव पाटील देत होते.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास महा मंडळाच्या अध्यक्ष पदी (म्हाडा) शिरूर लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची शासनाकडून नुकतीच नियुक्ती झाली. त्यांनी मागील आठवड्यात पदभार स्वीकारला. त्यानंतर पहिलाच रविवार म्हणून आढळराव पाटील यांचे अभिनंदन करायला त्यांच्या निवासस्थानी गर्दी लोटली होती. हार, तुरे, बुके आणि फोटो शेशनने वातावरण आनंदी आणि उत्साही बनले होते. तरीही लोकसभेच्या पराभवानंतर आढळराव पाटील यांना एखादे महत्त्वाचे पद मिळाले. त्याबद्दल साध्या शुभेच्छा देण्यासाठी राष्ट्रवादीचे कोणीही नसावे याची खंत गर्दितले कार्यकर्ते एकमेकांना बोलुन दाखवीत होते. याची बेरीज वजाबाकी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत होण्याचे संकेत त्याद्वारे मिळत होते. पराभव झाला असला तरीही मतदारसंघात साडेपाच लाख मते आढळराव पाटील यांना मिळाली आहेत, याचे भान सहकारी पक्षांच्या नेते मंडळींनी असु द्यावे असा इशारा शिंदे सेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष आणि खेड पंचायत समितीचे माजी सभापती भगवान पोखरकर यांनी यावेळी दिला.

### खेडमध्ये राष्ट्रवादीचे आमदार, माजी खासदार विधानसभेला एकत्र येणार का ?

● लोकसभेला खेड तालुक्यातील मतदारांनी शरद पवारांच्या उमेदवाराला मोठी आघाडी दिली. निकालाची आकडेवारी पहाता आढळराव पाटील आणि मोहिते पाटील यांच्या जोडीला पसंती मिळाली नसल्याचे समोर आले. शिवाजीराव आढळराव पाटील तीनदा खासदार राहिले.तर दिलीप मोहिते पाटील यांची चौथी पंचवार्षिक सुरू आहे. या दोन नेत्यांमध्ये कधीच पटले नव्हते. लोकसभेला आढळराव पाटील राष्ट्रवादीत आले. म्हणुन त्यांच्या बरोबर मोहिते पाटील प्रचारात दिसले. ही शोलेची दोस्ती प्रत्यक्षात मतदानात उतरली नाही. निकाला नंतरही या नेत्यांचा किंवा त्यांच्या समर्थकांचा संवाद, सहवास दिसुन आला नाही. २९ मे रोजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांचा तर २२ जुलैला उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस खेड तालुक्यात दिमाखात साजरा झाला. त्यात फ्लेक्स किंवा कार्यक्रमात आढळराव पाटील यांना कुठेही स्थान मिळाले नाही. याउलट आढळराव पाटील यांची म्हाडाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली. त्याचे अभिनंदनाचे फ्लेक्स फक्त शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांनी झळकावले. त्यात मोहिते पाटील किंवा अजित पवार यांना जागा मिळाली नसल्याचे स्पष्ट दिसुन आले. या पार्श्वभूमीवर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत खेड आळंदीत या दोन नेत्यांमध्ये काय राजकरण पाहायला मिळणार? याकडे तालुक्याचे लक्ष लागून राहणार आहे.

# दौंड तालुक्यातील पारगावं भीमा नदी पट्ट्यातील शेतपिकांचे प्रचंड नुकसान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** खडकवासला धरणातून सोडलेला पाण्याचा विसर्ग व मुळा मुठा भिमा नदीला आलेल्या पुराचे पाणी दौंड तालुक्यातील पारगांव भिमा नदीपात्रात आलेल्या पुरामुळे नदी काठावरील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीमध्ये पाणी शिरल्याने भिमा नदी काठावरील परिसरातील शेतकऱ्यांचे शेतजमीन, शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, तर काही शेतकऱ्यांच्या जनावरांचे चारा पिकहि पाण्यात गेल्याने शेतकऱ्यांना चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच विद्युत मोटारी,विद्युत पंपाचे मीटर बॉक्स,केबल हेही पुराच्या



पाण्याने उध्वस्त झाले आहेत.

या झालेल्या प्रचंड नुकसानीचे तातडीने पंचनामे व्हावेत व शेतकऱ्यांना सर्वतोपरी अर्थसहाय्य व नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. तर भीमा नदीवरील पुलाच्या पारगाव हद्दीतील कडेला असणारी शेतकऱ्यांचे शेत जमिनीला लागून असणारी संरक्षण भिंतही पुराच्या पाण्याने पडली असुन शेतकऱ्यांची जवळजवळ दहा ते वीस फूट जमीन पाण्याच्या प्रवाहात येणार्या पुरात वाहून जात असते यावरही शेतकऱ्यांनी शासनाकडून ती संरक्षण भिंत बांधू जमीन वाचवावी अशी शेतकरी सुभाष ताकवणे, संजय ताकवणे, सभांजी साळुंखे यांनी शासनाकडे मागणी केली आहे.

## नुकसान

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पारगांव :** भिमा नदीपात्रात आलेल्या पुरामुळे नदी काठावरील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीमध्ये पाणी शिरल्याने भिमा नदी काठावरील परिसरातील शेतकऱ्यांचे शेतजमीन, शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# रांजणगावला घोड धरणावरून नवीन पाणीपुरवठा योजना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीला जल जीवन मिशन अंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी सुधारित प्रस्ताव सादर करावा. वाढत्या लोकसंख्येची तहान भागविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पूर्ण क्षमतेने म्हणजे प्रतिदिन ५०० घ.मी. इतका पाणी पुरवठा ग्रामपंचायतीला करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

रांजणगावची भविष्यातील गरज ओळखून ग्रामपंचायत परिसरात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी देण्यात येईल, अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली. रांजणगाव गणपती, कारेगाव, ढोकसावंगी या ग्रामपंचायतींच्या हद्दीतील औद्योगिक वसाहतीमधील कारखान्याचा कर ग्रामपंचायतीला मिळण्यासंदर्भात तसेच रांजणगाव गणपती ग्रामपंचायत, हिवरे येथील पाणी पुरवठा योजनांच्या कामाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेत मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात आढावा घेण्यात आला.

बैठकीस सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे), उद्योग मंत्री उदय सामंत, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे) यांच्यासह संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, अष्टविनायकांपैकी असलेले रांजणगाव गणपती हे ठिकाण राज्यातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र, पर्यटनस्थळ म्हणून नावारुपाला आले आहे. या परिसरात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक उद्योग-व्यवसाय उभे राहिले आहेत.

रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीसह कारेगाव, ढोकसावंगी, हिवरे या परिसरातील लोकसंख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. या लोकसंख्येला आवश्यक नागरी सुविधा देण्यासाठी पुरेशा क्षमतेची पाणीपुरवठा योजना, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू करणे गरजेचे आहे.

## ‘नृत्य अभंगातून’ वारीचा अनुभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** संत ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्ताबाई, जनाबाई, चोखामेळा, सावता माळी ते नरहरी सोनार अशा अनेक संतांच्या अभंगाचे नृत्यातून सादरीकरण. करून सासवड येथील कलासिध्दी नृत्यालयाच्या नृत्यांगनांनी सासवडकर रसिकांची मने जिंकली. येथील आचार्य अत्रे सांस्कृतीक भवनात आयोजित हा कार्यक्रम विविध कारणांनी विशेष लक्षवेधी ठरला. पुरंदरचे आमदार संजय जगताप व राजवर्धिनी जगताप यांच्या उपस्थितीत हा नृत्याविष्कार सादर झाला. अबीर गुलाल उधळीत रंग.. टाळ बोले चिपळीला... अवघे गर्जे पंढरपूर... दळीता कांडिता.. जगण्याचा पाया चालण्याचे बळ. अवघाचि संसार अशा विविध अभंगांचे नृत्यातून सादरीकरण करत सभागृह भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले.

# प्रा.शैलजा समीर हरूगडे यांना पीएचडी पदवी प्रदान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** येथील विद्या प्रतिष्ठानच्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका शैलजा समीर हरूगडे यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून वनस्पती शास्त्र विषयाची पीएचडी पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली.

"बारामती विभाग आणि आसपासच्या परागकणांचे जैवरासायनिक आणि पौष्टिक विश्लेषण" या विषयावर सादर केलेल्या प्रबंधासाठी त्यांना श्री संत गाडगे महाराज कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय ता.लोहा, जि. नांदेड येथील प्राचार्य डॉ. अशोक गवते यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे लाईफ सायन्स विभागाचे संचालक डॉ. एस. पी. चव्हाण, डॉ. अनिल भुतकर व डॉ. संजय मंडगे उपस्थित होते. त्यांनी प्रा . हरूगडे यांचे हार्दिक अभिनंदन केले. त्यांनी संशोधन काळात आपल्या कॉलेजच्या आणि कौटुंबिक जबाबदाऱ्याही प्रभावीपणे सांभाळून हे दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्याबद्दल त्यांच्या वर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.प्रा. शैलजा हरूगडे यांना मिळालेल्या पीएचडी पदवी बद्दल बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञानज्ञ व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे आदी उपस्थित होते.

# ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण’ योजनेच्या ॲपमध्ये तांत्रिक बिघाड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण’ योजनेसाठीच्या ॲपमध्ये सध्या तांत्रिक बिघाड झाल्यामुळे पूर्व हवेलीतील लोणी काळभोर कुंजीरवाडी, सोरतापवाडी, उरुळी कांचन परिसरातील महिला अर्ज भरण्यासाठी त्रस्त होत आहेत.

सदरचे ॲप कधी सुरू होणार याची विचारणा महिला वर्गातून सुरू झाली आहे. सोमवारी (ता. २९) सकाळपासूनच ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण’योजनेसाठीच्या ॲपमध्ये लॉगिन करताना अडथळा येत आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्याचे काम होत नाही.

राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांसाठी मध्यप्रदेशाच्या धर्तीवर लाडकी बहीण योजना सुरू केली. सुरुवातीच्या टप्प्यात याबाबतच्या अटीमध्ये सातत्याने बदल होत होते. त्यामुळे महिलांना नाव नोंदणीसाठी हेलपाटे मारून कागदांच्या जुळवाजुळवित वेळ घालवावा लागत होता, नाहक रोजगार बुडून मनस्ताप सहन करावा लागत होता. मात्र, सोमवारी सकाळपासूनच ॲपचे सर्वर सातत्याने लोडवर असल्यामुळे बहुसंख्य महिला अर्ज भरू शकल्या नाहीत. १५ ऑगस्ट पर्यंत या योजनेचा हप्ता जमा होणार असल्यामुळे सध्या नोंदणीसाठी महिलांची धावपळ सुरू आहे, परंतु सदर यंत्रणेमध्ये तांत्रिक बिघाड असल्यामुळे ते ॲप ओपन होत नसल्याने महिला आणखीनच त्रस्त झाल्या. याबाबत प्रयत्न केले असता सर्विस अनअवेलेबल असा संदेश येत आहे. ॲपमध्ये तांत्रिक बिघाड असल्यामुळे नवीन नोंदणी होत नाही.

दरम्यान, शासनाने अगोदर ऑनलाईन फॉर्म भरून मग तो अंगणवाडीत जमा करण्याचा पर्याय दिल्याने महिलांची ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी धांदल उडत असुन ॲप बंद असल्याने ॲप कधी सुरू होणार याच्या प्रतिक्षेत महिला आहेत.

याबाबत बोलताना अंगणवाडी पर्यवेक्षिका शांताबाई सिद म्हणाल्या, मागील, दोन दिवसांपासून ॲपमध्ये तांत्रिक बिघाड झाला आहे. त्यामुळे फॉर्म भरता येत नाहीत. "महिला बालविकास कार्यालयाच्या आदेशानुसार फॉर्मची पडताळणी सुरू केली आहे.

**जाहीर नोटीस**
**दौंड येथील मे. उपविभागीय अधिकारी,**
**दौंड यांचे कोर्टात पिठासन अधिकारी श्री. मिनाज मुल्लासो**

श्री. चेतक दिलीप झोजे — फौज/कावि/७७३/२०२४
विरुध्द — अर्जदार
कोणी नाही — जाब देणार

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडिल दिलीप गोविंद झोजे यांचा जन्म दिनांक १९/०७/१९६८ रोजी फराटे गल्ली, दौंड, ता. दौंड, जि. पुणे येथे राहत्या घरी झाला असून, त्यांचे जन्माची नोंद दौंड नगरपरिषद यांचे दप्तरी नसलेने सदर जन्म नोंद होणेबाबत परवानगी मिळणेसाठी व तसा जन्म दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे, तसेच अर्जदार यांचे वडिलांचा जन्म दाखला मिळणेचा आदेश बाबत मागणी केलेली आहे.

तरी या जाहिर नोटीसीद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील नेमलेली दिनांक ०२/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत स्वतः अगर वकिलांमार्फत लेखी हरकत मा. उपविभागीय अधिकारी, दौंड यांचेकडे किंवा मा.मंडल अधिकारी, दौंड यांचेकडे नोंदवावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरहू अर्जदार यांना त्यांचे वडिलांचा जन्माचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस असे.

दौंड.
दिनांक : २९/०७/२०२४

सही/-
**ॲड. राजेंद्र बोडखे**
नोटरी (भारत सरकार)
प्रदिप प्लाझा, दौंड (पुणे)

**राजेंद्र कचरे उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरिकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद कारणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार श्री. शहाजी बाबुराव कोंडे रा. केळवडे ता. भोर जि. पुणे. यांनी या कार्यालयाकडे जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांची आई कै. फुलाबाई बाबुराव कोंडे यांचा मृत्यु मौजे केळवडे ता. भोर जि. पुणे येथे दि. १७/०२/२०१० रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप /हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि. १०/०७/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/मृत्यु/एस. आर/ /२०२४
दिनांक : १०/०७/२०२४
ठिकाण : भोर

**(राजेंद्र कचरे)**
उपविभागीय अधिकारी तथा
दंडाधिकारी भोर उपविभाग भोर

## Selected



## शिवसेनेतर्फे दिव्यांगांना फळे वाटप व विविध उपक्रम

**खडकवासला :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना खडकवासला तर्फे धायरी येथील ज्ञानगंगोत्री मतिमंद मुलांचे शाळेतील मुलांना केळी, सफरचंद आणि डाळिंब या फळांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी विधानसभा प्रमुख नितीन वाघ, माजी तालुका प्रमुख संदीप मते, उपशहर प्रमुख भरत कुंभारकर, संघटक संतोष गोपाळ, प्रभागप्रमुख खुशाल वांजळे, सचिन भालेकर,रणजित दिवाकर हे उपस्थित होते. उपविभागप्रमुख नाना मरगळे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. संस्थेचे अध्यक्ष विक्रम कसबे यांनी आभार मानले. धनकवडी येथील ग्रामदैवत श्री आई जानुबाई देवीला महाअभिषेक करण्यात आला व महाआरती घेण्यात आली व राजमुद्रा सोसायटी येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात आरती करण्यात आली. यावेळी विधानसभा प्रमुख नितीन वाघ, संदीप मते, योगेश पवार, अनिल बटाणे, रमेश शेलार, सचिन धुमाळ, प्रल्हाद कदम, दीपक जाधव, निरंजन कुलकर्णी, राहुल देशमुख, सागर बारणे, आनंद कांबळे, अमित माने, रमेश बोराटे, अमोल कदम, सारंग धारणे, अविनाश शुक्ला, नंदू जांभळे, निलेश पाटील युवती सेना विधानसभा अधिकारी धनश्री दांगट शिंदे, स्वाती दाभेकर हे उपस्थित होते.

## माऊलींच्या गजरात पालखी आळंदीत दाखल; नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण

**आळंदी :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज पालखीचे पंढरपूरहून आळंदीत मंगळवार (दि. ३०) हजारो भाविक भक्तांचा सानिध्यात आळंदीत आगमन झाले. या वेळी ठीक ठिकाणी माऊलींच्या भक्तांकडून स्वागत करण्यात आले. यावेळी आळंदीसह परिसरात भक्तीमय वातावरण पहावयास मिळाले. पालखीचे सकाळी (दि. ३०) पुणे येथील भवानी पेठेतून प्रस्थान घेऊन पालखी सायंकाळी पाचच्या सुमारास



आळंदीत दाखल झाली. यावेळी आळंदीत प्रवेश करताना माऊलींचे विसावाचे ठिकाण काळे पेट्रोल पंप शेजारी पालखी थांबल्यावर फटाक्यांच्या आतषबाजी व टाळ मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा माऊली जयघोषात विश्व माऊली ज्ञानोबाराय आळंदीमध्ये परतले. जणू काही आळंदीचे चैतन्य परतले.

## माळीण दुर्घटनेतील स्मृतींना अभिवादन



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील माळीण येथे ३० जुलै २०१४ रोजी नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या दुर्घटनेत ४४ कुटुंबातील १५१ व्यक्तींचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेला आज १० वर्षे पूर्ण झाली. या दुर्घटनेतील निष्पाप जीवांच्या पवित्र स्मृतींना आज स्मृतिस्तंभ येथे पूर्वा वळसे पाटील यांनी आदरांजली वाहिली. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील,आंबेगाव जुन्नर उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, तहसीलदार संजय नागटिळक, गटविकास अधिकारी श्रीमती प्रमिला वाळुंज, माजी सभापती प्रकाशराव घोलप, संजय गवारी, अमोल अंकुश, झांझरे गुरुजी, सखाराम विरणक गुरुजी, दिपक विरनक, माळीण गावचे सरपंच रघुनाथ झांझरे, अडिवरे गावच्या सरपंच संगिता किर्वे, राजेंद्र थोरात, निलेश बोऱ्हाडे यांच्यासह माळीण व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळविण्यात येत की ईश्वरचंद ज्ञानीराम अगरवाल संतोषी निवास मोहन नगर चिंचवड पुणे४११०१९ यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या नावावर असलेले चार चाकी खाजगी वाहनMH14CS4127 असा असून सदर वाहन त्यांचे कायदेशीर वारसदार पत्नी संतोषी ईश्वरदास मित्तल यांच्या नावावर पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही हे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२७/०७/२०२४

संतोषी ईश्वरदास मित्तल
संतोषी निवास मोहन नगर
चिंचवड पुणे : पिन४११०१९

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात येते की, आमचे अशोल नामे श्रीमती संगीता बाळासाहेब लांडे रा. लांडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे यांचे पती नामे बाळासाहेब हरिश्चंद्र लांडे हे गावी दिनांक २५/०४/२०२३ रोजी आजारपणाने मयत झाले आहेत. त्यांच्या नावे महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर तिचा आर. टी.ओ. पिंपरी-चिंचवड, पुणे यांचेकडील पासिंग नं. MH 14 JM 9838 असा असून चॅसी नं. MBNZKGBBKMGM07919 इंजिन नं. GMM4WLA8746 असा आहे. सदरच्या ट्रॅक्टर आमचे अशिलांचे पती मयत झाल्यामुळे आमचे अशिलांचे नावे ट्रान्सफर करण्याची आहे. सदर ट्रॅक्टर आमचे अशिलांचे नावे ट्रान्सफर करणेकामी कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी १५ (पंधरा) दिवसांच्या आत अस्सल कागदपत्रे आम्हास प्रत्यक्ष दाखवावीत व वरीलप्रमाणे मुदतीत कोणाची काही हरकत न असल्यास सदरील ट्रॅक्टर आमचे अशिलांचे नावे ट्रान्सफर करण्यात येतील. मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही.

श्रीमती संगीता
बाळासाहेब लांडे
दिनांक: २९/०७/२०२४

## १३ संघटनांनी पुन्हा घेतला आक्रमक पवित्रा

# एसटीचा ९ ऑगस्टपासून संप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या १३ संघटनांनी पुन्हा एकदा संप पुकारला आहे. राज्यातील एसटी कर्मचारी ९ ऑगस्टपासून संपावर जाणार आहेत. यामुळे राज्यात लालपरीची चाके थांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटीच्या कर्मचाऱ्यांनाही वेतन देण्यात यावे या प्रमुख मागण्यांसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील एसटी कर्मचाऱ्यांनी २०२१ मध्ये दीर्घ आंदोलन केले होते. त्यावेळी एसटी बंद झाल्यामुळे राज्यातील दळणवळण पुरते ठप्प झाले होते. सलग ५४ दिवस सुरू असलेला हा संप २० डिसेंबर २०२१ रोजी मागे घेतला होता. त्यावेळी राज्य शासनाने काही मागण्या मान्य केल्या होत्या. त्यात कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर करण्याचे आश्वासन दिले गेले होते. परंतु, त्या सर्व मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, असा आरोप करत पुन्हा एकदा कर्मचाऱ्यांनी संपाची हाक दिली आहे. ऑगस्ट महिन्यात अनेक सण, उत्सव येणार आहेत. त्यावेळी लालपरी पुन्हा एकदा ठप्प होण्याची शक्यता आहे.

### अशा आहेत मागण्या

- राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटीच्या कर्मचाऱ्यांना वेतन.
- कामगार कराराच्या तरतुदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांना देय थकबाकी महागाई भत्ता.
- घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ थकबाकी.
- सन २०१६-२०२० या कालावधीसाठी जाहीर केलेल्या ४८४९ कोटीमधील शिल्लक रक्कम वाटप.
- सर्वच कामगारांच्या मूळ वेतनात सरसकट पाच हजारांची वाढ.



# विद्यार्थ्यांना गणवेश केव्हा? : संभाजी ब्रिगेड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एक राज्य एक गणवेश योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश मिळणे अपेक्षित होते. परंतु, अद्यापही गणवेश मिळाले नसल्याने विद्यार्थी व पालक नाराज झाले आहेत. सर्व विद्यार्थ्यांना तत्काळ गणवेश न मिळाल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्यभर विद्यार्थी, पालकांसह तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

राज्य सरकारने गणवेश बनवण्याचे कंत्राट महाराष्ट्र सोडून गुजरातच्या कंत्राटदाराला दिल्यामुळे त्यांनी अजून गणवेश बनवलेले नाहीत, असा आरोपही ब्रिगेडने केला. शिक्षण सहउपसंचालक पूजा सोळुंके यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, स्वातंत्र्य दिन विद्यार्थ्यांना जुन्या कपड्यांवरच साजरा करावा लागेल अशी स्थिती आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा संघटक संतोष शिंदे, सोलापूर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, मध्य जिल्हाध्यक्ष उत्तम कामठे, उत्तर जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर घाडगे, महानगर अध्यक्ष अविनाश मोहिते, अशोक फाजगे, जिल्हा सचिव तेजश्री पवार, महिला आघाडी अध्यक्ष अश्विनी सोनवणे, उद्योग आघाडी सचिव संतोष कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष साजिद सय्यद, पर्वती महिला आघाडी अध्यक्षा अर्चना गव्हाणे, जिल्हा संघटक रेखा कामठे, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## » Selected

### कार अपघातात पत्रकाराचा मृत्यू

**धुळे :** धुळे-औरंगाबाद महामार्गावर ट्रक चालकाने रस्त्यात उभ्या असलेल्या चार चाकी वाहनाला धडक दिल्याने धुळे जिल्ह्यातील रहिवासी आणि मुंबईत कार्यरत असलेले तरुण पत्रकार हर्षल भदाणे पाटील यांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातात इतर दोन जण जखमी झाले आहेत. पत्रकार हर्षल भदाणे पाटील त्यांच्या गावी गेले होते. गावावरून परतत असताना धुळे जिल्ह्यातील गरताड गावाजवळ त्यांनी त्यांची कार उभी केली होती. त्यावेळी समोरून आलेल्या एका भरधाव ट्रकने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. यावेळी हर्षल यांनी स्वतःला वाचवण्यासाठी कारमधून उडी मारण्याचा प्रयत्न केला. पण, ते ट्रकच्या चाकाखाली सापडले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातग्रस्त कारमध्ये हर्षल भदाणे यांच्यासह आणखी दोन जण बसले होते. हे दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना धुळ्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर ट्रक चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. पण, काही नागरिकांनी त्याचा पाठलाग करत त्याला बेदम चोप दिला.

### मलिकांना वैद्यकीय जामीन

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. उच्च न्यायालयातील जामीनावरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत त्यांना वैद्यकीय जामीन मंजूर करण्यात आला आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने मलिकांना वैद्यकीय कारणांसाठी तात्पुरता जामीन दिला होता. त्यावेळी मलिकांनी जामीन अर्जात आपल्याला किडनी, लिव्हर, हृदयाशी संबंधित अनेक शारीरिक व्याधी असल्याचे नमूद केले होते. आता याप्रकरणी जामीन सर्वोच्च न्यायालयाकडून कायम करण्यात आला आहे. जमीन विक्रीच्या घोटाळ्यात मलिकांना ईडीने अटक केली होती.



# साखर आयुक्तालयावर ७ ऑगस्टला इशारा मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शासनाचे व साखर संघाचे लक्ष वेधण्यासाठी ७ ऑगस्ट रोजी साखर आयुक्तालयावर इशारा मोर्चा काढण्याची घोषणा करत महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाने आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्यातील साखर व जोडधंद्यातील कामगारांच्या वेतनवाढ कराराबाबतच्या त्रिपक्षीय समितीच्या कराराची मुदत ३१ मार्च रोजी संपली आहे. नवीन समिती स्थापन करण्यासाठी शासनाकडे पाच महिने पाठपुरावा करूनही हालचाली होत नसल्याचे मंडळाने म्हटले आहे.

मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने साखर आयुक्त डॉ. कृणाल खेमनार यांच्या साखर संकुल येथे चर्चा केली. त्यावेळी वेतनवाढीसाठी तत्काळ त्रिपक्षीय समिती गठित करण्याची मागणी करीत मोर्चाचा इशारा देण्यात आला.

शिष्टमंडळात संघटनेचे कार्याध्यक्ष राऊसाहेब पाटील, सरचिटणीस शंकरराव भोसले, कोषाध्यक्ष प्रदीप बनगे, राजेंद्र तावरे, संजय मोरबाळे व अन्य पदाधिकारी होते. दरम्यान, संघटनेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कामगारमंत्री सुरेश खाडे व अन्य मंत्र्यांनाही निवेदन देत मागण्यांकडे लक्ष वेधले आहे.

### साखर कामगारांच्या प्रमुख मागण्या

- साखर व जोडधंद्यातील कामगारांना पगारवाढ.
- वेतन व सेवाशर्ती ठरविण्यासाठी त्रिपक्षीय समिती.
- रोजंदारी, कंत्राटी, नैमित्तिक व तात्पुरती काम करणाऱ्या कामगारांनाही अकुशल कामगारांच्या वेतनाप्रमाणे मागील करारातील तरतुदीनुसार वेतन.
- साखर कामगारांचे थकीत वेतन मंडळाच्या पगार वाढीच्या करारानुसार मिळावे.

## 'बिबट्या चिमण्यांची शिकार करणार'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**परभणी :** विधानसभा निवडणुकीआधी उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार स्वगृही परतणार असल्याच्या चर्चा होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे नेते उत्तम जानकर यांनी अजित पवारांना लक्ष्य करत, 'राज्याला आग लागल्यावर पळून गेलेला बिबट्या आता परत येऊन आग विझविणाऱ्या चिमण्यांची शिकार करण्याच्या तयारीत, त्याला घेऊ नका', अशी टीका केली आहे.

जानकर म्हणाले की, काही दिवसांपूर्वी भाजपच्या अजगराचा विळखा देशाला आणि राज्याला पडला होता. जंगलाला आग लागल्यावर आपला बिबट्याही ४० जणांना घेऊन पळून गेला होता. मात्र यावेळी पक्षातील प्रामाणिक कार्यकर्त्यांनी चिमणी बनून पाणी टाकून ही आग विझविली.

# एमपीएससीत २५० बोगस दिव्यांग प्रमाणपत्रे?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर यांनी दिलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रावरून देशभरात वादळ निर्माण झाले असतानाच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतही बोगस दिव्यांग प्रमाणपत्र दिल्याचा दावा केला जात आहे. स्टुडंट राईट असोसिएशन या संघटनेने अशा उमेदवारांची यादीच तयार केली आहे. ती यादी लोकसेवा आयोग, दिव्यांग मंत्रालय आणि मुख्यमंत्र्यांना देण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून केली जाते. त्यात दिव्यांगांसाठी आरक्षण कोटा दिलेला असतो. परंतु, या कोट्याचा गैरवापर होत असल्याचा आक्षेप आहे. काही जण निकषानुसार दिव्यांग नसताना त्यांच्याकडून त्या आरक्षण कोट्यातून अर्ज केले गेले आहेत. राज्यात २५० विद्यार्थ्यांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र दिल्याचा दावा एमपीएससी स्टुडंट राईट असोसिएशनने केला आहे.

असोसिएशनचे महेश बडे यांनी सांगितले की, राज्यात सर्व्हे करून यादी तयार केली आहे. त्या सर्व्हेमध्ये काही जणांनी बनावट प्रमाणपत्रे घेतल्याचे समोर आले आहे. यामुळे आता ही यादी आमदार बच्चू कडू आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही देणार आहोत. एमपीएससीने या प्रकरणाची फेर पडताळणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. खेडकर प्रकरणानंतर यूपीएससीमधील दिव्यांग प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रांचा विषय समोर आला. त्यानंतर राज्यातही असाच प्रकार होत असल्याचा दावा स्टुडंट राईट असोशिएशनने केला आहे. यामुळे आता महाराष्ट्र लोकसेवा आयोग या सर्व प्रकरणांची चौकशी करणार का? संघटनेने ज्या २५० जणांची नावे दिली आहेत, त्याची चौकशी होणार का? असे प्रश्न निर्माण झाले आहेत.

## राज ठाकरेंना सुपारीबाज म्हटल्याने केला हल्ला

# मनसैनिकांनी फोडली मिटकरींची गाडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या विरोधात टीका केल्यानंतर मनसे कार्यकर्त्यांनी मिटकरी यांची गाडी फोडली. हे कार्यकर्ते मिटकरी यांच्यावरही हल्ला करण्याच्या प्रयत्नात होते; परंतु समर्थकांनी त्यांना मिटकरी यांच्यापर्यंत पोहोचू दिले नाही.

अकोल्यातील शासकीय विश्रामगृहाच्या बाहेर हा प्रकार घडला. मिटकरी यांनी राज ठाकरे यांचा उल्लेख सुपारीबाज असा केला होता. हल्ल्यात मिटकरी यांच्या गाडीच्या काचा फुटल्या. या घटनेवेळी मनसे आणि अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार धुमश्चक्री उडाली. एकमेकांना धक्काबुक्की व शिवीगाळ करण्यात आली. दरम्यान, मिटकरी यांनी हल्ल्याबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले की, अशा हल्ल्यांना आम्ही भीक घालत नाही. असे करून महायुतीत सत्ता मिळवता येईल, असे त्यांना वाटत असेल तर तसे होणार नाही. असे मागून हल्ले करून काही होणार नाही. ते नपुंसक लोक आहेत.



राज ठाकरे यांनी सोमवारी पुण्यातील पत्रकार परिषदेत अजित पवार यांना लक्ष्य केले होते. पवार पुण्यात नसूनही पुण्यातील धरणं भरली, असे त्यांनी म्हटले होते. यानंतर मिटकरी यांनी टोल आणि भोंग्याचे आंदोलन फसलेल्या सुपारीबहाद्दरांनी अजित पवारांवर बोलू नये, असे उत्तर दिले होते. त्यांना जीवनात कुठल्याही आंदोलनाला यश आले नाही. राज ठाकरे या व्यक्तीची विश्वासार्हता संपली आहे. महाराष्ट्रातील आतापर्यंतच्या राजकीय इतिहासात सर्वात अयशस्वी ठरलेल्या व्यक्तींनी अजितदादांच्या कार्यकर्तृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे म्हणजे हे सूर्याला वाकुल्या दाखवण्यासारखे आहे, असे मिटकरी यांनी म्हटले होते.

## आंबेडकर - मुंडे यांच्यात बीड येथे भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर व नवनिर्वाचित विधानपरिषद आमदार पंकजा मुंडे यांची भेट झाली. आरक्षण बचाव यात्रेदरम्यान लातूरहून बीडकडे येत असताना आंबेडकर यांची मुंडे यांनी भेट घेतली. यामुळे राजकीय वर्तुळामध्ये चर्चेला उधाण आले. आंबेडकर हे सोमवारी दिवसभर लातूरमध्ये होते. मंगळवार ते लातूरहून बीडकडे निघाले असता त्याचवेळी पंकजा मुंडे या बीडवरून लातूरकडे निघाल्या होत्या. रस्त्यात दोन्ही नेत्यांची भेट झाली. ही भेट नियोजित नव्हती, मात्र राजकीय वर्तुळात तिची चर्चा झालीच.

आरक्षण बचाव यात्रा २४ जुलैपासून चैत्यभूमीवरून निघाली. ७ ऑगस्टपर्यंत पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, अहमदनगर, उस्मानाबाद, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, जालना या शहरांतून जाऊन छत्रपती संभाजीनगर येथे यात्रेचा समारोप होणार आहे.

## आरक्षण बचाव

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**बीड :** वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची आरक्षण बचाव यात्रा लातूरहून बीडकडे जात असताना रस्त्यात नवनिर्वाचित विधानपरिषद आमदार पंकजा मुंडे यांनी त्यांची भेट घेतली.

# दिल्लीतील महाराष्ट्र सदन असुविधांनी ग्रस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीतील मराठी माणसांचे हक्काचे ठिकाण असलेल्या महाराष्ट्र सदनातील असुविधांबाबत कायमच तक्रारी होत आल्या आहेत. आता तर येथील काही सुविधांवरून चक्क खासदारानेच संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्र सदनातील कँटीन आणि अन्य सुविधांबाबत शिवसेना शिंदे गटाचे खासदार रवींद्र वायकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले आहे. सदनातील सुविधांचा बोजवारा उडाल्याचा पाढा त्यांनी वाचला आहे.

वायकर यांनी अमोल कीर्तीकर यांचा पराभव करून दिल्ली गाठली आहे. त्यांच्या निकालावर अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. हे प्रकरण अद्याप न्यायालयातही आहे. मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र सदनाची वास्तू चांगली असली तरी या सदनामध्ये काही सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. फक्त खासदारांसाठी वेगळा सेल असणे आवश्यक आहे. खासदार कक्षात असणारी संगणकांची संख्या अपुरी आहे. खासदारांच्या पत्र व्यवहाराची कामे वेगाने करून देण्यासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेवरील टंकलेखक कर्मचाऱ्यांची नेमणूक होणे आवश्यक आहे. वाय-फाय सुविधेचा दर्जा चांगला नसल्याने खोलीत मोबाईलला रेंज मिळत नाही. उपहार गृहातील खाद्य पदार्थांचे दर जास्त असून, पदार्थांचा दर्जाही चांगला नाही. काही वेळा अधिकाऱ्यांच्या आदेशावरून सदनातील खोल्यांमध्ये नळाद्वारे मिळणाऱ्या गरम पाण्याची व्यवस्था बंद ठेवण्यात येते.

## सुरक्षेशी खेळ करणारा उपमुख्यमंत्री नको : उद्धव ठाकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** वेषांतर करून देशाच्या सुरक्षेशी खेळ करणारा आणि पक्ष फोडणारा उपमुख्यमंत्री नको, अशी टीका शिवसेना उबाठा गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली आहे.

घृणास्पद काम करणारे लोक सत्तेवर आहेत. कुटुंब बघत नाहीत, मुला बाळांवर घाणेरडे आरोप करून त्यांचे आयुष्य बरबाद करत आहेत. पूर्वीचा भाजप वेगळा होता. आताचा अत्यंत घृणास्पद आणि अमानुष पद्धतीने काम करणारा आहे. ही वृत्ती देशातून आणि महाराष्ट्रातून नष्ट झाली पाहिजे, असे ठाकरे म्हणाले. नाव बदलून, दुसऱ्यांना टोप्या घालून जात असतील तर भयंकर बाब आहे. विमानतळाची सुरक्षा बोगस आहे हेच त्यांनी बाहेर काढले.

## राजकीय वाद कौटुंबिक पातळीवर घसरला

# विद्या चव्हाण - चित्रा वाघांमध्ये वाक्‌युद्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राजकीय नेत्यांमध्ये सार्वजनिक विषयावरून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडणे हे तसे नेहमीचेच; मात्र कधी कधी ही नेतेमंडळी व्यक्तिगत पातळीवर येऊन एकमेकांचे चांगलेच वाभाडे काढतात. असाच प्रकार राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नेत्या विद्या चव्हाण आणि भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांच्यात मंगळवारी पाहायला मिळाला. वाघ यांनी शरद पवारांसह राजकीय नेते आणि पत्रकारांबाबत एक पोस्ट शेअर केली.

या पोस्टच्या कॅप्शनमध्ये वाघ यांनी लिहिले की, "एक छान कार्टून पाहण्यात आले. ज्याने काढले, त्याच्या कल्पकतेला सलाम! महाराष्ट्राचे पक्षीमित्र! एकाचा वापर संपला की दुसरा पिंजऱ्यातून बाहेर काढतात!" यावरून राष्ट्रवादीच्या नितीन देशमुख यांनी तक्रार केली. या चित्रातून पवार यांच्या सोबतच मनोज जरांगे, संजय राऊत, जितेंद्र आव्हाड यांची वाघ यांनी बदनामी केली असून सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचा प्रयत्न केल्याचा तक्रारीत उल्लेख करण्यात आला. वाघ यांनी शेअर केलेल्या फोटोवरून चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेत पलटवार केला. तसेच, त्यांच्या सून गौरी चव्हाण यांना आमच्या कुटुंबाविरुद्ध चिथावणी दिल्याचा आरोप करीत वाघ व गौरी यांच्यातील संभाषणाची ऑडिओ क्लिप सादर केली. त्यावर लागलीच वाघ यांनी पत्रकार परिषद घेत वैयक्तिक आरोप केले. उभय नेत्यांनी एकमेकांवर सोडलेले वाक्बाण त्यांच्याच शब्दात.

### चित्रा वाघांनी माझ्या सुनेचा वापर केला

- चित्रा वाघ या आमच्यामुळेच मोठ्या झाल्या आहेत. त्यांनी माझ्या सुनेचा वापर करून आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. विषय राजकीयच करायचा होता. वाघ यांनी आमच्या कौटुंबिक वादात उडी घेऊन आम्हाला बदनाम करण्याचे कारस्थान केले आहे. वाघ यांना सापशिडीवर जसं ढांग पडून मोठ्या शिडीवर जायचं असतं, तसं आपण कोणी खूप मोठं झालोय की काय, असं वाटतंय. त्यांनी सापशिड्यांवर अनेकांचा वापर केलाय, त्यात मीही आहे. चित्रा वाघ आमच्यामुळेच मोठी झाली. राष्ट्रवादीचे नेते मधुकर पिचड, जयंत पाटील, सुनिल तटकरे यांच्याकडे मी तिची शिफारस केली. त्यानंतर ही मोठी झाली आणि आज सुप्रिया सुळे व शरद पवारांवर टीका करतेय.

### माझ्या परिवाराला गोत्यात आणण्याचा प्रयत्न

- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने यापूर्वीही तीन-चारवेळा वेगवेगळ्या बायकांना बसवून मी कशी वाईट आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला. पवारसाहेब व मोठ्या ताई, या तुमच्या गँगला आवरा. माझा आवाज कोणीही दाबू शकत नाही. तुम्ही माझ्या परिवाराला गोत्यात आणायचा प्रयत्न केला. माझी बदनामी करून झाली, माझी नावं शंभर लोकांसोबत लावून झाली. विद्या चव्हाणांची सून गौरीला बाई म्हणून मी मदत केली. मला पक्षाने संधी दिली, मी काम केलं. चित्रा वाघमध्ये काही तरी क्वॉलिटी होती म्हणून मला जबाबदारी दिली. आम्ही देशमुखांच्या पेन ड्राइव्हची वाट बघत होतो. जे पुरावे आहेत ते सादर करा, अन्यथा तीन तासात आम्ही पेन ड्राईव्ह सादर करू.

#रा

# वायनाडमध्ये दरड कोसळून १२३ ठार

## मुसळधार पावसात टेकड्या कोसळल्या: पावसामुळे बचावकार्यात अडथळा, पूलही कोसळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वायनाड:** केरळच्या वायनाडमध्ये भूस्खलनात १२३ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जखमी झाले आहेत. ढिगाऱ्यातून दोघांना जिवंत वाचवण्यात आले असून, २५० जणांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे, अशी माहिती गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी मंगळवारी राज्यसभेत दिली. मंगळवारी सकाळी वायनाडमध्ये भूस्खलन झाले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, केरळमधील वायनाडमध्ये सोमवारी रात्री उशिरापासून मंगळवारी पहाटे मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात दरड कोसळून १२३ जणांचा मृत्यू झाला. हा अपघात इतका मोठा होता की, राज्य सरकारच्या विनंतीवरून लष्करही घटनास्थळी पाठवण्यात आले असून, बचावकार्य सुरू आहे. या आपत्तीमुळे विहंगम दृश्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या मुंडक्कई, चुरलमला, अट्टामाला आणि नूलपुझा गावांचा चेहरामोहरा बदलला आहे. तसेच त्यांचा इतर भागांशी संपर्क तुटला आहे.

केरळचे वनमंत्री ए. के. शशींद्रन म्हणाले, परिस्थिती गंभीर असून, सरकारने बचावकार्यासाठी सर्व यंत्रणांना एकत्र केले आहे. या भूस्खलनामुळे अनेक रस्ते तुटले असून एक पूल कोसळला आहे. वायनाडमध्ये एकूण ३ ठिकाणी मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले

### काळाचा घाला...

असून, त्यात शेकडो लोक गाडले जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बचावकार्यात लष्करही गुंतले आहे, पण आजही पाऊस सुरूच आहे, अशी कठीण परिस्थिती आहे. भूस्खलनानंतर उद्ध्वस्त झालेली घरे, नद्यांना पूर आणि उन्मळून पडलेली झाडे अशी दृश्ये दिसत आहेत. पुराच्या पाण्यात वाहून गेलेली वाहने अनेक ठिकाणी झाडांच्या खोडात अडकून इकडे तिकडे बुडालेली दिसत होती. उफाळलेल्या नद्यांनी आपला मार्ग बदलला असून ते रहिवासी भागात ओसंडून वाहत आहे.

डोंगरावरून कोसळणारे मोठे दगड बचावकार्याच्या मार्गात अडथळा आणत आहेत. मुसळधार पावसात बचाव कर्मचारी मृतदेह आणि जखमींना रुग्णवाहिकेत घेऊन जाताना दिसत आहेत. वायनाड जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, चुरालामाला शहरात एका मुलासह चार जणांचा मृत्यू झाला, तर थोंडरनाड गावात नेपाळी कुटुंबातील एका वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला. याशिवाय पोथुकल गावाजवळ नदीच्या काठावर पाच वर्षांच्या मुलासह तिघांचे मृतदेह सापडले आहेत. भूस्खलन प्रवण भागात मुंडक्कई, चुरालमला, अट्टामाला आणि नूलपुझा गावांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्याशी चर्चा केली. पंतप्रधान मोदींनी मुख्यमंत्र्यांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.



## मदतीसाठी आक्रोश

● केरळमध्ये लोकांवर आपत्तीचा वर्षाव झाला आहे. यानंतर तिथून अत्यंत वेदनादायक व्हिडिओ समोर येत आहेत. घरे आणि ढिगाऱ्याखाली अडकल्यानंतर लोक मदतीसाठी हाक मारताना दिसून आले. टीव्ही चॅनल्सवर अनेक जण फोनवर बोलताना दिसत होते. यात ते रडत स्वत:ला वाचवण्याची विनंती करत होते. कारण, एकतर हे लोक आपापल्या घरात अडकले आहेत. किंवा पूल वाहून गेल्याने आणि रस्ते पाण्याखाली गेल्याने त्यांना बाहेर पडण्याचा मार्ग नाही. अशाच एका संभाषणात चुलारमाळा शहरात राहणारी एक महिला मोठ्याने रडत होती की तिच्या घरातील कोणीतरी ढिगाऱ्याखाली अडकले आहे आणि त्याला बाहेर काढता येत नाही. भूस्खलन प्रवण भागात मुंडक्कई, चुरालमला, अट्टामाला आणि नूलपुझा गावांचा समावेश आहे.



## वायनाड घटनेत सर्वतोपरी मदत करा

**नवी दिल्ली :** केरळमधील वायनाड येथे भूस्खलनात ७० हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून, बाधितांच्या बचाव आणि पुनर्वसनासाठी केंद्रसरकारने सर्वतोपरी मदत करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी लोकसभेत केली. शून्य प्रहरात हा मुद्दा उपस्थित करत राहुल गांधी यांनी भूस्खलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना वाढीव नुकसान भरपाई देण्याची तसेच वाहतूक आणि दळणवळण यंत्रणा पूर्ववत करण्याची मागणी केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्याशी चर्चा केली आहे.



२५० जणांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले



आणि होत्याचे झाले नव्हते...

# जमशेदपूर येथे भीषण रेल्वे अपघात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जमशेदपूर :** झारखंडमधील जमशेदपूरमध्ये भीषण रेल्वे अपघात झाला आहे. हावडा-मुंबई मेल एक्स्प्रेसचे सर्व डबे रुळावरून घसरले. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून, ३० जण जखमी झाल्याची माहिती आहे. सर्वांना उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. दक्षिण पूर्व रेल्वेच्या चक्रधरपूर विभागांतर्गत जमशेदपूरपासून ८० किलोमीटर अंतरावर असलेल्या बडाबांबूजवळ पहाटे पावणेचार वाजता हा अपघात झाला. स्थानिक लोकांच्या मदतीने बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. एनडीआरएफचे पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे.

दरम्यान, या घटनेचे कारणही समोर आले आहे. हावडा मुंबई मेलचे डबे मालगाडीला धडकून रुळावरून घसरले. हा अपघात इतका भीषण होता की, दोन प्रवाशांचे मृतदेह ट्रेनच्या बाथरूममध्ये अडकले होते. रेल्वेचा डबा कापून मृतदेह बाहेर काढण्यात आले. या दुर्घटनेनंतर अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. हेल्पलाईन क्रमांक जारी करण्यात आले आहेत. याशिवाय जमशेदपूरच्या टीएमएच, मेडिकल कॉलेज आणि सदर हॉस्पिटललाही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सरायकेला-खरसावांचे पोलीस अधीक्षक मुकेश लुनायत यांनी सांगितले की, प्राथमिक अहवालानुसार ज्या ठिकाणी अपघात झाला त्या ठिकाणी एक मालगाडी रुळावरून घसरली होती. अशा तऱ्हेने हावडा-मुंबई मेल एक्स्प्रेसने मालगाडीला पाठीमागून धडक दिली आणि गाडीचे सर्व डबे रुळावरून घसरले. अपघाताच्या वेळी ही गाडी ताशी १२० किमी वेगाने जात होती.



## त्रिवेंद्रम येथील रेल्वे दुर्घटना टळली

**त्रिवेंद्रम:** केरळच्या त्रिवेंद्रम विभागात मोठी रेल्वे दुर्घटना टळली आहे. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विभागातील वालाथोल शहर ते वडक्कनचेरी दरम्यान रुळावर दरड कोसळल्याने मातीची धूप होऊन मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. वॉचमनने तात्काळ आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली, त्यानंतर अधिकाऱ्यांनी गाडीच्या ड्रायव्हरला इशारा करून गाडी थांबवली. तेथून गाडी निघाली तर काही तरी अनुचित प्रकार घडण्याची शक्यता होती.

## सानुग्रह अनुदानात वाढ

● रेल्वे अपघात आणि रेल्वेशी संबंधित इतर अनुचित घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्या प्रवाशांच्या वारसांना देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदानात भारतीय रेल्वे मंत्रालयाने सुधारणा केली आहे. रेल्वे मंत्रालयाने जाहीर केले आहे की, आता या घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्या प्रवाशांच्या कुटुंबियांना तात्काळ खर्चासाठी ५० हजार रुपये रोख दिले जातील.

● या नव्या तरतुदीचा उद्देश बाधित कुटुंबांना तात्काळ दिलासा देणे, त्यांना सुरुवातीचा खर्च सहजपणे भागविणे हा आहे. रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ही रक्कम बाधित कुटुंबांना तातडीची मदत देण्यासाठी असून ती रोख स्वरूपात तात्काळ उपलब्ध करून दिली जाईल. यापूर्वी झालेल्या अपघातांवरून रेल्वे मंत्रालय विरोधकांच्या निशाण्यावर असतानाच ही घोषणा करण्यात आली आहे.

● भारतीय रेल्वे मंत्रालयाने गेल्या वर्षी सानुग्रह अनुदानाच्या रकमेत सुधारणा केली होती. मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपये, गंभीर जखमी प्रवाशांना अडीच लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांच्या कुटुंबियांना दीड लाख, गंभीर जखमी प्रवाशांना ५० हजार आणि जखमींना पाच हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे.



## ममता बॅनर्जींची केंद्रावर टीका



● पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी देशात वारंवार होणाऱ्या रेल्वे अपघातांवरून केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. सोशल मिडियावरून त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे. सरकारची असंवेदनशीलता कधी संपणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रेल्वे अपघातांची ही मालिका केव्हा खंडित होणार, अशी विचारणा त्यांनी केली आहे.

# अहमदाबादला जाणाऱ्या रेल्वेत बॉम्बची धमकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चंदीगड:** जम्मूतावीहून अहमदाबादला जाणारी गाडी फिरोजपूर स्थानकात थांबवण्यात आली. या ट्रेनमध्ये बॉम्ब होता, असे वृत्त आल्याने, गोंधळ उडाला. ट्रेन थांबवून त्याचा शोध घेतला गेला. जम्मू भागात सध्या दहशतवादी घटना वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत दहशतवादी घटनांबाबत यंत्रणाही सतर्क असतात. मिळालेल्या माहितीनुसार, बॉम्बची माहिती मिळाल्यानंतर ट्रेन थांबवण्यात आली आणि एजन्सी तपासासाठी पोहोचल्या. दोन तास या गाडीची तपासणी करण्यात आली. मात्र, कोणताही बॉम्ब सापडला नाही. एका व्यक्तीने आरपीएफला फोन करून बॉम्ब असल्याची माहिती दिली होती.

जम्मूतावीहून अहमदाबादकडे जाणारी एक्स्प्रेस सकाळी फिरोजपूर रेल्वे स्थानकातून फिरोजपूर-बठिंडा मार्गावरील फरीदकोट रेल्वे स्थानकाच्या दिशेने निघाली. गाडीत बॉम्ब असल्याची माहिती मिळताच, ती कासुबेगू रेल्वे स्थानकावर थांबविण्यात आली. घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त, रेल्वे पोलिस, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली होती.

## जमात-ए-इस्लामीवर बांगलादेशात बंदी

**ढाका:** बांगलादेशात नुकत्याच झालेल्या दंगलीत सुमारे २०० लोक मारले गेले. १९७१ मध्ये निर्माण झालेल्या बांगलादेशमुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या वंशजांना जे आरक्षण दिले गेले, त्याविरोधात तेथे आंदोलन झाले. ही निदर्शने इतकी हिंसक झाली की दंगली उसळल्या आणि २०० हून अधिक जण मारले गेले. बांगलादेशच्या शेख हसीना सरकारने या प्रकरणी मोठी कारवाई केली आहे. जमात-ए-इस्लामी या इस्लामी संघटनेवर देशात बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय विद्यार्थी संघटनेच्या विद्यार्थी शिबिरावरही बंदी घालण्यात आली आहे. या संघटनांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे अपहरण करून अराजक घटकांच्या प्रवेशामुळे दंगली उसळल्याचा आरोप आहे.

## पाच दिवस पावसाचेच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशसह अनेक राज्यांना मुसळधार पावसापासून दिलासा मिळण्याची शक्यता नाही. आयएमडी अर्थात भारतीय हवामान खात्याचा ताजा अंदाज याचे संकेत देत आहे. हवामान खात्याने मंगळवारी सांगितले की, पुढील ५ दिवस वायव्य, पश्चिम, मध्य, दक्षिण द्वीपकल्प, पूर्व आणि ईशान्येकडील बहुतेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पूर्व राजस्थान, जम्मू-काश्मीर, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि पश्चिम राजस्थानमध्ये पुढील पाच दिवसांत मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. केरळ, लक्षद्वीप, कर्नाटकची किनारपट्टी, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, आंध्र प्रदेशची किनारपट्टी, तेलंगणा आणि रायलसीमा मध्येही ५ दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे.

उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, हरयाणा, चंदीगड मध्ये २ ऑगस्टपर्यंत, पंजाब, उत्तर प्रदेशमध्ये ३० जुलै आणि १ ऑगस्टपर्यंत, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, गुजरात प्रदेश, पश्चिम मध्य प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्ये २ ऑगस्टपर्यंत, विदर्भात १ आणि २ ऑगस्टपर्यंत, ओडिशामध्ये २ ऑगस्टपर्यंत, पश्चिम बंगालमध्ये ३० जुलैपर्यंत, बंगालमध्ये १ ऑगस्टपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## धर्मांतराविरोधात योगी सरकारचा कायदा

# लव्ह जिहादविरोधात योगी सरकारचा कायदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकार लव्ह जिहादविरोधात नवा कायदा करण्याच्या तयारीत आहे. २०२० मध्ये करण्यात आलेल्या कायद्यात सुधारणा करणारे विधेयक आणण्यात आले आहे. 'उत्तर प्रदेश बेकायदा धर्मांतर बंदी (दुरुस्ती) विधेयक-२०२४' सोमवारी सभागृहात मांडण्यात आले. आता तो चर्चेसाठी तयार झाला आहे. सुधारित विधेयकात लव्ह जिहादचा आरोप खरा सिद्ध झाल्यास जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते, अशी तरतूद करण्यात आली आहे. हे विधेयक २ ऑगस्ट रोजी आवाजी मतदानाने मंजूर होण्याची शक्यता आहे.

२०२० मध्ये बनवलेल्या नियमाचा फारसा परिणाम दिसून येत नसल्याने, सरकारने या कायद्याची व्याप्ती वाढवली आहे, अशी माहिती भाजपशी संबंधित सूत्रांनी दिली. अशा तऱ्हेने यात अनेक गोष्टींचा समावेश करण्यात आला असून, शिक्षेतही वाढ करण्यात आली आहे. याअंतर्गत आता जन्मठेपेची शिक्षा होणार असून, पूर्वी कायद्यात १० वर्षांची तरतूद होती. त्याचबरोबर केवळ लग्नासाठी धर्म बदलणे बेकायदेशीर मानले जाईल. खोटे बोलून किंवा फसवणूक करून धर्म बदलणे हा गुन्हा मानला जाईल. तसे झाल्यास आरोपींवर या कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार आहे. एखाद्याला स्वत:हून धर्म बदलायचा असेल, तर त्याची माहिती दंडाधिकाऱ्यांना दोन महिने अगोदर द्यावी लागते.

फसवणुकीने धर्मांतर केल्यास १५ हजार रुपयांपर्यंत दंड आणि १ ते ५ वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद करण्यात आली आहे. एससी-एसटी प्रवर्गातील महिला आणि अल्पवयीन मुलांचे धर्मांतर केल्यास त्यांना ३ ते १० वर्षांची शिक्षा होऊ शकते. अशा प्रकरणांमध्ये एखाद्याच्या जामीन अर्जावर विचार करण्यासाठी सरकारी वकिलांकडूनही इनपुट घ्यावे लागेल.

### या गोष्टी ठरणार गुन्हा

- ओळख बदलणे आणि लग्न करणे
- छुपे धर्मांतर
- धर्मांतरासाठी निधी
- भीती दाखवून धर्मांतर
- बळाचा वापर करून विवाह करणे

#रा

# मनुने जिंकलं दुसरं ब्रॉंझ!

## १२४ वर्षांपूर्वीच्या विक्रमाशी केली बरोबरी



## सरबजोत सिंहसह ऐतिहासिक कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पॅरिस :** पुणे भारताची नेमबाज मनु भाकर हिने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये इतिहास रचला आणि नेमबाजीत पदक जिंकणारी देशातील पहिली भारतीय महिला ठरली. तिने महिलांच्या वैयक्तिक १० मीटर एअर पिस्तुलच्या अंतिम फेरीत कांस्यपदक पटकावले. आज मनु मोठा इतिहास रचण्यासाठी सज्ज झाली होती. ती सरबजोत सिंग याच्यासह मिश्र सांघिक १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात कांस्यपदकासाठी खेळली. दक्षिण कोरियाच्या खेळाडूंचे आव्हान मोडून मनु व सरबजोत पदक जिंकले. एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदकं जिंकणारी स्वातंत्र्यानंतरची ती पहिली भारतीय खेळाडू ठरली. कांस्यपदकाच्या लढतीत मनु भाकर आणि सरबजोत सिंग यांचा सामना ओ ये जिन आणि ली वोंहो या कोरियन जोडीशी झाला. मनु आणि सरबजोत यांनी क्वालिफायरमध्ये एकत्रितपणे ५८० गुण नोंदवून तिसरे स्थान पटकावले तर कोरियन जोडीने ५७९ गुणांसह चौथ्या स्थानावर शिक्कामोर्तब केले होते.

### शाब्बास पोरी!

- भारतीय नेमबाज मनु भाकरने कांस्यपदक जिंकल्यानंतर त्याची आई सुमेधा भाकर म्हणाली की, "खूप आनंदी आहे... खरंच मी दोन्ही मुलांसाठी (मनु भाकर आणि सरबज्योत सिंग) खुप आनंदी आहे. मी काल तिला फक्त एकच सांगितले की नीट खाऊन लवकर झोप आणि आनंदी रहा, जर काही टेन्शन आले तर सगळ्यात आधी मला फोन करशील.
- मनु भाकरने कांस्यपदक जिंकल्याबद्दल तिचे वडील राम किशन भाकर म्हणाले की, "ही खूप चांगली बातमी आहे, यासाठी मी देशवासीयांचे खूप प्रेम आणि आशीर्वाद दिल्याबद्दल आणि मनुला मदत केल्याबद्दल धन्यवाद. ...आम्हाला आशा आहे की ती भविष्यात चांगले करेल."

## ऑलिम्पिक गेम्स पॅरिस २०२४

पदक तक्ता — ३० जुलै ४ दिवस

| क्र | देश | सुवर्ण | कांस्य | रौप्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | चीन | ६ | ६ | २ | १४ |
| २ | जापान | ६ | २ | ४ | १२ |
| ३ | फ्रान्स | ५ | ८ | ३ | १६ |
| ४ | ऑस्ट्रेलिया | ५ | ४ | ० | ०९ |
| ५ | कोरिया | ५ | ३ | २ | १० |
| २८ | भारत | ० | ० | २ | ०२ |

## चिराग-सात्विक ऑन 'टॉप', मात्र अश्विनी-तनिषाचं आव्हान संपुष्टात



**पॅरिस :** पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेत मंगळवारी भारताला बॅडमिंटनमध्ये कडू-गोड असे दोन्ही क्षण अनुभवायला मिळालेत. भारताची स्टार जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी हे पुरुषांच्या दुहेरी प्रकारात ग्रुप स्टेजमध्ये अपराजित राहिलेत. मात्र, महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रास्तो यांना सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

मंगळवारी बॅडमिंटनमध्ये पुरुष दुहेरीमध्ये सात्विक आणि चिराग यांचा सामना इंडोनेशियाच्या फझर अल्फियन आणि रियान मुहम्मद अर्डिआंतो या जोडीविरुद्ध झाला. या सामन्यात चिराग-सात्विक यांनी २१-१३, २१-१३ अशा फरकाने विजय मिळवला. या विजयासह आता सात्विक-चिराग यांची जोडी ग्रुप सीमध्ये अव्वल क्रमांकावर आली आहे. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की आत्तापर्यंत त्यांची जोडी अपराजित असून ग्रुप सी मधून त्यांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश आधीच निश्चित केला आहे. आता ते ग्रुप सी मध्ये अव्वल क्रमांकावर राहिल्याने त्यांच्यासाठी पुढील मार्ग सोपा ठरू शकतो. याआधी त्यांनी पहिल्या सामन्यात फ्रान्सच्या जोडीला पराभूत केलं होतं.

## ऑलिम्पिकमध्ये आकाशी आपत्तीचा धोका..

**पॅरिस :** ऑलिम्पिक 2024 च्या चौथ्या दिवशी भारतीय संघाने दुसरे पदक जिंकले आहे. ही दोन्ही पदके स्टार नेमबाज मनू भाकरने जिंकली आहेत. दरम्यान, फ्रान्सच्या मेट्रोलॉजिकल सर्व्हिसचे एक निवेदन समोर आले आहे. पॅरिसमध्ये भारतीय वेळेनुसार रात्री 9.30 वाजता वादळ येण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. यासोबतच मुसळधार पाऊस, गारपीट आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये वादळाचा इशारा: सध्या पॅरिसमध्ये महाकुंभ ऑलिम्पिक खेळ सुरू आहेत. या ऑलिम्पिक खेळांचा आज (३० जुलै) चौथा दिवस आहे. पण दरम्यान, पॅरिसमध्ये वादळ आणि मुसळधार पावसाचा धोका निर्माण झाला आहे.



## राज्यस्तरीय ज्युनियर संघात पुण्याचे चार फुटबॉलपटू

### योगेश पिल्ले यांची सहाय्यक प्रशिक्षक म्हणून नियुक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनने (विफा) आगामी ज्युनियर बॉईज राष्ट्रीय फुटबॉल ( पहिला स्तर) स्पर्धेसाठी निवडलेल्या राज्यस्तरीय संघात पुण्याच्या चार खेळाडूंचा समावेश आहे. ही स्पर्धा नारायणपूर (छत्तीसगड) येथे २७ जुलै ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत आरकेएम आश्रमा मैदानावर खेळली जाणार आहे. राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचा ब गटात समावेश असून त्यात गोवा, दिल्ली आणि झारखंड संघ आहेत. महाराष्ट्राची सलामीची लढत ३ ऑगस्टला गोवाविरुद्ध आहे

राज्याच्या २२ सदस्यीय संघात शौनक समित चौटा, आल्हाद सुधांशू हाटे, शौनक विनायक धापटे (सर्व मिडफिल्डर) आणि इक्बाल आसिफ शेख (फॉरवर्ड) या पुण्यातील चार खेळाडूंचा समावेश आहे; दरम्यान, पुण्याच्याच योगेश पिल्ले यांची संघाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडलेला महाराष्ट्राचा संघ पुढीलप्रमाणे आहे. संघ गोलरक्षक (३) : साकाश रवी वुक्कडला (मुंबई), साईराज भूषण डोंगळे (कोल्हापूर), हृदय समीर शहा (ठाणे)

सामन्यांचे वेळापत्रक (महाराष्ट्र);

३ ऑगस्ट : वि. गोवा
५ ऑगस्ट : वि. झारखंड
७ ऑगस्ट : वि. दिल्ली

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने हॉकीच्या सामन्यात

## भारताचा आयर्लंडवर २-० विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पॅरिस : :** पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने हॉकीच्या सामन्यात आयर्लंडवर २-० असा विजय मिळवला. हरमनप्रीत सिंग भारतासाठी हिरो ठरला, त्याने सामन्यातील दोन्ही गोल केले. त्याने प्रथम ११व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोकमध्ये रूपांतरित केले आणि त्यानंतर १९व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. स्पर्धेतील त्याच्या एकूण गोलांची संख्या आता चार झाली आहे.

भारताने दमदार खेळ केला. मात्र, आयर्लंडचा बचावही सर्वोत्तम नव्हता. आयरिश संघाने भारताचे आक्रमण रोखण्यासाठी खूप संघर्ष केला आणि बरोबरीच्या महत्त्वपूर्ण संधी गमावल्या. दुसरीकडे, भारताची बचाव फळी भक्कम होती, त्याने आयर्लंडचे लांबचे पास प्रभावीपणे रोखले आणि संपूर्ण सामन्यावर नियंत्रण राखले.

हा विजय भारतासाठी महत्त्वाचा आहे. भारत सध्या तिसऱ्या स्थानावर आहेत. अर्जेंटिनाविरुद्धची लढत अनिर्णित राहिल्याने, हा विजय भारतासाठी महत्त्वपूर्ण असाच होता. या विजयामुळे भारताच्या उपांत्यपूर्व फेरीत जाण्याची शक्यता वाढते. बेल्जियम आणि ऑस्ट्रेलिया गटात आघाडीवर असून, अव्वल चार संघ बाद फेरीत पोहोचतील.

## महाराष्ट्रचा छत्तीसगड संघावर ९-१ असा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राजनांदगाव, छत्तीसगड येथे झालेल्या दुसऱ्या हॉकी इंडिया ज्युनिअर (अठरा वर्षांखालील) गटाच्या पश्चिम विभागीय स्पर्धेत हॉकी मुलांच्या गटात महाराष्ट्राने आगेकूच कायम राखली आहे. राउंड रॉबिन फेरीत महाराष्ट्राने छत्तीसगड संघावर ९-१ असा विजय मिळविला. त्यात प्रमुख वाटा गौरव पाटीलने पेनल्टी कॉर्नरच्या माध्यमातून केलेल्या (१५, २१, ५४ व ५७ वे मिनीट) केलेल्या चार गोलचा होता. कार्तिक पठारेने पाचव्याच मिनिटास एकमेव गोल करताना संघाला आघाडी मिळवून दिली होती.

## बॉउंडलेस स्पोर्ट्स खेळाडूंची उत्कृष्ट कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** २१ व्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेमध्ये बॉउंडलेस स्पोर्ट्स असोसिएशनच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले. या असोसिएशनने १४ सुवर्ण, ९ रौप्य आणि १५ कांस्यपदकांसह एकूण ३८ पदकांची कमाई केली आहे.

पुणे जिल्हा स्पोर्ट्स कराटे असोसिएशनच्या वतीने ही स्पर्धा शिवछत्रपती क्रीडासंकुलात पार पडली. या स्पर्धेला कर्नल सोनल रजपूत, कर्नल हेमंत कुमार, लेफ्ट. कर्नल मनीष नारायण,



असोसिएशनचे अध्यक्ष अशोक कदम, अशोक फरगडे, उपाध्यक्ष लतेंद्र भिंगारे, पुणे शहरप्रमुख लहू पारवे, स्नेहल फरगडे यांसह मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत जिल्ह्यातून एकूण ४७१ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील सर्व प्रथम क्रमांकांचे विजेते २८ व २९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या राज्य कराटे स्पर्धेत सहभागी होणार आहेत.


या स्पर्धेतील विजेत्यांना बॉउंडलेस स्पोर्ट्स असोसिएशनचे संस्थापक-अध्यक्ष लतेंद्र भिंगारे, तांत्रिक अधिकारी अरविंद थोरात, शांताराम दारवटकर, श्रीकांत तिळवे, नीलेश रेणुसे, कल्याणी दारवटकर, वर्षा रेणुसे, अनिकेत तावरे, शुभम रणदिवे आणि नीतेश गौड आदींचे मार्गदर्शन मिळाले आहे.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे सुवर्णपदकविजेते : शुभम धकाते, अनिकेत तावरे, निरंजन गाडे, नीतेश गौड, ईशा मडिवाल मानसी धनकर, भावना कोळी, नंदिका कोलते पुनम अंकुशी, पल्लवी साप्ताळे.

हलगीचा ताल.. बहारदार समालोचन, हजारो कुस्ती शौकिनांचा जल्लोष अशा उत्साहपूर्ण वातावरणात

## महाराष्ट्र केसरी पैलवानांमध्ये तुल्यबळ लढत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क







**बारामती :** हलगीचा ताल.. बहारदार समालोचन, हजारो कुस्ती शौकिनांचा जल्लोष अशा उत्साहपूर्ण वातावरणात बारामतीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कुस्त्यांचं मैदान पार पडलं. युवा नेते जय पवार यांच्या उत्कृष्ठ नियोजनाखाली झालेल्या या मैदानात नामवंत मल्लांनी हजेरी लावत उपस्थितांच्या डोळ्यांचं पारणं फेडलं. या मैदानात पहिल्या क्रमांकाची कुस्ती महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर आणि उपमहाराष्ट्र केसरी माऊली कोकाटे यांच्यात झाली. प्रचंड ताकदीच्या या पैलवानांनामध्ये तुल्यबळ लढत झाली. अखेरीस ही कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बारामती तालुका कुस्तीगीर संघाच्या वतीने आणि युवा नेते जय पवार यांच्या पुढाकारातून बारामती शहरातील शारदा प्रांगणात निकाली कुस्त्यांचं मैदान आयोजित करण्यात आलं होतं. या मैदानाला क्रीडा मंत्री संजय बनसोडे, आमदार दत्तात्रय भरणे, युवा नेते जय पवार यांच्यासह आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू गिता फोगट, पवनकुमार, योगेश्वर दत्त, ट्रिपल महाराष्ट्र केसरी नरसिंग यादव, ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी आदी कुस्ती क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या मैदानात पहिल्या क्रमांकाची कुस्ती महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी माऊली कोकाटे यांच्यात झाली. सुरुवातीला तब्बल ३० मिनिटे या दोघांमध्ये तुल्यबळ लढत झाली. त्यानंतर त्यांना १० मिनिटांचा वेळ वाढवून देण्यात आला. दोघांनीही आपले कौशल्य पणाला लावल्यामुळे अखेरीस ही कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली. दुसऱ्या क्रमांकासाठी महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील आणि उपमहाराष्ट्र केसरी गणेश जगताप यांच्यात झालेल्या लढतीत पृथ्वीराज पाटील याने घुटना डाव टाकत विजय मिळवला.

तिसऱ्या क्रमांकासाठी महान भारत केसरी माऊली जमदाडे विरुद्ध महाराष्ट्र केसरी बालारफीक शेख यांच्यात लढत झाली. तब्बल २६ मिनिटे झालेल्या या लढतीत बालारफीक शेख याने दुहेरी पट डावात विजय मिळवला. मुंबई महापौर केसरी भारत मदने विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी योगेश पवार यांच्यात चौथ्या क्रमांकासाठी लढत झाली. त्यामध्ये भारत मदने याने निकाल डावावर ही कुस्ती जिंकली. या मैदानात महिलांच्याही कुस्त्यांचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यामध्ये राज्यातील नामवंत महिला मल्लांनी सहभाग घेत आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली. याप्रसंगी बोलताना क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी जय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामतीत आयोजित केलेल्या कुस्ती मैदानाचं कौतुक करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नेहमीच क्रीडा क्षेत्राला अधिकचं महत्व देत भरीव निधीची तरतूद केल्याचं सांगितलं. आगामी काळात कुस्ती क्षेत्रासाठी शक्य ती मदत दिली जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली. ऑलिंपिकमध्ये पदक मिळवणाऱ्या खेळाडूंना राज्य शासनाकडून बक्षीस देण्याबाबत अजितदादांनी सूचना दिल्याचंही त्यांनी जाहीर केलं.

#रा